नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक ३४ * * अमरावती * सोमवार, दिनांक ४ ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## दोन दहशतवादी लपल्याचा संशय

■ वृत्तसंस्था, जम्मू, दि. ३ :

जम्मू-काश्मीरमधील कुलगामच्या अखल जंगलात दहशतवाद्यांच्या शोध मोहिमेचा रविवारी तिसरा दिवस होता. येथे अजूनही दोन दहशतवादी लपल्याचा संशय आहे. एक दहशतवादी जखमी झाला आहे.

शनिवारी, १ ऑगस्टच्या रात्री सुरू झालेल्या शोध मोहिमेनंतर सुरक्षा दलांनी दोन दहशतवाद्यांना ठार केले. पुलवामा येथील हरिस नझीर डार म्हणून एका दहशतवाद्याची ओळख पटली. पहलगाम हल्ल्यानंतर गुप्तचर संस्थांनी २६ एप्रिल रोजी ज्या १४ स्थानिक दहशतवाद्यांची नावे जाहीर केली होती, त्यांच्या यादीत सी-श्रेणीतील दहशतवादी हरिसचा समावेश होता. त्याच्याकडून मोठा शस्त्रसाठर जप्त करण्यात आला.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

### 'इंडिया' कात टाकणार काय ?

इंडिया आघाडीमध्ये बिघाडी झालेली आहे अशा वार्ता गेल्या अनेक दिवसांपासून कानावर येत आहेत. या आघाडीत अनेक राज्यांमध्ये परस्पर विरोधी असलेले पक्षही संमिलीत आहेत. लवकरच केरळमध्ये विधानसभेची निवडणूक होणार आहे. तिथे डावी आघाडी आणि काँग्रेसची आघाडी यातच खरा संघर्ष आहे. जंग जंग पछाडूनही भारतीय जनता पक्ष आणि संघ परिवार केरळमध्ये आपले खातेही उघडू शकलेला नाही. शशी थरूर सारखा विद्वान काँग्रेसला पटला नाही किंवा शशी थरूरला काँग्रेस पटली नाही. आता थरूर पुढे काय करणार हे अजून तरी गुलदस्त्यातच आहे. तशीच परिस्थिती पश्चिम बंगालची आहे पश्चिम बंगालमध्ये ही तृणमूल काँग्रेस आणि काँग्रेस व डावे यांच्यात लढाई आहे. इतर अनेक राज्यातही काही प्रमाणात हाच संघर्ष आहे, बिहारमध्ये राजदला कन्हैया कुमार नको आहे. उत्तर प्रदेशमध्ये अखिलेश यादव आणि राहुल गांधी यांचे ट्युनिंग जमलेले दिसते. ज्या तीन राज्यात काँग्रेसचे पारडे जड आहे व सत्ता आहे त्या ठिकाणचे विरोधी पक्ष इंडिया आघाडीत नाहीत. अशा एकूण राजकीय परिस्थितीत एक ते दीड वर्षानंतर येत्या सात ऑगस्टला इंडिया आघाडीची बैठक बोलावण्यात आलेली आहे. यापूर्वी मुंबई येथे झालेल्या बैठकीत पश्चिम बंगालच्या तृणमूल आणि शिवसेनेसह झाडून सगळे विरोधी पक्ष हजर होते. या सर्व पक्षांच्या एकमेकांवर दृढविश्वास असता तर इंडिया आघाडीला पाच-पंचवीस जागा जास्त मिळाल्या असत्या पण तसे झाले नाही. आता अनेक राज्यात निवडणुका अभिप्रेत आहेत. त्यात पहिले बिहार आहे या राज्यात निवडणूक आयोगाने एक कोटींपेक्षा जास्त मतदारांना मतदार यादीतून बाहेर काढले आहे. राहुल गांधी आता थेट निवडणूक आयोगाला आव्हान देत आहेत. आपल्याजवळ गडबडीचे पक्के पुरावे आहेत असे ते वारंवार सांगत आहेत. तिकडे संघ परिवार आणि भारतीय जनता पक्ष किंवा संघ परिवार आणि सध्याचे दोन नेते यांच्यात वितंडवाद सुरू आहे. तुम्हाला आठवत असेल इंडिया आघाडीच्या बैठकीत २४ ते २५ पक्ष संमिलीत होते, त्यावेळी मोदीजींनी आपल्या युतीमध्ये लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी ३८ पक्ष संमिलीत करून घेतले होते. त्यामध्ये बच्चू कडू यांच्या पक्षासारखे एकही खासदार नसलेले अनेक पक्ष होते. तरीही त्यांना आपले लक्ष्य प्राप्त करण्यात यश आले नव्हते. आपल्याला संघाची गरज नाही असे अर्धी निवडणूक झाल्यावर नड्डाजींनी ठामपणे घोषित केले होते आणि निकाल आल्यावर संघ काय करू शकतो हे संघाने दाखवून दिले. मग संघासाठी पायघड्या घालण्यात आल्या आणि येनकेन प्रकारेण महाराष्ट्राच्या विधानसभेत बहुमत मिळवता आले. हा सर्व इतिहास आहे याचे कारण असे आहे की, आम आदमी पक्ष इंडिया आघाडीच्या बैठका होत नाहीत म्हणून बाहेर पडला. तसाही आम आदमी पक्ष काँग्रेसला विरोध करूनच सत्तेवर आला होता. दिल्लीत त्यांनी काँग्रेसकडून सत्ता हस्तगत केली. गोवा आणि गुजरातमध्ये काँग्रेसला सत्ता मिळू दिली नाही. लोकसभा निवडणुकीपूर्वी एकंदरीत परिस्थिती पाहून आम आदमी पक्ष इंडिया आघाडीत होता पण आता नदीचा प्रवाह बदलला आहे. आता लोकसभेतील इंडिया आघाडीचे धुरंदर अशी काही शस्त्रे उगाळीत आहेत की त्यामुळे भल्याभल्यांची भंबेरी उडत आहे. राज्यसभेच्या सभापतीलाच चक्क पलायन करावे लागत आहे. आता इंडिया आघाडीच्या बैठकीत केवळ भाषणे होतात, चर्चा होते की पुढील एकजुटीसाठी काही प्रयत्न होतात, हेच भारतातील जनतेला पहावयाचे आहे. विरोधी पक्षांची एकजूट झाल्यावर १९७७ साली काँग्रेसला सत्ता गमवावी लागली होती. सध्या तरी लोकसभेच्या निवडणुका नाहीत पण विधानसभेत इंडिया आघाडीचे पक्ष विरुद्ध भारतीय जनता पक्ष असा सामना झाल्यास त्यात एनडीएला अपेक्षित यश मिळाले, तर अनेक राजकीय उलथापालथी होऊ शकतात. भारतीय जनमानसाला घायाळ करणाऱ्या अनेक बाबी नजरेसमोर येत आहेत. ट्रम्पसारखा तुघलक केव्हा काय करील हे अजूनही समजत नाही अजून अमेरिकेने पेनल्टी बाबतचा निर्णय घोषित केला नाही. त्यामुळे आज तरी केंद्र सरकारला इतर अनेक प्रश्नांची उत्तरे द्यायची आहेत. इंडिया आघाडीतील सर्व पक्षांची एकजूट आणि सत्ताधारी पक्षातील प्रश्नचिन्हे पुढे काय करतील. हे बघणेच केवळ आपल्या हाती आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## उत्तर प्रदेशातील गोंडा येथे बोलेरो कालव्यात पडली

# ११ जणांचा बुडून मृत्यू

■ वृत्तसंस्था, लखनौ, दि. ३ :

उत्तर प्रदेशातील गोंडा येथे एका बोलेरोने नियंत्रण गमावले आणि ती शरयू कालव्यात पडली. या अपघातात ११ जणांचा मृत्यू झाला, त्यापैकी बहुतेक जण एकाच कुटुंबातील होते. बोलेरोमध्ये १५ जण होते. हे सर्वजण पृथ्वीनाथ मंदिरात पाणी अर्पण करण्यासाठी जात होते.

मोतीगंज पोलिस स्टेशन परिसरात सकाळी १० वाजता हा अपघात झाला. अपघातानंतर ओरडण्याचा आवाज ऐकून गावकरी घटनास्थळी पोहोचले. सुमारे १० मिनिटांनी आजूबाजूच्या परिसरातील लोक आणि पोलिसही तिथे पोहोचले. यानंतर बचावकार्य सुरू झाले, पण बोलेरोचे दरवाजे उघडत नव्हते. लोक गाडीच्या आत संघर्ष करत होते.


पृथ्वीनाथ मंदिरात जल अर्पण करण्यासाठी जात होते भाविक



कसे तरी लोकांनी गाडीच्या काचा फोडून सर्वांना बाहेर काढले. सर्वांना सीपीआर देण्यात आला, परंतु ८ जण शुद्धीवर आले नाही. तर ४ जणांना शुद्धीवर आल्यानंतर रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या बोलेरो अजूनही कालव्यात अडकली आहे. तीन पोलिस ठाण्यांमधील सुमारे १०० पोलिस बचाव कार्यात गुंतले आहेत.

बीना (३५), काजल (२२), मेहक (१२), दुर्गेश, नंदिनी, अंकित, शुभ, संजू वर्मा, अंजू, अनसूया आणि सौम्या अशी मृतांची नावे आहेत.

## गडकरींच्या निवासस्थानाला उडविण्याची धमकी

### सुरक्षा यंत्रणा सतर्क ■ एकाला अटक नागपूरमधील दोन्ही घरांची सुरक्षा वाढवली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपूरमधील घराला रविवारी सकाळी थेट बॉम्बने उडवण्याची धमकीमिळाली. एका अज्ञात व्यक्तीने फोन करून ही धमकी दिल्याने खळबळ उडाली.

पोलिस आणि गुप्तचर यंत्रणांनी तत्काळ पावले उचलत, नितीन गडकरींच्या दोन्ही निवासस्थानी सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे. दरम्यान, धमकीचा कॉल फेक कॉल असल्याची माहिती पोलिस प्रशासनाने दिली असून, या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी सध्या नागपूर येथील जयप्रकाशनगर मेट्रो स्थानकाजवळील एम्रिको हाइट्स येथे वास्तव्यास आहेत, तर महाल परिसरातील त्यांच्या जुन्या घराचे नूतनीकरण सुरू आहे. आज एका अज्ञाताने डायल ११२ वर कॉल करून नितीन गडकरींचे घर बॉम्बने उडवण्याची धमकी दिली. माहिती मिळताच राणा प्रतापनगर आणि कोतवाली पोलिस ठाण्याचे अधिकारी तातडीने घटनास्थळी पोहोचले. खबरदारीचा उपाय म्हणून नितीन गडकरी यांच्या दोन्ही ठिकाणच्या निवासस्थानी सुरक्षेत वाढ करण्यात आली.

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, हा फोन फेक कॉल असल्याचे स्पष्ट झाले आहे. तरीही कोणतीही जोखीम पत्करण्यात न येता सुरक्षाव्यवस्था अधिक मजबूत करण्यात आली आहे. याप्रकरणी संबंधित कॉल करणाऱ्या व्यक्तीला पोलिसांनी अटक केली असून, पुढील कार्यवाही सुरू आहे.

दरम्यान, नितीन गडकरी यांच्या घराची सुरक्षा आधीपासूनच चोख आहे, मात्र अशा प्रकारची धमकी मिळाल्यानंतर यामध्ये आणखी वाढ करण्यात आली आहे. हा प्रकार केवळ खळबळजनक नसून, सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील मानला जात आहे. त्यामुळे नागपूर पोलिसांकडून या प्रकरणाचा गंभीरतेने तपास केला जात आहे.

पोलिस उपायुक्त (झोन १) ऋषिकेश रेड्डी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, सकाळी ९ वाजता ११२ या आपत्कालीन हेल्पलाइनवर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी बॉम्ब ठेवण्यात आल्याचा आणि लवकरच स्फोट होणार असल्याचा एक फोन आला. त्यानंतर तात्काळ गडकरी यांच्या सुरक्षा पथकाला माहिती देण्यात आली आणि बॉम्ब शोध पथक सक्रिय करण्यात आले. संपूर्ण परिसराची कसून तपासणी केल्यानंतर कोणतेही स्फोटक किंवा तत्सम धोकादायक साहित्य आढळले नाही. त्यामुळे हा फोन खोटा असल्याचे स्पष्ट झाले. डीसीपी रेड्डी यांनी या कॉलसंदर्भात एका व्यक्तीला अटक झाल्याचेही स्पष्ट केले.

## ४० मृतदेहांची ओळख संशयास्पद




### ब्रिटिश कुटुंब डीएनए पुष्टीच्या प्रतीक्षेत

■ वृत्तसंस्था
अहमदाबाद, दि. ३ :

अहमदाबादहून लंडनला जाताना एअर इंडियाच्या विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ५२ ब्रिटिश नागरिकांच्या कुटुंबियांनी मृतदेहांची ओळख पटवण्याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. यूके कायदेशीर फर्म स्टोन लॉच्या मते, भारतातून पाठवलेल्या १२ मृतदेहांपैकी दोघांची ओळख चुकीची आढळली.

त्यानुसार, ४० मृतदेहांची ओळख संशयास्पद आहे, तर अनेक मृतदेहांवर आधीच अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. ब्रिटिश वकील जेम्स हीली-प्रॅट यांनी भारताच्या तपास संस्थेला एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरोकडे कॉकपिट रेकॉर्डिंग आणि इंधन कटऑफसारखे पुरावे कुटुंबांना देण्याची विनंती केली आहे.

ब्रिटिश पंतप्रधान केयर स्टारमर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात या मुद्द्यावर अलिकडेच झालेल्या चर्चेनंतर डीएनए मॅचिंगच्या प्रक्रियेला वेग आला आहे. लवकरच काही मृतदेहांचे डीएनए मॅचिंग निश्चित होईल अशी अपेक्षा आहे.

त्याच वेळी, भारत, इंग्लंड आणि अमेरिकेत कायदेशीर कारवाईला वेळ लागत असल्याने, टाटा समूहाकडून देण्यात येणाऱ्या ५०० कोटींच्या भरपाई योजनेबाबत स्पष्टता आणण्याची मागणीही कुटुंब करत आहे. कुटुंबाने चौकशीत पारदर्शकता आणण्याची मागणीही केली आहे.

१२ जून रोजी अहमदाबादमध्ये एअर इंडियाचे विमान कोसळले. या अपघातात २७० जणांना आपला जीव गमवावा लागला. विमानात २४२ जण होते. विमान कोसळलेल्या मेडिकल हॉस्टेलमध्ये २९ जणांना आपला जीव गमवावा लागला.

## मनोज जरांगे यांच्या लिफ्टचा अपघात

■ वृत्तसंस्था, बीड, दि. ३ :

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे आज लिफ्ट अपघातातून थोडक्यात बचावले. बीड दौऱ्यावर असताना ही घटना घडली.



बीड शहरातील एका खासगी रुग्णालयात रुग्णाच्या भेटीसाठी आले असताना, त्यांच्यासह काही सहकारी लिफ्टमधून खाली उतरत होते. याचवेळी लिफ्टने अचानक नियंत्रण गमावले आणि पहिल्या मजल्यावरून थेट जमिनीवर कोसळली.

रविवारी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास ही घटना घडली. सुदैवाने या घटनेत कुणालाही दुखापत झाली नाही. पहिल्या मजल्यावरून तळमजल्यावर येण्यासाठी ते लिफ्टमध्ये बसले होते.

## शिंदेसेनेची पक्ष म्हणून कारकीर्द पुढच्या महिन्यात संपेल

### असीम सरोदे यांचा दावा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

शिवसेना फुटीच्या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीबाबत वकील असीम सरोदे यांनी एक अत्यंत महत्त्वाचा दावा केला आहे.

त्यांनी 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, येत्या महिनाभरात सर्वोच्च न्यायालय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पक्ष म्हणून असलेली कारकीर्द संपुष्टात आणू शकते.

वकील असीम सरोदे यांनी वर पोस्ट करत म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाचे कायद्याचे हात आता महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे यांची पक्ष म्हणून असलेली कारकीर्द येत्या महिनाभरात संपवतील. कुणीही, कसेही, मन-मानेल त्या पद्धतीने पक्ष फोडतील, पक्ष पळवतील ही असंविधानिकता आणि पक्ष चोरी चालणार नाही असे प्रस्थापित होणे कायद्यावर आणि न्यायव्यवस्थेवर प्रेम करणारा म्हणून मला महत्वाचे वाटते. विधानसभा अध्यक्षांनी कधीच तटस्थ न वागता बेकायदेशीर सरकार स्थापन करण्यासाठी काम करणे याबाबत सर्वोच्च न्यायालय काय म्हणणार ते सुद्धा मला बघायचे आहे, असेही सरादे यांनी म्हटले आहे.

## 9 लाख घरांमध्ये शिरले गंगेचे पाणी

### उत्तर प्रदेशातील १२ जिल्ह्यांत हाहाकार

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३ :

उत्तर प्रदेशात मुसळधार पावसामुळे १२ जिल्हे पुराचा सामना करत आहेत. यामध्ये प्रयागराज आणि काशी जिल्ह्यांचा समावेश आहे. वाराणसी आणि प्रयागराजमध्ये गंगेचे पाणी एक लाखाहून अधिक घरात घुसले आहे. रविवारी सकाळी ६ वाजता गंगेची पाण्याची पातळी धोक्याच्या चिन्हापेक्षा २० सेमी वर वाहत आहे, धोक्याची पातळी ७१.४ मीटर आहे. आज राज्यातील ७१ जिल्ह्यांमध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे. ७ जिल्ह्यांमध्ये खूप मुसळधार पाऊस पडू शकतो.

बिहारमधील सर्व ३८ जिल्ह्यांना देण्यात आला आहे. १८ जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट आणि २० जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.



## महसूल विभाग अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न : मुख्यमंत्री


महसूल परिषदेचा समारोप

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :

महसूल विभाग राज्याच्या आर्थिक विकासाचा कणा असून गतिमानता, पारदर्शकता व तत्परतेने सेवा देणारा विभाग म्हणून याची ओळख आहे. सध्या राज्यातील जनतेला सर्वाधिक ऑनलाइन सेवा उपलब्ध करून देणारा हा विभाग असून अधिक लोकाभिमुखतेसाठी महसूल परिषदेत अभ्यास गटांनी सादर केलेल्या शिफारशी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी दिशादर्शक ठरतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महसूल परिषदेच्या समारोप प्रसंगी व्यक्त केला.

भारतीय प्रबंध संस्थान (आयआयएम) नागपूर, येथे आयोजित महसूल परिषदेच्या दुसऱ्या दिवशी झालेला चर्चासत्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

यावेळ महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुख्य सचिव राजेश कुमार, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, जमाबंदी आयुक्त, नोंदणी महानिरीक्षक, सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व महसूल अधिकारी उपस्थित होते.

कालानुरूप महसूल विषयक कार्यप्रणालीशी संबंधित धोरणात्मक बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाली असून तंत्र कौशल्याच्या बळावर हा विभाग अधिकाधिक सक्षम व लोकस्नेही करण्याचा प्रयत्न राज्य शासनाकडून करण्यात येत आहे. या सर्व धोरणात्मक बाबींवर चर्चा, मंथन व मूल्यमापन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या महसूल परिषदेचा समारोप मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.



या परिषदेत विभागीय आयुक्त प्रमुख असलेल्या समित्यांकडून विविध अहवाल सादर करण्यात आले. महसुली कामकाजात सुसूत्रता व गतिमानता आणण्यासाठी आवश्यक त्या बाबी त्यांनी मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिल्या.

महसुली सेवा व योजनांच्या लाभांपासून एकही नागरिक वंचित राहू नये यासाठी अधिकाधिक सेवा ऑनलाईन पद्धतीने देण्यासोबतच त्यात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी सादरीकरणाच्या माध्यमातून महत्वपूर्ण बाबी समितीकडून मांडण्यात आल्या. या विषयाचा शासनास सादर करण्यात येणारा अहवाल अचूक व निर्दोष असावा यासाठी प्रत्येक बाबींचा सखोल अभ्यास करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

**परिषदेतील विचारमंथन दिशादर्शक**

दैनंदिन जीवनात सामान्य नागरिकांना विविध कामांच्या निमित्ताने वारंवार महसूल विभागाशी संपर्क साधावा लागतो. या परिषदेच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या धोरणात्मकबाबी केवळ जिल्हा मुख्यालय स्तरावरच नव्हे तर उपविभाग व तालुकास्तरावरही सर्वांसाठी अत्यंत उपयोगी सिद्ध होणार असल्याची भावना महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

या परिषदेच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण कल्पना, विविध उपाययोजना व उपक्रमांच्या माहितीचे आदानप्रदान झाले असून यातून प्रशासनात नवी कार्यपद्धती अस्तित्वात येईल. तसेच ही परिषद विभागाच्या भविष्यातील वाटचालीसाठी दिशादर्शक ठरणार असल्याची भावना या परिषदेला उपस्थित असलेल्या अनेक अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

## आपल्या बापाचं काय जातंय?

### शिरसाट यांचे आणखी एक वादग्रस्त विधान, राजकारण तापणार

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ३ :

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट पुन्हा एकदा त्यांच्या वादग्रस्त विधानामुळे चर्चेत आले आहेत. अकोल्यात आयोजित एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी सरकारचा पैसा आहे, आपल्या बापाचं काय जातंय? असे वक्तव्य केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. त्यांच्या या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा राजकारण तापण्याची शक्यता आहे.



काही दिवसांपूर्वीच संजय शिरसाट यांच्या एका व्हिडीओमुळे वाद निर्माण झाला होता, ज्यामध्ये ते एका खोलीत अर्धनग्न अवस्थेत बसले होते आणि त्यांच्या बाजुला पैशांची बॅग दिसत होती. तसेच राज्यात मंत्र्यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे सरकार अडचणीत सापडत असल्याचे चित्र दिसत आहे. काही दिवसांपूर्वीच मुख्यमंत्र्यांनी मंत्र्यांना संयमित आणि जबाबदारीने बोलण्याची ताकीद दिली होती. तसेच खाते बदलासारखे निर्णयही घेतले गेले. मात्र तरीही मंत्र्यांच्या वागणुकीत फारसा फरक पडताना दिसत नाही.

शहरातील निमवाडी परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या नूतन वास्तूचे लोकार्पण सामाजिक न्याय मंत्र्यांच्या हस्ते झाले. यावेळी भाषणादरम्यान त्यांनी आपल्या भागातील वसतिगृहासाठी निधीची मागणी करा. वसतिगृहाला पाच, दहा, पंधरा कोटींचा निधी लागत असेल तरी तो मागा. नाही दिला तर नाव सांगणार नाही. सरकारचा पैसा आहे, आपल्या बापाचं काय जातयं?. असे विधान बेधडकपणे केले.

# सक्षम मानव संसाधनातून विकसित भारताचे स्वप्न साकार करण्याचा निर्धार

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 3)** - भारत हा युवा संसाधनाने समृद्ध असून जगाला संस्कारित व उच्चशिक्षित मानव संसाधनाची आवश्यकता आहे. सक्षम युवा पिढी निर्माण करणे ही सामाजिक जबाबदारी आहे आणि याच माध्यमातून 'विकसित भारत 2047'चे स्वप्न साकार होईल, असे प्रतिपादन महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा संघटनेतर्फे मातोश्री विमलाताई देशमुख सभागृहात समाज मेळावा, समाजभूषण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच विधवा व परितक्त्या महिलांना शिलाई मशीनचे वितरण कार्यक्रम झाला. यावेळी आमदार प्रताप अडसड, रामदास तडस, नवनीत राणा, संजय हिंगासपूरे, डॉ. मोनीका मांडवे, शिक्षण उपसंचालक निलीमा टाके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



### युवा पिढी ही देशाची ताकद

पालकमंत्री बावनकुळे म्हणाले की, आज जगातील सुमारे 110 देश वृद्धत्वाकडे झुकले असून त्यांच्याकडे सक्षम मानव संसाधनाची कमतरता आहे. भारतातील युवा पिढीकडे ही गरज पूर्ण करण्याची क्षमता आहे. त्यामुळे नवतंत्रज्ञानाचे शिक्षण, उच्चशिक्षा आणि संस्कारयुक्त व्यक्तिमत्व घडविणे गरजेचे आहे. व्यसनमुक्त व गुणसंपन्न युवकांची निर्मिती करून रोजगाराच्या नव्या दालने खुली करता येतील.0 प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'विकसित भारत 2047'चा संकल्प मांडला असून, त्यासाठी सक्षम व उच्चशिक्षित समाजाची आवश्यकता आहे. आयआयटी, आयआयएम, एनआयटीसारख्या संस्थांद्वारे गुणवंत विद्यार्थ्यांनी देशाच्या विकासात योगदान द्यावे, असेही ते म्हणाले.

### गुणवंतांचा व समाजसेवकांचा गौरव

कार्यक्रमात तैलिक समाजातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींचा आणि इयत्ता दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा शालेय साहित्य देऊन सत्कार करण्यात आला. एमसीए अभ्यासक्रमात सुवर्ण पदक मिळवणाऱ्या समिक्षा साखरकर यांचाही गौरव झाला. समाजातील विधवा आणि परितक्त्या महिलांना स्वावलंबनासाठी शिलाई मशीनचे वितरण करण्यात आले.

### जिजाऊ सभागृहाचे उद्घाटन

दरम्यान, पालकमंत्री बावनकुळे यांनी जिल्हा कोषागार कार्यालय परिसरातील नव्याने बांधलेल्या 'जिजाऊ सभागृहाचे' उद्घाटन आमदार सुलभा खोडके यांच्या हस्ते केले. जिल्हा नियोजन योजनेतून 68 लाख रुपये खर्च करून हे सभागृह उभारण्यात आले आहे. येथे लेखा व कोषागार विभागाच्या नवीन प्रणालीचे प्रशिक्षण, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सभा, आरोग्य व योग शिबिरे आयोजित केली जातील. या प्रसंगी आमदार संजय खोडके, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, लेखा व कोषागार सहसंचालक प्रिया तेलकुंटे, वरिष्ठ कोषागार अधिकारी शिल्पा पवार आदी मान्यवर उपस्थित होते. पालकमंत्री बावनकुळे यांनी आश्वासन दिले की, जिल्ह्यातील विकास प्रकल्पांना निधीची कमतरता भासू देणार नाही. समाजातील सर्व घटकांचा सहभाग घेतल्याशिवाय विकसित भारताचे स्वप्न साकार होणार नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# तापी मेगा रिचार्जमध्ये विस्थापनाचा प्रश्न नाही!

## प्रशासनाची हमी

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी (दि.3)** - तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाबाबत मेळघाट परिसरात गेल्या काही दिवसांपासून समज-गैरसमज पसरले होते. यामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत प्रशासनाने प्रकल्पाविषयी माहिती देत सर्व शंका दूर केल्या.

माजी आमदार तथा भाजपा मेळघाट जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. जलसंपदा तापी खोरे विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे दिलेल्या माहितीमध्ये, या प्रकल्पामुळे मेळघाटमधील कोणत्याही गावाचे विस्थापन होणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यांनी सांगितले की हा प्रकल्प पूर्णत: जनसहभागावर आधारित आहे आणि निर्णय प्रक्रियेत स्थानिकांचा सहभाग निश्चित केला जाणार आहे.



तापी मेगा रिचार्ज प्रकल्पात एकही गावाचे विस्थापन होणार नाही. या प्रकल्पामुळे मेळघाटच्या विकासाला चालना मिळेल.
**प्रभुदास भिलावेकर,**
**माजी आमदार**

बैठकीला निवासी जिल्हाधिकारी अनिल भटकर, पालकमंत्र्यांचे विशेष कार्याधिकारी चौधरी, माजी जि.प. सदस्य सदाशिव खडके, श्याम गंगराळे, महादेव शनवारे, आदिवासी संघटनेचे सुरेश पटेल, रामगोपाल मावसकर यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. या प्रकल्पामुळे मेळघाटच्या विकासाला गती मिळणार असून स्थानिकांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. प्रशासनाच्या स्पष्ट हमीमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# सैन्यातून सेवानिवृत्त झालेल्या सैनिकाचा गावकऱ्यांकडून सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि.3)** -सावरखेड पिंगळाई येथील शेतकरी शेतमजूर कुटुंबात जन्मलेला राजकिरण केशवराव वरघट हा मुलगा सण 22 जुलै 2018 रोजी भारतीय सेनेत नागपूर येथे भरती झाला आणि गेल्या 17 वर्षापासून देशाच्या विविध राज्यात सेवा देऊन 31 जुलै रोजी सेवानिवृत्त झाला त्यामुळे त्याचा ग्रामवासियांनी आणि ग्रामपंचायत सावरखेड पिंगळाई तर्फे भावपूर्ण सत्कार करण्यात आला. राजकिरण केशवराव वरघट याची परिस्थिती फार हालाकीची असून वडील शेतकरी शेतमजुरीचे काम पाहतात.अशाही परिस्थितीत राजकिरणने अभ्यास आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळवले आणि भारतीय सेनेत भरती झाला. आई वडिलांचे स्वप्न पूर्ण केले गेल्या सतरा वर्षांमध्ये त्याने भारताच्या विविध राज्यात सेवा देऊन यामध्ये जम्मू काश्मीर, दार्जिलिंग, बंगाल मध्ये सेवा दिली. देश सेवेत उत्कृष्टपणे कामगिरी करून सेवानिवृत्त झाला. गावात आल्यावर गावच्या सरपंच सौ ललिता जोमदे. ग्रामपंचायत सदस्य निलेश टारपे, सेवा सहकारी सोसायटीचे माजी अध्यक्ष व सदस्य विकासराव काळबांडे, अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष कैलास ठाकूर, सेवा सहकारी सोसायटीचे सदस्य राहुल निचित, नानासाहेब सोलव, बारलिंगराव मनोहरे, संगणक ऑपरेटर राऊत यांचे हस्ते त्यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन भावपूर्ण सत्कार करण्यात आला.



# टीओडी मीटर अचूक, मोफत

## ग्राहकांच्या बिलाबाबत तक्रारी कमी होणार



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.3)** - ग्राहकांना अचूक आणि वेळेवर वीजबिल देण्यासाठी उपयुक्त ठरणारे अत्याधुनिक टीओडी (टाईम ऑफ डे) वीजमीटर आता अमरावती जिल्ह्यातही बसविण्यात येत आहेत. हे मीटर नवतंत्रज्ञानावर आधारित असून, तांत्रिकदृष्ट्या अधिक स्मार्ट स्वरूपाचे आहेत. महावितरणने स्पष्ट केले आहे की हे मीटर मोफत बसवले जातील आणि ग्राहकांवर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार येणार नाही.

महावितरणाच्या माहितीनुसार, टीओडी मीटरमध्ये मानवी हस्तक्षेपाला अजिबात वाव नाही. ऑटोमॅटिक मीटर रीडिंगच्या साहाय्याने ग्राहकांना अचूक व वेळेवर बिले मिळतील. त्यामुळे चुकीच्या वीजबिलाबाबत होणाऱ्या तक्रारींमध्ये लक्षणीय घट होईल. कृषी वर्गवारी वगळता इतर सर्व वर्गवारीतील ग्राहकांना हे मीटर बसविण्यात येत आहेत. अमरावती परिमंडळात हे काम जीनस या एजन्सीकडे सोपवण्यात आले आहे. सुरुवातीला सरकारी कार्यालये, सरकारी निवासस्थाने, मोबाईल टॉवर आणि नादुरुस्त मीटरच्या ठिकाणी ही बसवणूक सुरू आहे. नवीन वीजजोडणी देताना देखील टीओडी मीटर बसवले जात आहेत. तसेच सोलार नेट मीटरिंग साठीही यांचा वापर होतो. आतापर्यंत अमरावती जिल्ह्यात 90,039 टीओडी मीटर बसविण्यात आले आहेत. महावितरणच्या नव्या वीजदर प्रस्तावानुसार, ग्राहकाने वीज कधी वापरली त्या वेळेनुसार दरात सवलत मिळणार आहे. मात्र ही सवलत मिळवण्यासाठी टीओडी मीटर आवश्यक आहे. महावितरणच्या म्हणण्यानुसार, हे मीटर प्री-पेड नाहीत आणि कोणतेही शुल्क आकारले जात नाही. नादुरुस्त किंवा फॉल्टी मीटर असलेल्या ग्राहकांना प्राधान्याने हे मीटर बसवले जात आहेत. यामुळे ग्राहकांना अचूक वीजबिल मिळणार असून, तक्रारींमध्ये घट होणार आहे.

# भरधाव ऑटो उलटल्याने महिला ठार, सहा जण जखमी

## ड्रीमलॅण्डजवळील भीषण अपघात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 3) :** भरधाव वेगाने जात असलेला ऑटो पलटी होऊन झालेल्या भीषण अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला असून सहा प्रवासी जखमी झाले आहेत. ही घटना शनिवारी (2 ऑगस्ट) सकाळी सुमारे 11 वाजता बोरगाव धर्माळे जवळ ड्रीमलॅण्डसमोर घडली. अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव दीपाली दिनेश लंगडे (वय 25, रा. वडगाव माहोरे) असे आहे. त्यांच्यासोबत असलेल्या दोन लहान मुली, तसेच गोपाल बापूराव थोरात (60, रा. रामपुरी कॅम्प), कमल दिगांबर थोरात व दीक्षा दिगांबर थोरात (दोघी रा. वडगाव माहोरे) हे अपघातात जखमी झाले आहेत. काहींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. एमएच-27-बीडब्ल्यू-9852 क्रमांकाचा ऑटो अमरावतीहून नेरपिंगळाईकडे जात होता. वडगाव फाट्यावरून दीपाली लंगडे आपल्या दोन मुलींसह तसेच थोरात कुटुंबीय ऑटोत बसले. ऑटो ड्रीमलॅण्डजवळ आला असता चालकाचा ताबा सुटल्यामुळे ऑटो उलटला. त्यामुळे दीपाली लंगडे यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर चालकाने घटनास्थळावरून पलायन केले. स्थानिक नागरिकांनी तात्काळ नांदगाव पेठ पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. दीपाली लंगडे यांच्यावर वडगाव माहोरे येथे सायंकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# ऑटोमधून पर्स चोरी

**अमरावती** - गांधी चौकातून घरी जाण्यासाठी ऑटोमध्ये बसलेल्या एका महिलेची पर्स अज्ञात महिलांनी चोरल्याची घटना उघडकीस आली आहे. या पर्समध्ये 13 हजार रुपये रोख रक्कम आणि एटीएम कार्ड होते. तक्रारदार महिला अमरावती शहरातील रहिवासी असून, गांधी चौकातून ती ऑटोने घरी जात होती. ऑटोमध्ये आधीच दोन महिला बसलेल्या होत्या. ती चढल्यानंतर काही अज्ञात महिलांनी गर्दीचा फायदा घेत तिच्या पर्समधील छोटी पर्स चोरली. चोरी लक्षात आल्यानंतर महिलेने तत्काळ सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या घटनेचा पुढिल तपास सिटी कोतवाली पोलिस करीत आहे.

# सावंगा (बु.) येथे घरबांधणी अनुदान धनादेशाचे आ. प्रताप अडसड यांच्या हस्ते वाटप

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, (दि.3)** - चांदूर रेल्वे शहरालगत असलेल्या सावंगा (बुजरूग) येथे घरकुल घरबांधणी अनुदान धनादेशाचे वाटप आमदार प्रताप अडसड यांच्या हस्ते करण्यात आले. या धनादेश वाटप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावातील जेष्ठ नागरिक सुरेश चंपतराव सोळंके होते, तर प्रमुख उपस्थिती म्हणून ज्ञानेश्वर जैन्द्रे यांची उपस्थिती होती. सावंगा (बु.) हे गाव बेंबळा नदी प्रकल्प, यवतमाळ मध्ये बाधित झाले असून या गावाचे पुनर्वसन चांदूर रेल्वे रेल्वे स्टेशन लगत सन 2007 मध्ये झालेले आहे. सावंगा येथील बरेच लाभार्थी घरकुल घरबांधणी अनुदानापासून वंचित राहिले होते. शासनाच्या नियमानुसार प्रत्येक गावामध्ये घरबांधणी अनुदानाची रक्कम मिळालेली होती. परंतु सावंगा (बु.) येथील 40 ते 50 लाभार्थी या अनुदानापासून वंचित राहिले होते. तेव्हा गावातील सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपा जिल्हा सचिव संदीप सोळंके यांनी सदर समस्या आ. प्रताप अडसड यांच्याकडे रेटून धरली आणि आ. अडसड यांनी या प्रकरणामध्ये जातीने लक्ष देऊन हा प्रश्न मार्गी लावला. यानंतर गावामध्ये यावेळी आमदार अडसड यांच्या हस्ते सदर धनादेशाचे वाटप करण्यात आले. तेव्हा गावातील लाभार्थी यांनी आ. प्रताप अडसड तसेच संदीप सोळंके यांचे आभार मानले. यावेळी गावातील युवा कार्यकर्ते विलास इरतकर, गजानन डूबे, वैभव सोळंके, श्याम मारोटकर, वैभव गिलबिले, अमर बळी, देवेंद्र चचाने, अभिषेक पुनसे, संगीत मेटकर, निलेश सोळंके, अनिल तायवाडे, उमेश सोळंके, अतुल सोळंके, अनिल मेटकर व इतरांची उपस्थिती होती.



# वरुड तालुक्यातील सर्वात मोठे आरोग्य शिबिर यशस्वी

## 3500 रुग्णांची तपासणी, 600 शस्त्रक्रियेसाठी नोंद



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, (दि.3)** -वरुड तालुक्यातील आरोग्य सेवेत नवा इतिहास रचणारे भव्य आणि विनामूल्य महाआरोग्य शिबिर पुसला येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा परिसरात यशस्वीरीत्या पार पडले. हे शिबिर भाजप आमदार चंदू (उर्फ उमेश) यावलकर यांच्या पुढाकाराने तसेच राजेंद्र केदार मित्रपरिवाराच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात 3500 हून अधिक रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली, तर 600 रुग्णांची विविध शस्त्रक्रियांसाठी नोंदणी झाली. विशेषत: डोळ्याचे ऑपरेशन, मोतीबिंदू, दृष्टी दोष आणि इतर सर्जिकल केस तपासून पुढील उपचारासाठी निवड करण्यात आली. रुग्णांना मोफत औषधे, चष्मे, डोळ्यांचे ड्रॉप्स आणि प्राथमिक उपचार किट्स यांचे वितरणही करण्यात आले.



### भाजप नेत्यांची उपस्थिती आणि सेवाभावाचा गौरव

या ऐतिहासिक शिबिरास खासदार अनिल बोंडे, विधानसभा प्रमुख डॉ. मनोहर आंडे, डॉ. महेंद्र राऊत, जिल्हा संयोजक प्रवीण राऊत, माजी जि.प. सदस्य श्रीधर सोलव, तसेच स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.गावकऱ्यांनी भाजप कार्यकर्त्यांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक करत, रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा या ब्रीदवाक्याला न्याय दिल्याचे मत व्यक्त केले.

### तालुक्यातील विक्रम मोडणारे आयोजन

या शिबिरामुळे तालुक्यातील सर्व आरोग्य शिबिरांचे विक्रम मोडले असून, परिसरात मोठा सकारात्मक प्रभाव निर्माण झाला आहे. दूरवरच्या गावांतून आलेल्या रुग्णांना मोफत तपासणी आणि औषधोपचार मिळाल्याने आरोग्याची नवी दिशा मिळाल्याचे स्थानिकांनी सांगितले. दिलासा गरजू, गरीब, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी हे शिबिर मोठा दिलासा ठरले. एका नागरिकाने सांगितले, शहरात जाऊन हजारो रुपये खर्च करावे लागत होते, आता घराजवळच मोफत तपासणी व उपचार मिळाले, हे आमच्यासाठी भाग्य आहे. या उपक्रमाने वरुड तालुक्यातील आरोग्यसेवेच्या नव्या पर्वाची सुरुवात झाली असून, भविष्यातही अशी शिबिरे नियमित आयोजित करावीत, अशी स्थानिकांची मागणी आहे.

# नांदगाव पेठ येथील आरोग्य उपकेंद्राची नवीन इमारत धुळखात

## रुग्णांची गैरसोय | अन्यथा सामान्य नागरिकांच्या हस्ते करू लोकार्पण-हटवार

**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव पेठ, (दि. 3)** - प्राथमिक आरोग्य केंद्र,माहुली जहागीर अंतर्गत आरोग्य उपकेंद्र नांदगाव पेठ येथे मागील वर्षी माजी आ.यशोमती ठाकूर यांच्या निधीतून एक कोटी वीस लक्ष रुपये खर्च करून उपकेंद्राची नवी इमारत तसेच आरोग्य सेविकेसाठी निवासस्थान बांधण्यात आले. इमारती तयार होऊन सहा महिने अधिक झाले मात्र तरीही ही इमारत उदघाटनाच्या प्रतीक्षेत असून धूळखात पडलेली आहे. रुग्णांची होत असलेली गैरसोय बघता पंधरा दिवसात ही इमारत खुली करण्यात यावी अन्यथा सामान्य नागरिकांच्या हस्ते या इमारतीचे उदघाटन करण्यात येईल असा इशारा माजी जि.प.सदस्य नितीन हटवार यांनी दिला आहे.



गावातील आरोग्य सेवेसाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाने तब्बल एक कोटी वीस लाख रुपये खर्च करून उभारलेली नवीन इमारत गेल्या अनेक दिवसांपासून धुळखात पडली आहे. आवश्यक कागदोपत्री पूर्तता न झाल्याने इमारतीचा ताबा आरोग्य विभागाला दिला गेला नाही. त्यामुळे रुग्णांना नव्या सुविधांचा लाभ मिळत नसून त्यांना जुनी व जीर्ण इमारत किंवा मर्यादित जागेत उपचार घ्यावे लागत आहेत.

या संदर्भात माजी जि.प.सदस्य नितीन हटवार यांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी म्हटले की, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे हे अक्षम्य दुर्लक्ष आहे. लाखो रुपये खर्च करूनही इमारत रुग्णांच्या सेवेत न आणणे हे अन्यायकारक आहे. येत्या पंधरा दिवसांत किरकोळ कामे पूर्ण करून इमारत सुरु करावी, अन्यथा ग्रामस्थांसोबत मिळून आम्हीच इमारत उघडून रुग्णांच्या सेवेत देऊ.इमारत पूर्ण असूनही केवळ कागदोपत्री विलंब होत असून आरोग्य सेवांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करून इमारतीचा ताबा आरोग्य विभागाला द्यावा, अशी मागणी नितीन हटवार यांनी केली आहे.

### जुनी इमारत धोकादायक

50 वर्षांपासून वापरात असलेली आरोग्य उपकेंद्राची जुनी इमारत सध्या अत्यंत जीर्ण अवस्थेत असून पावसाळ्यात सर्वत्र पाणी गळतीची समस्या गंभीर स्वरूप धारण करत आहे. इमारतीतील छत, भिंती आणि खिडक्या अशा सर्व ठिकाणी पाणी शिरल्याने कर्मचाऱ्यांसह येथे येणाऱ्या रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे.

# शेतकऱ्यांसाठी 16 हजार मेगावॅट वीज निर्मीती होणार

## दिवसा 12 तास अखंड वीजपुरवठा करण्याचे नियोजन-मुख्यमंत्री







*महासागर प्रतिनिधी*

***मोर्शी, ( दि.3 )-** मोर्शी येथे आयोजित मत्स्य विज्ञान महाविद्यालयाच्या कोनशिला समारंभात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. त्यांनी सांगितले की, पुढील वर्षापासून राज्यात 16,000 मेगावॅट वीज निर्मिती होणार असून शेतकऱ्यांना दिवसा 12 तास अखंड वीजपुरवठा केला जाईल. तसेच 2029 पर्यंत शेतकऱ्यांना मोफत वीज उपलब्ध राहील. यासाठी सरकारने यावर्षीच्या अर्थसंकल्पात 5,000 कोटी रुपयांची तरतूद केली असून ती रक्कम शेती व्यवसायात गुंतवली जाणार आहे.*

कार्यक्रमात राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. त्यांनी सांगितले की, डॉ. बोंडे हे शेती विषयातील चतुरस्त्र ज्ञान असलेले माजी कृषिमंत्री आहेत. त्यांच्या कार्यकाळात मत्स्य विज्ञान महाविद्यालय मोर्शीत आणण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. फडणवीस यांनी पुढे सांगितले की, पशुपालन व मत्स्यपालन या क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान वापरल्यास युवकांना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होऊ शकतात. संकल्प साकार करण्यासाठी पंतप्रधानांचा 'निरक्रांती' हा सिंचन व्यवस्था, शेततळे व मत्स्यपालन क्षेत्रात मोठे काम करणे आवश्यक आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांनी आमदार उमेश यावलकर यांचेही कौतुक केले. 'अल्पकाळात त्यांनी विधिमंडळावर ठसा उमटवला आहे,' असे फडणवीस म्हणाले. गेल्या दोन वर्षांतील गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत यावलकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला असून सरकार शेतकऱ्यांना पूर्ण मदत करेल, असेही त्यांनी आश्वासन दिले. तसेच वैनगंगा-नळगंगा योजनेवर एक लाख कोटी रुपये खर्च करून सिंचन क्षेत्रात मोठा बदल घडवून आणण्याची घोषणा केली.

### मत्स्य विज्ञान महाविद्यालय उभारणे अभिमानाचे



पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, मोर्शी येथे मत्स्य विज्ञान महाविद्यालय उभारले जाणे हा अभिमानाचा क्षण आहे. चिखलदरा पर्यटनाचे केंद्रबिंदू ठरणार असून शेतकऱ्यांसाठी पानंद रस्ते व प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यात येईल. मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, महाविद्यालयाचे बांधकाम दोन वर्षांत पूर्ण केले जाईल. या महाविद्यालयामुळे मच्छीमार आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन समृद्धीच्या मार्गावर जातील. मार्वल कंपनीसोबत कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी करार करून मत्स्य व्यवसायात क्रांती घडविण्याचा प्रयत्न होत आहे.

### पुढील दोन वर्षात होणार महाविद्यालयाचे बांधकाम

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यमंत्री डॉ. अनिल बोंडे यांनी केले. मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचे बांधकाम दोन वर्षांत पूर्ण करण्याचे आश्वासन देत उद्घाटनासाठी पुन्हा मुख्यमंत्री फडणवीस यांना आमंत्रित करण्याची घोषणा केली. महसूल व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा हे काश्मिरीसारखे नंदनवन करण्याची ग्वाही दिली. समारंभात भाजप व महायुतीचे आमदार, मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव, माजी खासदार नवनीत राणा, रामदास तडस, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधिकारी, अमरावती महानगरपालिका आयुक्त, पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ चे कार्यकारी परिषद सदस्य सुनील सोमवंशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन क्षिप्रा मानकर यांनी केले तर आभार प्रदर्शन कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांनी केले.

# वेगात असलेला ऑटो उलटल्याने महिला ठार, सहा प्रवासी जखमी

### ड्रीमलँडजवळ अपघात; चालक पसार



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 3 )** नेर-पिंगळाईकडे निघालेल्या वेगवान ऑटोला ड्रीमलँड परिसरात अपघात झाला. या अपघातात वडगाव माहोरे येथील दीपाली दिनेश लंगडे (25) या महिलेचा जागीच मृत्यू झाला असून सहा प्रवासी जखमी झाले आहेत. अपघात शनिवारी सकाळी सुमारे 11 वाजता बोरगाव धर्माळे परिसरात घडला. अपघातानंतर चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे.

एमएच 27/बीडब्ल्यू 9852 क्रमांकाचा ऑटो अमरावतीहून नेर-पिंगळाईकडे जात होता. सुरुवातीला या ऑटोत तीन प्रवासी होते. वडगाव फाट्यावरून दीपाली लंगडे आपल्या दोन मुलींनिशी, कमल दिगंबर थोरात व दीक्षा दिगंबर थोरात (सर्व वडगाव माहोरे) ऑटोत बसले. मात्र ड्रीमलँडजवळ ऑटोची वेगाची मर्यादा अत्यंत अधिक असल्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटले आणि ऑटो उलटला. अपघातात दीपाली लंगडे यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या दोन लहान मुली, गोपाल बापूराव थोरात (60, रामपुरी कॅम्प), कमल थोरात व दीक्षा थोरात हे प्रवासी जखमी झाले असून काहींची प्रकृती गंभीर आहे. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी त्वरित पोलिसांना माहिती दिली. नांदगाव पेठ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. दीपाली लंगडे यांचे शवविच्छेदनानंतर त्यांच्यावर शनिवारी सायंकाळी वडगाव माहोरे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून फरार चालकाचा शोध घेतला जात आहे.

## नौटंकी करून काही मिळणार नाही- -पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मोर्शी ( दि. 3 ) -** नौटंकी करून काही मिळणार नाही, हे आता समजून घ्या, असा अप्रत्यक्ष टोला भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोर्शीतील कार्यक्रमात लगावला. कुणाचेही नाव न घेता त्यांनी अपक्ष आमदार बच्चू कडू यांच्यावर टीकास्त्र सोडले आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. मोर्शीत एका कार्यक्रमात बोलताना बावनकुळे म्हणाले, काही लोक आंदोलन करतात, नौटंकी करतात, फॉमहाऊस बांधतात, मोठ्या प्रमाणात कर्ज घेतात आणि मग कर्जमाफीसाठी समिती मागतात. पण या सगळ्याचा उपयोग नाही. त्यांनी याचवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यशैलीचे कौतुक करत सांगितले, अमरावतीत कुणीतरी गदारोळ केला, पण कोणत्याही आंदोलना-नाट्याशिवाय दिव्यांग भत्ता 1500 रुपयांवरून 2500 रुपये करण्यात आला. हे आहे सरकारचे खरे काम. बावनकुळे पुढे म्हणाले, शेतकऱ्यांसाठी केंद्र व राज्य सरकार गंभीर आहे. पण काही लोक शेतातच फॉमहाऊस बांधतात आणि नंतर कर्जमाफी मागतात. म्हणूनच अशा बाबी तपासण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यांनी कुणाचेही नाव घेतले नसले तरी हे सगळे भाष्य थेट बच्चू कडूंना उद्देशूनच असल्याचे राजकीय चर्चेत आहे. त्यामुळे या वक्तव्यावर कडू काय उत्तर देतात, याकडे संपूर्ण विदर्भाचे लक्ष लागले आहे.

## 'मामा' म्हणल्याचा राग, कुऱ्हाडीने केला हल्ला

**अमरावती -** धारणी पोलीस ठाणे हद्दीतील उटावली गावात केवळ 'मामा' असे संबोधल्याच्या कारणावरून एकाने संतापून समोरासमोरील व्यक्तीवर कुऱ्हाडीने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात चंदन काळू भिलावेकर हे गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना रविवारी उटावली येथे घडली. सगमली (जि. बुरहानपूर, मध्य प्रदेश) येथील शिवकुमार दारसिंबे हा चंदन भिलावेकर यांच्या घरी आला होता. 'माझ्या काकाला मामा का म्हटले?' असे म्हणत त्याने चंदनवर कुऱ्हाडीने अचानक वार केले. जखमी चंदनला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आले.

# बसमधून 4.95 लाखाचे दागिने लंपास

### राजापेठ पोलिस ठाण्यात अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 3 ) -** यवतमाळहून वरुडला जाणाऱ्या एस.टी. बसमध्ये एका महिला प्रवाशाजवळ बसलेल्या अज्ञात महिलेने तब्बल 4 लाख 95 हजार रुपये किमतीचे 117 ग्रॅम सोन्याचे दागिने चोरल्याची घटना 2 ऑगस्ट रोजी घडली. या प्रकरणी तक्रारदार महिलेच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिस ठाण्यात अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, तक्रारदार महिला अमरावती येथील असून, काही दिवसांपूर्वी ती तिच्या माहेरी यवतमाळ येथे गेली होती. यावेळी तिने 40 ग्रॅमचे मंगळसूत्र, 35 ग्रॅम ब्रेसलेट, 28 ग्रॅम बकुळीचा हार, 4 ग्रॅम अंगठी, 2 ग्रॅम मोत्याची अंगठी, 3 ग्रॅम हिऱ्याची अंगठी आणि कानातले असे एकूण 117 ग्रॅम वजनाचे, 4.95 लाख रुपये किमतीचे दागिने तिच्या पर्समध्ये ठेवले होते.

2 ऑगस्ट रोजी ती यवतमाळहून वरुडकडे जाणाऱ्या बसमध्ये चढली. या प्रवासात तिच्या शेजारी एक अनोळखी महिला बसली होती. प्रवासादरम्यान या अज्ञात महिलेने संधी साधून पर्समधून दागिने लंपास केले. तक्रारदार महिला वरुड बस डेपोत उतरून जयस्तंभ चौकात पोहोचल्यावर तिने पतीला फोन करण्यासाठी पर्स उघडली असता, पर्सची चेन उघडी असल्याचे आणि दागिने गायब असल्याचे लक्षात आले. घटनेची माहिती तिने तत्काळ राजापेठ पोलिसांना दिली. पोलिसांनी अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. बसमधील सीसीटीव्ही फुटेज, प्रवाशांची माहिती आणि बसस्थानक परिसरातील तपासणी सुरू आहे.

## सनातन धर्मावरुन राजकीय रणधुमाळी

### नितेश राणेंचा जितेंद्र आव्हाडांवर तीव्र पलटवार



**मोर्शी, ( दि. 3 ) -** सनातन धर्मावर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केलेल्या कथित वादग्रस्त विधानामुळे राज्यात नव्या वादाला तोंड फुटले असून, राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी आव्हाडांवर जोरदार पलटवार केला आहे. मोर्शी येथे पत्रकारांशी बोलताना राणे म्हणाले, आव्हाड हे जिहाद्यांना खूश करण्यासाठी सनातन धर्मावर टीका करतात. त्यांच्या मतदारसंघात जिहाद्यांचे अड्डे असल्याने त्यांचे समाधान करण्यासाठीच हे वक्तव्य केले गेले असावे, असा गंभीर आरोप त्यांनी केला. राणे पुढे म्हणाले, कोणताही मुस्लिम वा ख्रिश्चन नेता आपल्या धर्माचा अवमान करत नाही. मग जितेंद्र आव्हाड कोणत्या अधिकाराने सनातन धर्माला शिवीगाळ करतात? दुर्दैवाची बाब आहे की, काही लोक हिंदू म्हणून जन्म घेऊन स्वत:च्या धर्मालाच शाप देतात. यासोबतच त्यांनी शरद पवार आणि सुप्रिया सुळेंना थेट प्रश्न विचारत म्हटले, त्यांना काय वाटतं? आव्हाडांच्या वक्तव्याशी ते सहमत आहेत का? या राजकीय वर्तुळात या प्रतिक्रियेने खळबळ उडाली असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर धर्माधिष्ठित वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### कारने टिप्परला दिली धडक

**अमरावती -** नांदगावपेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या टोल नाक्याजवळील दुसऱ्या लेनमध्ये उभ्या असलेल्या टिप्परला भरधाव कारने जोरदार धडक दिल्याची घटना घडली. अशोक धनराज रौलानी (वय 54, रा. गाडगेनगर, अमरावती) हे टिप्पर घेऊन टोल नाक्यावर थांबले होते. दरम्यान कार भरधाव वेगाने येऊन थेट टिप्परला आदळली.

# नीरज अर्बन को-ऑपरेटिव्ह निधीविरोधात अचलपूरात गुन्हा दाखल

### 40 लाखांनी फसवणुकी केल्याप्रकरणी सात संचालकांवर गुन्हे



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, ( दि.3 ) -** अचलपूर शहरातील विठ्ठलवाडी परिसरात नायरा पेट्रोल पंपासमोर कार्यरत असलेल्या नीरज अर्बन को-ऑपरेटिव्ह निधी या बेकायदेशीर आर्थिक संस्थेच्या माध्यमातून नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. परतवाडा येथील क्रेडिट मॅनेजर रंजना वसंतराव बुरंगे (वय 51) यांच्या तक्रारीवरून अचलपूर पोलिसांनी सात संचालकांविरुद्ध गंभीर कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

'अर्बन को-ऑप निधी लिमिटेड बँक' या संस्थेचे संचालक युवराज भगवान गीऱ्हे, निकिता गीऱ्हे (रा.अमरावती), आकाश प्रमोद बोबडे (रा.आसेगाव), प्रितम जनार्धन पडोळे ( रा.लाडकी), दीपक बाबाराव इंगोले (बडनेरा), तानाजी शरदराव ठोमर (बीडे) आणि आकाश राऊत या सात जणांनी केले. संस्थेच्या कायदेशीर अस्तित्वाचा खोटा दावा करून संचालकांनी नागरिकांना आकर्षक योजनांचे आमिष दाखवले. डेली डिपॉझिट, सेव्हिंग अकाउंट, आरडी आणि फिक्स डिपॉझिट अशा योजनांतून लोकांकडून मोठ्या प्रमाणावर पैसे गोळा केले. एकूण 266 खातेदारांची 40,09,246 इतक्या रकमेची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलम 316(5), 318(2), 318(4), 3(5), 409, 417, 420, 34 तसेच महाराष्ट्र वित्तीय संस्था हित संरक्षण अधिनियम 1999 अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

### बँक बंद करून संचालक फरार

संचालकांनी गुन्हा केल्यानंतर काही महिन्यांपूर्वी संस्थेचे बोर्ड काढून टाकले व बँक बंद करून ते फरार झाले. पोलिसांनी सांगितले की, ही फसवणूक 3 जानेवारी 2024 ते 8 एप्रिल 2025 या कालावधीत झाली असून 2 ऑगस्ट 2025 रोजी सायं. 6.46 वाजता गुन्हा दाखल करण्यात आला.

### फसवणुकीतील रकमेचा तपशील

| | |
|---|---|
| डेली डिपॉझिट | 13,02,550 |
| फिक्स डिपॉझिट | 25,05,000 |
| आरडी (रेकरींग डिपॉझिट) | 34,700 |
| सेव्हिंग अकाउंट | 1,32,414 |
| इतर रक्कम | 22,750 |

"मी दिनांक 8/10 /2024 ला निरज बँकेत डेली आरडीचे खाते उघडले होते दररोज संध्याकाळी एजंट कडे मी ते पैसे भरत होतो मार्च 2026 पर्यंत मी पैसे भरले 11800 रुपये जमा झालेले होते बँक बंद झाली तर आम्हाला त्याची माहिती सुद्धा नव्हती ती माहिती मिळाल्यानंतर आम्ही सदर बँकेच्या परतवाडा शाखेत गेलो तर त्यांनी आम्हाला पैसे देण्यास नकार दिला आमचा त्या बँकेची काही संबंध नाही असे सांगितले मग आम्ही अचलपूर पोलीस स्टेशन मध्ये गेलो त्या ठिकाणी आमच्याकडून लिहून घेण्यात आले

**संजय लहाने,**
**कुलस्वामिनी कलेक्शन, अचलपूर.**

"माझे नीरज बँक शाखेत डेली आरडीचे खाते होते एजंट मार्फत पैसे जमा केले जेव्हा पैसे काढायचे म्हटले त्याच वेळी बँकेचे काम सुरू आहे असे अचलपूर येथील शाखा मॅनेजर अग्रवाल यांनी सांगितले काही दिवसांनी बँक शाखा बंद झाली माझे दहा हजार रुपये जमा होते मला माझे पैसे परत मिळावे.

**रुपेश मिश्रा,**
**अचलपूर.**

# 18 वर्षीय युवकाच्या सतर्कतेमुळे वाचले 45 प्रवाशांचे प्राण

### एसटी बसच्या टायरची पिन निघाली; मोठा अपघात टळला



**महासागर प्रतिनिधी**

**टाकरखेडा संभू, ( दि. 3 ) -** अमरावती-आष्टी मार्गावर रविवारी (दि. 3) दुपारी 12 वाजताच्या सुमारास टाकरखेडा संभू परिसरात एक मोठी दुर्घटना टळली. एसटी बसच्या मागील टायरची कॉटर पिन निघाल्याने दोन्ही टायर मार्गातून बाजूला निघू लागले होते. यावेळी 18 वर्षीय युवक प्रणव अजय काळे याच्या सतर्कतेमुळे 45 प्रवाशांचे प्राण वाचले. प्रणव काळे हा शेताकडे जात असताना त्याच्या नजरेस बसचे टायर सैल होत असल्याचे दिसले. त्याने तातडीने प्रसंगावधान राखत बसच्या ड्रायव्हरचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र, आवाज पोहोचत नसल्याने त्याने जवळच्याच डबक्यातील पाणी घेत काचेला जोरात फेकले. ड्रायव्हरने बस थांबवताच प्रणवने टायर निघाल्याची माहिती दिली. यामुळे मोठा अपघात टळला आणि बसमधील सुमारे 45 प्रवाशांचे प्राण वाचले. घटनेनंतर प्रवाशांनी प्रणवचे मनापासून आभार मानले आणि त्याच्या सूजाणतेचे कौतुक केले. अपघाताच्या भीतीने काही महिला प्रवाशांनी पुढचा प्रवास न करता गावात परतण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, एसटी बसच्या देखभालीबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. कारण यापूर्वीही वलगाव, वायगाव आणि आष्टी मार्गांवर अशाच प्रकारे टायर निघण्याच्या पाच ते सहा घटना घडल्याचे स्थानिकांनी सांगितले. एसटी महामंडळाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.

### रेल्वे रुळावर अपघातात युवकाचा मृत्यू

**अमरावती -** बडनेरा रेल्वे रुळावर झालेल्या अपघातात अनिकेत प्रदीप धानके (वय 29, रा. प्रशांतनगर, अमरावती) या युवकाचा मृत्यू झाला. ही दुर्घटना 3 ऑगस्ट रोजी घडली असून, सकाळी 10.30 वाजता त्याला अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषीत केले. अपघातानंतर सुरुवातीला त्याला एका खासगी रुग्णालयात नेण्यात आले होते. परंतु गंभीर प्रकृतीमुळे त्याला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले. अपघात कशामुळे झाला याबाबत अद्याप स्पष्ट माहिती मिळालेली नाही. बडनेरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून, पुढील तपास सुरू आहे.

# ट्रकच्या धडकेत महिला ठार; समर्थ हायस्कूल चौकात अपघात

- कामावर निघालेल्या महिलेला ट्रकची जोरदार धडक
- रुग्णालयात नेले, पण मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले

**अमरावती, ( दि. 3 ) -** रविवारी (3 ऑगस्ट) सकाळी साडेदहा वाजता अमरावतीतील समर्थ हायस्कूल चौकात ट्रकच्या धडकेत एका दुचाकीस्वार महिलेचा मृत्यू झाला. संगीता वसंत बोरकर (वय 52, रा. साईनगर) असे मृत महिलेचे नाव आहे.

संगीता बोरकर या आपल्या दुचाकीने (एमएच 15 जीटी 4183) साईनगर येथून राजकमल चौकाकडे कामावर जात होत्या. दरम्यान, मागून आलेल्या ट्रकने (एमएच 27 एक्स 4270) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक लागल्यानंतर त्या रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाल्या. आसपासच्या लोकांनी त्यांना लगेच जवळच्या खासगी रुग्णालयात नेले. नंतर दुसऱ्या रुग्णालयात हलवण्यात आले, पण डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या अपघातामुळे परिसरात थोडा वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेनंतर मिलिंद वाढोणकर (वय 40, रा. महावीरनगर) यांनी राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून पोलिसांनी ट्रकचालकावर गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# ईडीचा गैरवापर

**सर्वोच्च न्यायालयाने राजकिय हेतुसाठी इडिचा वापर नको असे म्हटलेले आहे. ईडी हि स्वायत संस्था असुन केंद्र सरकारच्या अखात्यारीत येते. तिची स्थापन १ मे १९५६ रोजी करण्यात आली. प्रामुख्याने परकिय मुद्रा व्यवस्थापन अधिनियम (१९९९ फेमा) आणी संपत्ती निवारण अधिनियम (२०२०) या कायद्याची अंमलबजावणी करण्याचे कार्य ईडिच्या माध्यमातून केल्या जाते. मात्र अलीकडील काळात ईडँचा वापर करुन विरोधि पक्षांचा नेत्यांचा खातमा कश्या प्रकारे केल्या जाईल याचा प्रामुख्याने विचार केल्या जात आहे. ईडिच्या धाकामुळे अनेकांना घाम फूटलेला आहे.अनेक राजकिय व्यक्तींनी ईडिच्या भितीने पक्ष प्रवेश केलेला आहे.**

--------------

संपूर्ण देशात बेहोशिबी मालमाला आणी करोडोंच्या घोटा ळ्यांचा तपास ईडि हि केंद्र सरकारची तपाक यंत्रणा करते. गेल्या १० वर्षात अशा अनेक घोटाळ्यांचा तपास ईडीने केला. मात्र एक पथ्य पाडल्या गेले ते हे की, ईडीने प्रामुख्याने विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या कार्यालयावर धाडी टाकल्या.

सत्ताधारी पक्षाचे नेते या धाडसत्रापासून दूर राहिले. त्यामूळे केवळ ईडी हि संस्था केवळ विरोधकांना नामोहरम करणारी केंद्रिय तपास यंत्रणा आहे का? असा आक्षेप येऊ लागला. यात तथ्यही दिसुन आले.

सोनिया गांधी, राहुल गांधी, फारुक अब्दुला, अरविंद केजरीवाल, हेमंत सोरेन, मनिष सिसोदिया या सारख्या नेत्याना नामोहरम करण्यासाठी ईडीचा वापर करण्यात आलाः अनेकांना जेल मध्ये जावे लागले. सूप्रीम कोर्टाने जमानतीवर काहिंना सोडले तर काहीना पूरेश्या पूराव्या अभावी सुप्रीम कोर्टाकडून दिलासा मिळाला.

आजपर्यंत इडिने ज्यांची कार्यवाही केली. त्यात दोषसिद्धीचे प्रमाण फार कमी असल्याचे दिसून आले आहे. जर दोषसिद्धीचे प्रमाण कमीअसेल तर ईडीची तपास यंत्रणा चौकशी बरोबर करीत नाही असा याचा सरळ सरळ अर्थ होतो.

पक्षांतर केल्याबरोबर अनेकांची ईडी चौकशी बंद झाल्याचे उदाहरणे आहेत. याचा अर्थ असा की, ईडी, सिबिआय, इन्कम टॅक्स या शासकिय संस्थाचा वापर केवळ राजकिय हेतूने केल्या जात आहे. सत्ताधारी पक्षाच्या कोणत्याही नेत्यांची ईडीकडून चौकशी केली जात नाही.सत्ताधारी पक्षाचे लोक पूर्णपणे प्रामाणिक आहेत का? ते भ्रष्ट्राचारी नाहीत का? त्यांनी वाममार्गाने पैसा कमविला नाही का? असे प्रश्न जनतेच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे.

महाराष्ट्राची सत्ता ईडिचा दबावतंत्रामुळेच भाजपा आघाडी कडे हस्तातरीत झाली.असा आरोप सातत्याने केला गेला. यात तथ्यही आहे. सन २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत कोणत्याही पक्षाला बहुमत मिळालेले नव्हते. जोड-जंतर करुन महाराष्ट्रात शिवसेना - काँग्रेस -राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार सत्तेवर आले. मात्र अडिच वर्षात महाविकास आघाडीचे ठाकरे सरकार कोसळले.

एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यामुळे शिवसेना फुटली अजित पवारांच्या बंडामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचा एक गट वेगळा झाला. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नवे सरकार गठीत झाले. त्यापूर्वी अजित पवार, प्रफुल पटेल, सुनिल तटकरे यांना इडिच्या नोटिस प्राप्त झाल्या होत्या.

अजित पवारांनी शिखर बँकेत सत्तर हजार कोटींचा घोटाळा केला आहे. असा आरोप झाला. प्रफुल पटेल केंद्रात नागरी उड्यान मंत्री असताना परदेशी विमान कंपन्याना फायदा मिळवून देण्यासाठी आर्थिक परिस्थिती योग्य नसताना ७० हजार कोटींची विमानाची खरेदी केली होती, एयर इंडिया व इंडियन एअरलाईन्सचे विलगीकरण हाही एक मुद्धा होता.

ईडीने जून २०१९ मध्ये प्रफुल पटेल यांना नोटिस दिली होती. अश्या पद्धतीने नवाब मलिक, अनिल देशमुख ,सुनिल तटकरे, छगन भुजबळ , या सारख्या अनेक नेत्यांना भ्रष्टाचाराच्या प्रकरणात अडविण्याचा प्रयत्न झाला होता.

परिणामतः चौकशी पासुन दूर राहण्यासाठी व आपल्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप पुसून टाकण्यासाठी पक्षबदल हा नवा मुद्दा पूढे आला. ज्या राजकीय नेत्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले त्यां नेत्यांनी पक्ष बदलविल्यामुळे त्यांची चौकशी थांबविली गेली. त्यातून बऱ्याच लोकांची निर्दोष मुक्तता झाली.

जेलमध्ये जाण्यापेक्षा पक्षबदल बरा असा नवा विचार रूढ झाला अनेक राज्यातील सरकारे ईडिचा दबावतंत्रामुळे कोसळली. कर्नाटक मध्ये कुमारस्वामीचे सरकार असताना १७ आमदारांनी राजीनामे दिले. झालेल्या पोटनिवडणुकीमध्ये भाजपाचे १३ आमदार निवडून आले.

सत्ताधारी कुमाररस्वामीचे सरकार पडले आणि भाजपाची कर्नाटक मध्ये सरकार स्थापित झाली होतीः ऑपरेशन लोटस यशस्वी झाले होते. गुजरात राज्यात राज्यसभेची निवडणूक होती. कॉंग्रेसचे आमदार फूटू नयेत म्हणून ४६ आमदारांना कर्नाटकातील एका हॉटेलमध्ये कर्नाटकाचे उपमुख्यमंत्री डि.के. शिवकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ठेवण्यात आले होते. त्यानंतर लगेचच डि.के. शिवकूमार यांच्यावर ईडीची छापेमारी झाली होती. ही कार्यवारी राजकीय सूडापोटीच झालेली होती, अशी ओरड बघायला मिळाली.

नितीन गोहने
रा. हिरापूर, ता. सावली
जि.चंद्रपूर.
8275393387

खरेतर आज लोकशाहीची मूल्ये पायदळी तूडविली जात आहेत. व्यक्ती स्वातंत्र्याची गळपेची केल्या जात आहे. सरकारच्या चुकीच्या धोरणांवर टिका करणे म्हणजे अपराध समजल्या जात आहे. सरकारच्या विरोधात बोलणार्यांचे तोंड बंद केल्या जात आहे.

केंद्रिय तपास यंत्रणाचा गैरवापर लोकशाही शासन व्यवस्थेसाठी धोकादायक ठरू पाहत आहे. भविष्य काळात विरोधी राजकिय पक्ष जिवंत राहतील किंवा नाही अशी शक्यता आहे.

दिवसागणिक भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. विरोधी पक्षाचे नेते इडी, सि.बि.आय. इन्कम टॅक्स या शासकिय संस्थाना घाबरलेले आहेत.

आज बेरोजगारांचा प्रश्न आहे. महागाई, शेतकरी आत्महत्या, विज, महिलांवरील अत्याचार, आरोग्य, शिक्षण, रस्ते, ईमारती या सारख्या अनेक प्रश्नांनी समाजमन ठवळून निघाले आहे. ग्रामीण भागातील शाळा पडलेल्या आहेत. त्या शाळा लवकर कशा रितीने बांधता येईल याचे सरकारजवळ नियोजन नाही.

गरीबांची पोरे शासकीय शाळेत उघड्यावर, भर पावसात ओले होत शिक्षण घेत आहेत, यावर बोलायला कुणाला वेळ नाही, चांगल्या पायाभूत सुविधा निर्माण कश्या पध्दतीने निर्माण करता येईल याचा विचार होतांना दिसत नाही. अजूनही ग्रामीण भागातील लोकांना उत्तम आरोग्याच्या सुविधा मिळालेल्या नाहीत.

जिल्हा स्तरावरील रुग्णालयात आधूनिक उपकरणे अजूनही उपलब्ध नाहीतः सामाजीक समस्यांची यादी खूप मोठी आहे.याकडे लोकप्रतिनिधिचे लक्ष्य नाही. याला फसव, त्याला फसवा हा खेळ खेळल्या जात आहे. एकमेकांवर आरोप कण्यात वेळ वाया जात आहे.

ईडी, सी.बी.आय. व इन्कमटॅक्स यावर आता लोकांचा विश्वास राहिलेला नाही, नॅशनल हेराल्ड घोटाळा, आय.डि.बि.आय घोटाळा, २ जी घोटाळा, चिटफंड घोटाळा, आदर्श घोटाळा, रॉबर्ट वढेरा जमीन प्रकरण, रोज व्हॅल्यू केस, कोहीनूर स्ववेअर घोटाळा, महाराष्ट्र सदन घोटाळा, या सारख्या घोटाळ्याची चौकशी ईडीच्या माध्यमातून केल्या गेली.

बऱ्याच राजकीय व्यक्तींची यात चौकशी झाली. मात्र एवढे करुनहीं दोषसिद्धीचे प्रमाण कमीच राहिले. त्यामूळे अनेकांचा ईडी या तपास यंत्रणेवरील विश्वास कमी होऊ लागल्याचे चित्र निर्माण झाले. ही राजकीय तपास यंत्रणा आहे, असा विचार समाजमनात निर्माण झाला. सर्वसामान्य जनतेला न्यायालयापासून आज मोठ्या अपेक्षा आहेत.

राजकीय नेत्यांना खोट्या प्रकरणात अडकविण्याचा प्रयत्न सुरु आहे.

सर्वोच्च न्यायालयाने नूकतेच ईडीने कान टोचले आणि फटकारले. हे बरे झाले. ईडीचा वापर राजकिय स्वाथीर्साठी नको. राजकारणाची लढाई मतदारांसमोर लढायला पाहिजे. राजकीय लढाया न्यायालयाबाहेर लढल्या गेल्या पाहिजेत, असा निष्कर्ष सुप्रीम कोर्टाने काढलेला आहे. त्यामुळे आता पुढील काळात ईडीचा वापर कमी होईल, अशी अपेक्षा आहे.

मागील काळात ईडीचे प्रमूख संजय कुमार मिश्रा यांना केंद्रिय सरकारने चार वेळा बढती दिलेली होती, एखादा अधिकारी निवृत्त झाल्यानंतर त्याला चार-चार वेळा बढती देण्याचे कारण काय होते? असा प्रश्न त्यावेळेला विचारण्यात आला होता. काँग्रेसचे नेते रणदिप सूरजेवाला, जया ठाकूर, तृणमूल काँग्रेसच्या नेत्या महुआ मोईन्ना यांनी संजयकुमार मिश्रा यांच्या बढतीवर आक्षेप घेत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

शेवटी सर्वोच्च न्यायालयाने यात निकाल देऊन संजयकुमार मिश्रा यांना ईडी संचालक पदावरून कमी केले होते. एखाद्या इसमावर इतकी मर्जी का? यांचे उत्तर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे मिळाले. आता सर्वोच्च न्यायालयाने ईडिला फटकारल्यामुळे ईडीचा गैरवापरू भविष्यात थांबेल अशी अपेक्षा करू या.

एक मात्र खरे विरोधी राजकीय नेत्यांनी सत्ताधारी पक्षांवर टीका करताना स्वतः प्रामाणिक असणे आवश्यक आहे. नाहीतर एकनाथ खडसे यांचे जावयांना जसे फसविल्या गेले तसे स्वतःची फसवणूक स्वतः करून घेणे सारखे होईल. अशी आज स्थिती आहे.

# लोकसंख्या नियंत्रण विधेयकाची गरज!

देशात २०११ पासून जनगणना झाली नाही, ती पुढील वर्षी ऑक्टोबर २०२६पासून प्रारंभ होईल. संयुक्त राष्ट्र संघाच्या २०२३ साली केलेल्या अहवालानुसार भारताची लोकसंख्या ही जुलै २०२३साली चीनला मागे टाकून जगात अव्वल स्थानी आली आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा ३५ कोटीच्या जवळपास होती ती आज १४४ कोटींचाही आकडा पार करून गेली आहे. जगाच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत देशाची लोकसंख्या ही अठरा टक्के आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या अंदाजानुसार जगाची लोकसंख्या२०५० पर्यंत आठ ते चौदा अब्जा दरम्यान स्थिर होईल आणि त्यापैकी नव्वद टक्काहून अधिक लोकसंख्या ही गरीब देशात असेल. असेच काहीसे चित्र आज जगातून दिसून येत आहे.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८

कांगो, इजिप्त, नायजेरिया, पाकिस्तान, फिलिपाईन्स आणि टांजानिया या गरीब देशात लोकसंख्या वेगाने वाढत आहे. या उलट जगाला सतत भीतीच्या छायेखाली ठेवणारे उत्तर कोरियाचे हुकुमशहा किम जोंग उन यांनी महिलांना अधिक मुले जन्माला घालण्याचे एका कार्यक्रमात आवाहन केले होते.

हे आवाहन करताना ते भावुक झाल्याचा व्हिडिओ मध्यंतरी सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. कारण त्या देशात जन्मदरात मोठी घसरण झाली आहे. उत्तर कोरियातील जन्मदर २०२३ मध्ये सरासरी १. ८ टक्के राहिला आहे.तर दक्षिण कोरियाचा प्रजनन दर गेल्या काही वर्षात निचांकी पातळीवर म्हणजेच ०. ७८ टक्क्यापर्यंत घसरला. तसेच विकसित राष्ट्र म्हणून रशियाची परिस्थिती ही फार वेगळी नाही.

रशियाच्या घटत्या प्रजनन दराबाबत त्या देशातील महिलांनी सात ते आठ बालके जन्माला घालण्याचा अजब सल्ला राष्ट्रपती ब्लादीमर पुतिन यांनी दिला होता . विकसित राष्ट्रांपुढे घटत्या लोकसंख्येचा मोठा प्रश्न आहे, तर या उलट भारतासारख्या देशाला वाढती लोकसंख्या व त्याच्या दुष्परिणामाला सामोरे जावे लागत आहे.

मागील दशकात नक्षलवाद आणि दहशतवाच्या संबंधित देशाची मोठी समस्या होती ती आता काही प्रमाणात मागे पडली असून सध्या देश हवामान बदलांच्या संकटाशी सामना करीत आहे.आज हवामान बदलांच्या समस्येमुळे भूकंप, अतिवृष्टी, चक्रीवादळ,हिमपर्वते वितळणे,अवकाळी पाऊस, गारपीट, तीव्र जल संकट, तापमानवाढ, जल, भूमी, वायु, ध्वनी प्रदूषण आदीं सारख्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचा थेट संबंध वाढत्या मानवी लोकसंख्येशी होतो.

आज देशातील प्रचंड लोकसंख्या वाढीमुळे नैसर्गिक संसाधनावर दबाव पडत आहे. आर्थिक गतीच्या वाढीसाठी जमीन, जलसाठे, जंगले याचा वापर कच्च्या मालासाठी केला जातो आणि हे सर्व मर्यादित स्वरूपातच आहे. या साधनांच्या अमर्याद वापरावर निर्बंध आणायचे असतील, तर तातडीने लोकसंख्या वाढीवर बंधने आणावे लागतील. झपाट्याने वाढणारी लोकसंख्या ही निसगार्ला न झेपणारी झाली आहे.

नैसर्गिक साधन संपत्तीचा कितीही उपसा केला तरी मानवाच्या गरजा अपूर्णच राहतात. विद्यमान परिस्थितीत मोठ्या प्रमाणात औद्योगीकरण वाढत आहे.आज प्रत्येक नागरिकाची गरज पूर्णतः औद्योगीकरणातून पूर्ण होताना दिसते. औद्योगीक विकासामध्ये खनिज संपत्तीचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो. या संसाधनाची निर्मिती भूगर्भात व्हायला शेकडो वर्ष लागतात. आज जमिनीच्या पोटातून जेवढे उपसता येते तेवढे उपसून घ्या! हीच मानवाची स्वार्थनीती भवितव्य अंधकारमय व विनाशकारी करणारी ठरते.

बेसुमार लोकसंख्या वाढीच्या विपरीत परिणाम केवळ निसर्गावरच होतो असे नव्हे, तर त्याची झळ प्रत्येक व्यक्तीला व त्याच्या कुटुंबाला पोहोचत आहे. हवामान बदलाची समस्या पृथ्वीची नसून मानवाची आहे. निसर्गात मानवाने अक्षम्य ढवळाढवळ केल्यामुळे हे संकट ओढाउन घेतलेल आहे .

मानवाच्या या स्वार्थी धोरणामुळे आज अन्य प्रजातीचे जीवन धोक्यात आले आहे. मानव हेच या ग्रहाचे एकटे लाभार्थी नाहीत. विकास हा मानव जातीसह इतर जीव प्रजातीसही शाश्वताकडे घेऊन जाणारा असायला हवा.

आज नैसर्गिक संसाधनाचा वापर कमीत कमी करून पर्यावरण पुरक जीवनशैली मानवाने स्वीकारला हवी. दिवसेंदिवस वाढवणारी लोकसंख्या मोठ्या शहरांकडे आकर्षित होत आहे. शहरांमध्ये राहून चांगले जीवनमान जगू शकतो ही मानसिकता शहरांच्या इकोसिस्टीमवर व सोयीसुविधेवर दबाव आणणारी ठरत आहे.

आज कितीही नवीन तंत्रज्ञान विकसित केले तरी लोकसंख्या वाढ उपलब्ध पर्यावरणीय संसाधनावर पुढे टिकून शकत नाही. देशातील लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम केवळ पर्यावरणात पडतात असे नव्हे, तर मानवी उत्कषार्ला लागलेले एक ग्रहण आहे.

आज एका घराची कल्पना करा,समान संसाधने परंतु कुटुंबातील सदस्यांचे घातांक वादीमुळे कोणती सुविधा कोणाला देता येईल हा प्रश्न आपल्याला पडत नाही का? याचा विचार प्रत्येक जबाबदार नागरिकांनी, लोकप्रतिनिधींनी करण्यास भाग पडावे लागते.

वाढती लोकसंख्या मूलभूत सुविधा, निरक्षरता, गरीबी, बेरोजगारी, महागाई, कृषी क्षेत्राची वाताहात, सामाजिक विषमता, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, कायदा सुव्यवस्था, न्यायालयीन खटल्यांचा बोजा, कारागृहावर वाढलेला ताण,इलेक्ट्रॉनिक कचऱ्यांची समस्या आदी समस्यांचा काळोख केवळ लोकसंख्या वाढीमुळे गडद होत आहे.

आज देशातील पर्यावरणीय व मानवी समस्यांची सोडवणूक केवळ लोकसंख्या नियंत्रणातच आहे. देशाच्या वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी लोकसंख्या नियंत्रण विधेयकाची आज खरी गरज आहे.

आपल्या पुढच्या पिढीचे उज्वल भविष्य सुव्यवस्थापित, सुरक्षित व निरोगी असावे असे सुनिश्चित करण्यासाठी नागरिकांनी लोकसंख्या नियंत्रण विधेयकाची मागणी केली पाहिजे. संविधानाच्या मूलभूत अधिकारासंबंधी जगण्याचा अधिकार दिला आहे. तो अबाधीत व सुव्यवस्थित ठेवणे हे शासनाचे आद्य कर्तव्य आहे. व त्याला सहकार्य करणे आपली नैतिक जबाबदारी आहे.

देशातील प्रत्येक नागरिकाच्या जीवनाचा दर्जा व उच्च आनंद निर्देशांक हवा असल्यास लोकसंख्या वाढ नियंत्रणासाठी देशातील प्रत्येक नागरिकांनी व लोकप्रतिनिधी लोकसंख्या नियंत्रण विधेयकाची मागणी करायला हवी. येणाऱ्या काही दशकांमध्ये लोकसंख्येच्या नियत्रित करणे काळाची गरज बनली आहे.

# रिल्सच्या नाद न परवडणारा!

शहरासारख्या ठिकाणी हातात स्मार्ट फोन नाही असा तरुण आज शोधूनही सापडणार नाही. इंटरनेटचा डाटा पॅकही परवडणारा असल्याने प्रतिदिन २ जीबी मिळणारा डाटा आजचा तरुण कामासाठी कमी आणि मनोरंजनासाठीच अधिक व्यय करताना दिसतो.

ऑनलाईन गेम्स खेळण्यासोबतच आजच्या पिढीला वेड लागले आहे ते रिल्स पाहण्याचे. आजमितीला इंस्टाग्राम आणि युट्युबवर विविध विषयावरील कोट्यवधी रिल्सचे भांडार उपलब्ध आहे. खास प्रौढांसाठी तयार करण्यात आलेले रिल्सही आज वयाची कोणतीच अट न बाळगता सहजपणे सर्वांना पाहता येतात.

अशा रिल्समध्ये शिव्यांचा आणि अश्लील शब्दांचा मुक्तपणे वापर तर असतोच शिवाय अशा रिल्स बनवणाऱ्या तरुणी अंगप्रदर्शन करून रिल्सवर प्रतिदिन लाखो लाईक्स कमावत असतात. मनोरंजनासाठी तयार करण्यात आलेल्या, विनोदी मसाला असलेल्या, द्विअर्थी संवादांचा भरणा असलेल्या आणि अश्लील कंटेंट असलेल्या रिल्स पाहण्यात आजचा तरुण अधिक रुची दाखवत असल्याने अशा प्रकारच्या रिल्स बनवणाऱ्या युट्युबर्सची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

ठराविक सबस्क्राइबर झाल्यावर, रिल्सना ठराविक लाईक्स आणि शेअर्स मिळाल्यावर ते बनवणाऱ्यांना आर्थिक कमाईसुद्धा होत असल्याने रिल्स बनवणाऱ्यांची संख्या आज वारेमाप वाढली आहे. काहींना तर रिल्स बनवण्याचे जणू व्यसनच लागले आहे. शहरासारख्या ठिकाणी रेल्वे स्थानक असो वा बस स्टॅन्ड, भाजी मंडई, शॉपिंग मॉल सर्वत्रच तरुण मुलामुलींची टोळी रिल्स बनवताना कोणत्या ना कोणत्या कोपऱ्यात दिसून येते.

साताऱ्यातील पाटण तालुक्यात गुजरवाडी येथील टेबल पॉइंटवर मित्रांसोबत रील बनवण्यासाठी स्टंट करताना साहिल जाधव नावाचा तरुण कारसह ३०० फूट दरीत कोसळला ज्यामध्ये तो गंभीर जखमी झाला. या घटनेचा व्हिडीओ नुकताच सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

मागच्याच आठवड्यात एक रील व्हायरल झाली होती ज्यामध्ये एक तरुण बाईकवर स्टंट करण्यासाठी बाइकचा पुढचा ब्रेक मारून ती पाठून उचलण्याच्या प्रयत्न करतो आणि तोंडावर आपटतो. बाईक त्याच्या पाठीवर कोसळते. सदर युवकाची पाठीची हाडे मोडून तो कायमचा जायबंदी झाला आहे.

एक १७ वर्षीय मुलगा मित्राला रील बनवण्यासाठी सांगून खाणीतील पाण्यात उडी मारतो. पाण्याचा अंदाज न आल्याने बुडू लागतो म्हणून रील बनवणारा मित्र गावातील लोकांना फोन करून बोलावतो मात्र ते येईपर्यंत पाण्यात उडी मारणाऱ्या मित्राचा मृत्यू होतो.

ही सारी घटना व्हिडीओमध्ये कैद झाली. नाशिक-छत्रपती संभाजीनगर राज्यमार्गावर चांदोरी शिवारातील नागापूर फाटा येथे एक डंपर चालक गाडी चालवताना रील बनवत होता रिलच्या नादात त्याने एका ११ वर्षीय शाळकरी मुलीला चिरडले. या साऱ्या घटना मागील महिनाभरातील आहेत.

रिल्स बनवण्याच्या नादाने वेड्या झालेल्या एका तरुणीने तिच्या पतीचा जीव घेतल्याची घटना मध्यंतरी वाचण्यात आली होती. रिल्स बनवून सोशल नेटवर्किंग साईट्सवर अपलोड करण्याची पत्नीला लागलेली सवय काही केल्या सुटेना. पत्नीच्या रिल्सवर सोशल साईट्सवर प्रतिदिन येणा?या अश्लील कमेंट्समुळे हैराण झालेल्या पतीने अखेर आत्महत्त्या केली. रिल्सच्या नादाने एका तरुणाचा नाहक बळी गेला. शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनी, विवाहित तरुणी विविध गाण्यांवर अंगविक्षेप करत रिल्स बनवतात आणि त्या इंस्टाग्राम आणि युट्युबवर अपलोड करतात.

अशा रिल्सवर येणाऱ्या आंबट शौकिनांच्या कमेंट्स वाचून या तरुणींच्या आई वडिलांना, जवळच्या जिवाभावाच्या नातेवाईकांना काय वाटत असेल, याचा विचार या तरुणी करणार आहेत का? रिल्स बनवण्याच्या आहारी गेलेला मोठा वर्ग आज समाजात पाहायला मिळतो आहे. अशा तरुण-तरुणींना रिल्स बनवताना आपण कुठे वावरत आहोत, आजुबाजुने जाणारे लोक आपल्याकडे पाहून काय विचार करत असतील, त्यापैकी आपल्या कोणी परिचयाचे किंवा नातेमंडळीतील आहेत का याचे जराही भान नसते किंबहुना त्याची त्यांना पर्वाही नसते.

रिल्सच्या आहारी गेलेल्या या मंडळींना आपला हा नाद आपल्याला वास्तव जगतापासून दूर घेऊन जात आहे याचे जराही भान नसते. युट्युबवर रिल्स आणि व्हिडीओ बनवून लक्षावधी फॉलोअर्स आणि युजर्स गोळा केलेले अनेक युट्युबर्स आज युट्युबकडून प्रतिमास लाखो रुपये वेतन घेत आहेत.

यापैकी कितीतरी जण सातवीची परीक्षाही उत्तीर्ण झालेले नाहीत. सध्याच्या युगात यशस्वी व्हायचे असेल, प्रसिद्धी मिळवायची असेल आणि पैसा कमवायचा असेल, तर त्यासाठी शिक्षण अनिवार्य नसून लोकांना आवडतील अशा रिल्स बनवता आले पाहिजे असा चुकीचा संदेश आजच्या तरुण पिढीवर बिंबु लागला आहे. आई बाबांनी ज्यांची कधी नावेही कुठे ऐकली अथवा वाचली नाहीत असे युट्यूबर्स आजच्या पिढीच्या गळ्यातील ताईत बनू लागले आहेत. त्यामुळे शालेय जीवनापासूनच विद्यार्थी रिल्स बनवून ते अपलोड करू लागले आहेत.

रिल्समध्ये सायकल्सवर, बाईक्सवर केलेले स्टंट पाहून ते स्वतः करण्याचा प्रयत्न करू लागले आहेत आणि त्या नादात स्वतःचे हातपाय तोडून घेऊ लागले आहेत. तरुणांकडून पैसे उकलण्याचा उद्देशाने तयार केलेल्या अश्लील रिल्सच्या नदी लागून अनेक तरुण आज आर्थिक फसवणुकीला बळी पडू लागले आहेत. केवळ तरुण वगार्लाच नव्हे, तर शालेय विद्यार्थ्यांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांनाच आज रिल्स पाहण्याचे वेड लागले आहे. रिल्स पाहण्यात तासन तास कसे निघून जातात याचा पत्ताही लागत नाही. प्रतिदिन मनोरंजनाची एव्हढी आवश्यकता आहे का?

मनोरंजनाच्या नादात तरुणांचा बहुमुल्य वेळ रिल्स पाहण्यात वाया जात आहे. आजमितीला राष्ट्र आणि धर्म यासाठी तरुणांच्या योगदानाची आवश्यकता असताना आजचा तरुण रिल्सच्या आभासी दुनियेत आपल्या वेळेचा आणि क्रयशक्तीचा अपव्यय करू लागला आहे. विज्ञानाने केलेल्या प्रगतीमुळे आज सुखाची अनेक साधने आपल्या पायाशी लोळण घेत आहेत मात्र या सर्वांचा उपभोग घेत असताना आपण अनेक शारीरिक-मानसिक विकारांना आणि दोषांना निमंत्रण देत आहोत, स्वतःची हानी करून घेत आहोत हे आपल्या केव्हा लक्षात येणार ?

■ ■ ■

# अमेरिकेत एलियन अंडी कुठे दिसली, इशारा काय?




फ्लोरिडातील नद्या आणि तलावांच्या काठावर काही विचित्र गुलाबी रंगाची अंडी आढळली आहेत. ती पाहून लोक इतके घाबरले की त्यांना वाटले की ही अंडी एलियनची आहेत.

पण आता अधिकाऱ्यांनी सांगितले आहे की ही अंडी कोणत्याही एलियनची नसून एका अतिशय धोकादायक परदेशी गोगलगायीची आहेत.

हे गोगलगाय पिकांचे आणि जलचरांचे सर्वात मोठे शत्रू आहेत. त्यांच्या अंड्यांमध्ये विष असते आणि ते धोकादायक जीवाणू आणि विषाणू देखील पसरवू शकतात. यामुळे मानव खूप आजारी पडू शकतात. म्हणून, त्यांना स्पर्श करण्यास मनाई आहे, विशेषतः मुले आणि पाळीव प्राणी त्यांच्यापासून दूर ठेवले पाहिजेत.

अमेरिकन वन्यजीव अधिकाऱ्यांनी सूचना दिल्या की या गोगलगायींना थांबवता येणार नाही. ते वेगाने पसरत आहेत. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला ही गुलाबी अंडी दिसली तर ताबडतोब अधिकाऱ्यांना कळवा.

■ ■ ■

## सेलिब्रेशन असावे, अवडंबर नको!

**वाचक लिहितात**


भारतीय संस्कृतीत उत्सवांना विशेष महत्व आहे. प्रदेशानुसार वर्षभर निराळे उत्सव, व्रतवैकल्ये करण्यात येतात. या सगळ्यांमध्ये चातुर्मासाला विशेष महत्त्व आहे. महाराष्ट्रात आषाढी एकादशी पासून पांडुरंगाचे दर्शन घेऊन सुरु झालेला व्रतवैकल्यांचा महोत्सव पांडुरंगाला प्रिय असलेल्या तुळशी विवाहापर्यंत सुरू असतो. या सगळ्यांमध्ये भारतीय संस्कृतीचे उच्चतम दर्शन होते.

आषाढी एकादशी, गुरुपौर्णिमा, नागपंचमी, नारळी पौर्णिमा, पोळा, गौरी-गणपती, महालय श्राद्ध, अश्विन नवरात्र, दसरा-दिवाळी इत्यादी सगळ्यांमध्ये ऋतू परिवर्तना सोबत होणाऱ्या मानवी जीवनाचा तसेच, निसर्गात होणाऱ्या बदलांचा विचार करून सणांची गुंफण केलेली आहे. या निमित्ताने मानवी स्वास्थ्य आणि नैसर्गिक स्वास्थ्य याचे संतुलन टिकून राहण्यासाठी अनेक निरनिराळ्या पद्धतीचे व्रत सांगितलेले आहे. परंतु, हल्ली या सगळ्यांकडे एका निराळ्या दृष्टिकोनातून बघण्यात येते. कोणी याला थोतांड समजून ते करू नका, यासाठी प्रपोगंडा करतात, तर कोणी आधुनिकतेचा आव आणून आरास, वेशभूषा, केशभूषा, अलंकार, यांकडे फॅशनच्या दृष्टिकोनातून बघतात आणि उत्सवातील पारंपरिक पद्धती केवळ औपचारिकता म्हणून राहतात.

आपल्या व्रतवैकल्यांमध्ये खूप गहन आशय आहे. त्याचा अभ्यास करून त्यानुसार आचरण करण्याची गरज आहे. याचा अर्थ असा नाही की, आरास आणि अन्य गोष्टींकडे दुर्लक्ष करा, परंतु मूळ उद्देशापासून भरकटू नका. शास्त्र जाणून घ्या आणि शास्त्राला धरून आवश्यक ती प्रत्येक कृती करा, सेलिब्रेशन असावे, अवडंबर नको. एवढेच सांगणे आहे!

■ सौ. प्रांजली विजय ब्रम्हे
नागपूर.

# गोड खाल्ल्यावर लगेच झोप का येते?



गोड पदार्थ खायला जवळपास सगळ्यांनाच आवडतात. पण तुम्ही कधी अनुभवले आहे का की, गोड खाल्ल्यानंतर लगेचच झोप येऊ लागते? अनेकांना हे केवळ एक गैरसमज वाटतो, पण यामागे काही वैज्ञानिक कारणे आहेत. गोड खाल्ल्यानंतर रक्तातील साखरेची पातळी वाढते, ज्यामुळे शरीरात काही हार्मोनल बदल होतात आणि सुस्तपणा येतो.

**वाढलेली ब्लड शुगर व इन्सुलिन**

मिठाईमध्ये जास्त प्रमाणात साखर असते. गोड खाल्ल्यानंतर शरीरातील रक्तातील साखर अचानक वाढते. या वाढलेल्या साखरेला नियंत्रित करण्यासाठी शरीर इन्सुलिन नावाचं हार्मोन सोडतं. इन्सुलिन साखरेला पेशींमध्ये घेऊन जाऊन ऊर्जेमध्ये रूपांतरित करतं. या प्रक्रियेसोबतच, मेंदूमधील असे हार्मोन वाढतात जे तुम्हाला आराम आणि झोप आल्यासारखं वाटायला लावतात.

**सेरोटोनिन हार्मोनची भूमिका**

आरोग्य तज्ज्ञांनुसार, गोड खाल्ल्यावर रक्तातील ट्रिप्टोफॅन नावाच्या अमिनो ॲसिडचं प्रमाण वाढतं. हे ट्रिप्टोफॅन मेंदूत जाऊन सेरोटोनिन नावाच्या न्यूरोट्रान्समीटरमध्ये बदलतं. सेरोटोनिनमुळे मूड चांगला राहतो आणि आराम मिळतो. हा हार्मोन मेलाटोनिन हार्मोनच्या निर्मितीलाही चालना देतो, जो झोपेचं नियमन करतो. म्हणूनच गोड खाल्ल्यावर शांत वाटतं आणि झोप येऊ लागते.

**ब्लड शुगर क्रॅश आणि थकवा**

गोड खाल्ल्यानंतर रक्तातील साखरेची पातळी जितक्या वेगाने वाढते, तितक्याच वेगाने ती खाली येते. यालाच ब्लड शुगर क्रॅश म्हणतात. जेव्हा रक्तातील ग्लुकोजची पातळी अचानक खाली येते, तेव्हा शरीर खूप थकून जातं आणि सुस्त वाटू लागतं. या थकव्यामुळेही झोप येते. त्यामुळे गोड खाल्ल्यानंतर येणारी झोप ही शरीरातील ऊर्जेच्या चढ-उतारांमुळेही येते.

**पचनक्रियेवरील ताण**

गोड पदार्थ खाल्लयावर शरीर ते पचवण्यासाठी जास्त ऊर्जा खर्च करतं. पचन होत असताना, रक्ताभिसरण पचनसंस्थेकडे जास्त होतं आणि मेंदूकडे कमी. यामुळे मेंदूला सुस्त वाटतं आणि झोप येऊ लागते. म्हणूनच, जेवण झाल्यावर किंवा गोड खाल्ल्यावर लगेचच आरामाची इच्छा होते.

**यावर उपाय काय?**

गोड खाल्ल्यावर लगेच झोप येण्यापासून वाचण्यासाठी गोड पदार्थ कमी प्रमाणात खा. आहारात फायबर आणि प्रोटीन असलेले पदार्थ जास्त घ्या, ज्यामुळे ब्लड शुगर नियंत्रणात राहते. गोड खाल्ल्यानंतर थोडं चालणं किंवा हलका व्यायाम केल्यास मदत होते. दिवसभर पुरेसं पाणी प्या आणि झोपेचं वेळापत्रक नियमित ठेवा. वारंवार गोड खाऊन झोपत असाल, तर ते तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### अती वृष्टी

ढग फुटी अतिवृष्टीने
केलाय कहर
बळीवर वेळ आलीया
घ्यायची जहर

ज्याच्या हाती नाही सत्ता
ते करताहेत पाहणी
क्रेडीट घेण्यासाठी उताविळ
आहेत धुर्त राजकारणी

शासनाने करुन पाहणी
विनाविलंब द्यावा आधार
बिनपगारी मुख्याधिकारी
करती राजकारण निराधार..

# रेनॉल्ट ग्रुपआपल्या आंतरराष्ट्रीय महत्त्वाकांक्षांनापाठबळ देण्यासाठी भारतातील स्थान करत आहे बळकट

**बोलोग्ने-बिलानकोर्ट, ३ ऑगस्ट :** रेनॉल्ट ग्रुप जगातील सर्वात गतिशील ऑटोमोटिव्ह बाजारपेठांपैकीएक असलेल्या भारतात आपल्या विकासाला अधिक गतीने चालना देत आहे. देशाला या क्षेत्रात एक प्रमुख आंतरराष्ट्रीय केंद्र बनवण्याच्या आपल्या धोरणाचा भाग म्हणूनसमूहाने चेन्नईतील निसान बरोबरच्या संयुक्त प्रकल्पातील (रेनॉल्ट निसान ऑटोमोटिव्ह इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आरएनएआयपीएल) निसानच्या उर्वरित ५१% हिस्याचे अधिग्रहण करत एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. यामुळे आता रेनॉल्ट ग्रुपकडेया प्रकल्पाची संपूर्ण मालकी आली आहे. आता आरएनएआयपीएल हे रेनॉल्ट ग्रुपच्या एकत्रित समग्र आर्थिक निवेदनांमध्येपूर्णतः समाविष्ट होईल.या व्यापक घडामोडीचा एक भाग म्हणजे एप्रिल महिन्यात जाहीर केलेले फ्रान्सच्या बाहेर असलेले रेनॉल्ट ग्रुपच्या सर्वात मोठ्या डिझाईन सेंटरचे उद्घाटन आणि न्यूरेनॉल्टट्रायबरचे सादरीकरण. न्यू रेनॉल्ट ट्रायबर हे महत्त्वाकांक्षी उत्पादन आघाडीतील पहिले मॉडेलअसून त्यामध्ये चार नव्या वाहनांचा समावेश असेल. कंपनीचा उद्देश भारतीय बाजारपेठेत आपली विक्री बळकट करणे आणि या प्रमुख औद्योगिक केंद्रातून निर्यात वाढवणे हा आहे. या परिवर्तनाला पाठबळ देण्यासाठी आणि ही धुरा सांभाळण्यासाठी स्टीफन डेब्लाईसहे १ सप्टेंबर २०२५ पासून भारतातील रेनॉल्ट ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारीम्हणून पदभार स्वीकारतील.

रेनॉल्ट ग्रुप भारताकडे आपल्या आंतरराष्ट्रीय विस्ताराला चालना देणारा महत्त्वपूर्ण घटक म्हणून पाहतो. रेनॉल्ट ग्रुपकडेआता कार्यक्षमता आणि गुणवत्ता यासाठी नावाजल्या जाणाऱ्या आपल्या चेन्नई येथील प्रकल्पाची पूर्ण मालकी आहे. हे धोरणात्मक पाऊल भारताला आंतरराष्ट्रीय वाढीचा प्रमुख आधार बनवण्याच्या समूहाच्या महत्त्वाकांक्षेला बळकटी देते.

रेनॉल्ट ग्रुपकडे भारतात एक प्रमुख अभियांत्रिकी केंद्र देखील आहे. ते निसानसोबत संयुक्त मालकीचे असून स्थानिक व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांच्या गरजेनुसार वाहने विकसित करण्यात आणि त्यांचे रूपांतर करण्यात सक्रिय भूमिका बजावत आहे.

इंटरनॅशनल गेम प्लॅन२०२७ या आपल्या धोरणाचा भाग म्हणून रेनॉल्ट ब्रँड ५०% पेक्षा अधिक लोकसंख्या २८वर्षांखालीलअसलेल्या या वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठेत आपले स्थान विस्तारायला चालना देत आहे. जगातील तिसर्याख क्रमांकाची सर्वात मोठी ऑटोमोटिव्ह बाजारपेठ असलेला भारत हा एक महत्वपूर्ण, निर्णायक प्रदेश आहे. नाविन्यपूर्णतेला येथे चालना मिळते. नव्या पिढ्यांसाठी हे प्रेरणास्थान आहेआणि ऑटोमोटिव्ह क्षेत्राच्या परिवर्तनातील एक प्रमुख महत्वाचाभागधारक देश आहे.

ही महत्त्वाकांक्षा चार नवीन मॉडेल्सच्या सादरीकरणासह एका मोठ्या उत्पादन साखळीमधून दिसून येते. याची सुरुवात न्यू ट्रायबरच्या सादरीकरणाने होत आहे.

या नव्या संदर्भात निसानसोबतची भागीदारी कायम राहील. विशेषतः मध्ये नियोजनाप्रमाणे निसानमॉडेल्सची निर्मिती सुरूच राहील.

भारत ही रेनॉल्ट ग्रुपसाठी एक महत्त्वपूर्ण बाजारपेठ आहे. गेल्या १४ वर्षांमध्येआम्ही आमच्या समर्पित भावनेने काम करणाऱ्याटीम्स आणि भागीदारांच्या मदतीने भारतात यशस्वीरित्यारेनॉल्टब्रँडप्रस्थापित केला असून दरवर्षी १००,००० हून अधिक वाहनांची विक्री साध्य केली आहे. आमच्या जागतिक संशोधन आणि विकास नेटवर्कमध्येभारताची भूमिका मोलाची आहे. चेन्नई येथील प्रकल्पाच्या संपूर्ण मालकीमुळेभारतात आमच्या वाढीला चालना देण्यासाठी आता आमच्याकडे सर्व साधने आहेत. स्टीफन डेब्लाईसयांना मोठा आंतरराष्ट्रीय अनुभव आणि आमच्या संपूर्ण मूल्यसाखळीची सखोल माहिती आहे. त्यामुळे या भागात आमचे धोरण आखण्यासाठी आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी ते अत्यंत योग्य व्यक्ती आहेत.असेरेनॉल्ट ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी फ्रॉंनकॉईस प्रोव्होस्ट यांनी सांगितले.

२०१० मध्ये सुरूवात झाल्यापासूनचेन्नई प्रकल्पात २.८ दशलक्षाहून अधिक वाहने तयार करण्यात आली आहेत. त्यापैकी १.२ दशलक्षहून अधिक वाहनांची १०० पेक्षा जास्त देशांमध्ये निर्यात करण्यात आली आहे. तसेच ४.६ दशलक्ष इंजिन आणि गिअरबॉक्सेसही तयार करण्यात आले आहेत. सुमारे ३०० स्थानिक पुरवठादारांच्यापाठबळावर या प्रकल्पाची वार्षिक उत्पादन क्षमता ४००,००० वाहनांहून अधिक आहे.

सध्या सीएमएफ-ए आणि सीएमएफ-ए+ या प्लॅटफॉर्म्ससाठी समर्पित असलेले हे केंद्र आता रेनॉल्ट ग्रुपचा नवीन अल्ट्रा-फ्लेक्सिबल, मल्टी-एनर्जी मॉड्युलर प्लॅटफॉर्म सादर करण्याची तयारी करत आहे. रेनॉल्ट ब्रँडच्या भविष्यातील मॉडेल्सच्याउत्पादनाला ते मजबूत करेल.

रेनॉल्ट ब्रँड भारतात सध्या ३५० पेक्षा अधिक विक्री केंद्रे आणि ४५० सेवा केंद्रांमार्फतकार्यरत आहे.

# भारतातील सर्वात मोठं ब्रँडेड लाईव्ह इव्हेंट, पोहोचलं कोलकात्यात

**कोलकाता, ३ ऑगस्ट :** हा फ्रेंडशिप डे, हाऊस ऑफ मॅकडॉवेल सोडा यारीला आकाशात आणि रंगमंचावर – नवीन उंचीवर नेत आहे. भारतातील सर्वात मोठा ब्रँडेड लाइव्ह आयपी म्हणून, यारी जॅमने ३६,००० फूट उंचीवर पहिला जॅम आयोजित करून एक ऐतिहासिक क्षण साजरा केला, जिथे किंग आणि कर्मा यांनी एका उड्डाणाचे मैत्रीच्या अविस्मरणीय क्षणात रूपांतर केले. आता ही मैत्रीची सफर कोलकात्याच्या पुढच्या अध्यायात प्रवेश करत आहे. हाऊस ऑफ मॅकडॉवेलच्या सोडाने नेहमीच मैत्रीला केवळ थीम नाही तर भावना म्हणूनही प्राधान्य दिलंय. यारी जॅमच्या प्रत्येक पर्वातून ब्रँड आपल्या मैत्रीवरील बांधिलकीला अधिक बळ देतो आणि हे सर्व एकत्र आणणारा घटक म्हणजे संगीत.

मुंबईहून कोलकात्याकडे जाणाऱ्या खासगी चार्टर फ्लाइटमध्ये किंग, कर्मा आणि विनोदी कलाकार रवी गुप्ता आणि गुरलीन पन्नू यांनी आकाशात मस्त जॅम करत संगीत, कथा, हसणं आणि दिलखुलास यारीनं भरलेला अनुभव दिला. आता कोलकात्याच्या स्टेजवर यारी जाम सुरू होतेय, आणि किंग, फॉसिल्स, सनम आणि भार्ग काळे यांचं दमदार लाईनअप स्टेजवर सादर होणार आहे. ही फक्त दुसरी मैफल नाही. हे यारी जाम आहे – मैत्री आणि संगीताला आदरांजली आणि आपल्याला एकत्र आणणाऱ्या बंधांचा उत्सव.

१५० हून अधिक कलाकारांच्या रोस्टरसह आणि १,५००+ कॉलेज इव्हेंट्ससह २,५०० हून अधिक शो चालवण्याच्या सिद्ध ट्रॅक रेकॉर्डसह, ट्राइब व्हायब कलाकार आणि ब्रँड्सना थेट भारताच्या चैतन्यशील विद्यार्थी समुदायाशी जोडते, आणि दरवर्षी १.५ दशलक्षाहून अधिक विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सहभागी करते. त्याच्या प्रमुख प्रकल्पांमध्ये वीर दासचा माइंडफूल दौरा, प्रतीक कुहडचा १० शहरांचा प्रवास, झाकीर खानचा ६० शहरांचा विनोदी दौरा आणि आदित्य गढवी आणि फाल्गुनी पाठकसोबत नवरात्री यासारख्या प्रादेशिक कार्यक्रमांचा समावेश असतो.

भारताचा थेट करमणूक उद्योग महानगरांच्या पलीकडे विकेंद्रीकृत होत असताना, उच्च-मागणी असलेले प्रेक्षक आणि उच्च-गुणवत्तेच्या थेट कृती यांच्यातील अंतर कमी करणारे स्केलेबल, हायपरलोकल अनुभव तयार करून श्रेणी २ आणि श्रेणी ३ बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्यात ट्राइब व्हायब आघाडीवर आहे. बुकमायशोच्या प्रमाण आणि कौशल्याच्या पाठिंब्याने, ट्राइब व्हायब युवा संस्कृती, ग्रीनफिल्ड बाजारपेठा आणि अत्याधुनिक पर्यटन स्वरूपांचे विजेतेपद मिळवून भारताच्या थेट मनोरंजनाच्या पुढच्या लाटेला चालना देत आहे.

# छोरीयाँ चली गाँवमधील स्पर्धक : ग्रामीण भारतातील कठीण आव्हानांचा सामना करण्यासाठी सज्ज असलेल्या ११ छोरीयाँचा परिचय

**मुंबई, ३ ऑगस्ट :** जेव्हा मनोरंजन, सोशल मीडिया आणि फॅशनच्या जगातील ११ धडाडीच्या आणि प्रतिभावान महिला अनिता हसानंदानी, ऐश्वर्या खरे, अंजुम फाकीह, कृष्णा श्रॉफ, रेहा सुखेजा, रमीत संधू, सुरभी आणि समृद्धी मेहरा, एरिका पॅकार्ड, सुमुखी सुरेश, डॉली जावेद त्यांच्या सोयीसुविधा सोडून ग्रामीण भारतातील खडतर जीवन स्वीकारण्यासाठी निघतात, तेव्हा काय घडतं? झी टीव्हीवरील आगामी शो छोरीयाँ चली गाँव हेच दाखवणार आहे! या कार्यक्रमात या सेलिब्रिटी महिलांची गावच्या जीवनशैलीशी जुळवून घेण्याची, दैनंदिन आव्हाने, टास्क्स परफॉर्म करणे, आणि शहरातील ऐषआरामाशिवायचं आयुष्य जगण्याची क्षमता तपासली जाणार आहे! या कार्यक्रमात असेल भरपूर नाट्य, मैत्री, स्पर्धा आणि अनेक अनपेक्षित ट्विस्ट्स कारण या महिला शहराच्या झगमगाटापासून दूर जाऊन स्वतःची ताकद सिद्ध करणार आहेत. पाहत राहा छोरियाँ चली गाँवलवकरच प्रीमियर होत आहे ३ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजता आणि दररोज रात्री ९.३० वाजता फक्त झी टीव्हीवर!

पहा, गावातले जीवन अनुभवण्यासाठी सज्ज असलेल्या या ११ छोरीयाँची अंतिम यादी आणि त्यांचा थोडक्यात परिचय :



अनिता हसानंदानी : अनिता हसानंदानी ही एक प्रसिद्ध भारतीय अभिनेत्री आहे जिने टेलिव्हिजन, सिनेमा, ओटीटी प्लॅटफॉर्म्स आणि रिॲलिटी शो अशा सगळ्याच माध्यमांत सहजपणे आपले स्थान निर्माण केले आहे.

ऐश्वर्या खरे : भारतीय टेलिव्हिजनच्या सर्वाधिक आशादायक कलाकारांपैकी एक म्हणून ऐश्वर्या खरेने लवकरच आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. भोपाळची मूळ रहिवासी असलेल्या ऐश्वर्याने २०१४ साली आपल्या अभिनय प्रवासाला सुरुवात केली आणि आपल्या नाजूक, पण प्रभावी अभिनयशैलीने प्रेक्षकांची मने जिंकली.

अंजुम फाकीह : रत्नागिरी, महाराष्ट्रात जन्मलेली अंजुम फाकीह ही एक धडाडीची आणि प्रेक्षकांशी सहज नाते निर्माण करणारी अभिनेत्री आहे. तिच्या बेधडक स्वभावामुळे आणि भावनात्मक अभिनयामुळे तिने एक निष्ठावान चाहतावर्ग मिळवला आहे.

कृष्णा श्रॉफ : कृष्णा श्रॉफ ही फिटनेस उद्योजिका, एमएमए प्रमोटर, डॉक्युमेंटरी फिल्ममेकर आणि सोशल मीडियावर लोकप्रिय इन्फ्लुएंसर आहे. प्रसिद्ध अभिनेते जॅकी श्रॉफ यांची मुलगी आणि बॉलीवूड ॲक्शन स्टार टायगर श्रॉफची बहीण असली तरी कृष्णाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

रेहा सुखेजा : हैदराबादची रहिवासी असलेली रेहा सुखेजा ही एक यशस्वी मॉडेल आणि अभिनेत्री आहे. फेमिना मिस इंडिया २०१० ची फायनलिस्ट असलेल्या रेहाने आपल्या आत्मविश्वासपूर्ण आणि सोज्वळ व्यक्तिमत्त्वामुळे फॅशनविश्वात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले.

रमीत संधू : यूकेमध्ये जन्मलेली रमीत संधू ही एक ब्रिटीश-इंडियन अभिनेत्री, गायिका आणि मॉडेल आहे. अभिनयात आपल्या प्रवासाची सुरुवात करताच रमीतने वेगवेगळ्या भूमिका आणि शैली आत्मसात करत आपली बहुपर्यायी अभिनयक्षमता दाखवून दिली.

सुरभी आणि समृद्धी मेहरा : चिंकी-मिंकी नावाने प्रसिद्ध असलेल्या सुरभी आणि समृद्धी मेहरा या नोएडा, उत्तर प्रदेशच्या मूळ रहिवासी असलेल्या जुळ्या बहिणी आहेत. सोशल मीडियावरील लोकप्रिय इन्फ्लुएंसर्स, कंटेंट क्रिएटर्स आणि टेलिव्हिजन सेलिब्रिटी म्हणून त्यांनी स्वतःचे खास स्थान निर्माण केले आहे.

एरिका पॅकार्ड : एरिका पॅकार्ड हिला प्रसिद्धीचं वलय नवीन नाही. बॉलीवूड अभिनेता गॅविन पॅकार्ड यांची मुलगी असलेल्या एरिकाने मात्र एक यशस्वी मॉडेल, फॅशनिस्टा आणि रिॲलिटी टेलिव्हिजन स्टार म्हणून आपल्या नावाची ओळख स्वतंत्रपणे निर्माण केली आहे.

सुमुखी सुरेश : सुमुखी सुरेश ही प्रतिभेचा खणखणीत साठा आहे ती एक उत्तम विनोदी कलाकार, लेखिका, अभिनेत्री आणि कथाकथनकार आहे. ती प्रामुख्याने ओटीटीवर गाजलेल्या आणि समीक्षकांनी भरभरून कौतुक केलेल्या पुष्पावल्ली या मालिकेसाठी ओळखली जाते, जिची निर्माती आणि मुख्य अभिनेत्री तीच आहे.

डॉली जावेद : लखनऊ, उत्तर प्रदेशची रहिवासी असलेली डॉली जावेद ही सोशल मीडियावरील लोकप्रिय व्यक्तिमत्त्व उर्फी जावेद हिची बहीण असली, तरी तिने डिजिटल स्पेसमध्ये स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे.

# कलाकारांनी सेटवर भेटलेल्या मित्रांबाबत आणि त्यांच्यासोबत निर्माण झालेल्या आजीवन नात्याबाबत सांगितले!




**मुंबई, ३ ऑगस्ट :** लाइट्स, कॅमेरा व ॲक्शनमधून पडद्यावर रोमांचक कथानक पाहायला मिळते, पण कधी-कधी पडद्यामागील क्षणांचा सखोल प्रभाव पडतो. यंदा फ्रेण्डशीप डे निमित्त एण्ड टीव्ही कलाकार जुन्या आठवणींना उजाळा देत आहेत, तसेच सेटवर निर्माण झालेले नाते अतूट मैत्रीमध्ये कशाप्रकारे बदलले याबाबत सांगत आहेत. आध्यात्मिक संबंधांपासून वैयक्तिक परीक्षा घेत अविरत पाठिंब्यापर्यंत या कथांमधून निदर्शनास येते की दृढ मैत्री कधी-कधी अनेपक्षित ठिकाणी देखील होते. हे कलाकार आहेत प्रियमवदा कांत (लतिका, 'घरवाली पेडवाली), सपना सिकरवार (बिमलेश, 'हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, 'भाबीजी घर पर है'). मालिका 'घरवाली पेडवाली'मधील प्रियमवदा कांत ऊर्फ लतिका म्हणाली, ''कृष्णा भारद्वाज यांच्यासोबत माझे खास नाते आहे. आठ वर्षांपूर्वी एका मालिकेमध्ये एकत्र काम करताना आमची पहिली भेट झाली होती आणि तेव्हापासून आम्ही सतत संपर्कात आहोत. आमच्या मैत्रीला वेगळे बनवणारी गोष्ट म्हणजे आमच्यामधील सखोल आध्यात्मिक संबंध.''

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील सपना सिकरवार ऊर्फ बिमलेश म्हणाल्या, 'काही वर्षांपूर्वी शूटिंगदरम्यान मी गीतांजलीला भेटले आणि मालिकेमधील सहकारीवरून जिवलग बहिणींपर्यंत आमच्यामध्ये हळूहळू नाते निर्माण झाले. आम्ही दोघी खंबीर आहोत, पण एकमेकांना सांभाळून घेतो. मला तिच्याबाबत आवडलेली बाब म्हणजे तिचा दयाळूपणा.

मालिका 'भाबीजी घर पर है'मधील शुभांगी अत्रे ऊर्फ अंगूरी भाबी म्हणाल्या, ''मी काही वर्षांपूर्वी एका इव्हेण्टदरम्यान मेघाला भेटले आणि त्वरित तिच्यामधील उत्साहपूर्ण व प्रामाणिक स्वभाव जाणवला. त्यानंतर काळासह आमच्यामध्ये दृढ मैत्री झाली. मी मुंबईमधील माझ्या संघर्षमय दिवसांमधील क्षण कधीच विसरणार नाही. माझ्याकडे राहण्यासाठी घर नव्हते. घाबरत मी मेघाला कॉल केला. तिने मला आश्रय देण्यासोबत ताकद दिली. तिच्या रूपात मला फक्त मैत्रिण मिळाली नाही तर संपूर्ण आयुष्यासाठी बहीण मिळाली आहे.''

# कलाकारांनी डिजिटल युग त्यांना चाहत्यांसोबत दृढ संबंध निर्माण करण्यास कशाप्रकारे मदत करत आहे, याबाबत सांगितले!




**मुंबई, ३ ऑगस्ट :** आज झपाट्याने बदलत असलेल्या मनोरंजन क्षेत्रात टेलिव्हिजनवरील कलाकार उत्साहवर्धक व नवीन पद्धतीने डिजिटल युगाचा अवलंब करत आहेत, त्यांचे पात्र व व्यक्तिमत्त्वाच्या पलीकडे जात अधिक वास्तविकपणे चाहत्यांशी कनेक्ट होत आहेत. वैयक्तिक व्हीलॉग तयार करण्यापासून ऑनलाइन परस्परसंवादात्मक कन्टेन्ट व कथानकामध्ये सामावून जाण्यापर्यंत कलाकार आता डिजिटल युगाचा वापर करत त्यांच्या जीवनाचे पैलू दाखवत आहेत, जे क्वचितच स्क्रिनवर पाहायला मिळतात. एण्ड टीव्ही कलाकार त्यांची ऑनलाइन उपस्थिती त्यांना सर्जनशीलपणे समाधानकारक आणि प्रेक्षकांशी भावनिकदृष्ट्या कनेक्टेड राहण्यास कशाप्रकारे मदत करत आहे, याबाबत सांगत आहेत. हे कलाकार आहेत प्रियमवदा कांत (लतिका, 'घरवाली पेडवाली'), गीतांजली मिश्रा (राजेश सिंग, 'हप्पू की उलटन पलटन') आणि सोमा राठोड (अम्माजी, 'भाबीजी घर पर है'). आगामी मालिका 'घरवाली पेडवाली'मध्ये लवकरच लतिका (पेडवाली) ची भूमिका साकारताना पाहायला मिळणारी प्रियमवदा कांत म्हणाली, ''आज कलाकार सोशल मीडियावर सेल्फी किंवा डान्स रील्स शेअर करण्यासोबत खास कन्टेन्ट देखील तयार करत आहेत, संवाद वाढवत आहेत आणि प्रेक्षकांना कलाकारांच्या खऱ्या जीवनाबाबत ओळख करून देत आहेत. लहान कथानक स्वरूप, ट्रॅव्हल स्निपेट्स किंवा माझ्या सर्जनशील प्रवासामधील पडद्यामागील क्षण असो माझ्याबाबतीत तत्रंज्ञान चाहत्यांसोबत खरे नाते निर्माण करत आहे, ज्यांनी मला करिअरदरम्यान पाठिंबा दिला आहे. हे अभिव्यक्त, संलग्न व विकसित होण्यासाठी उत्तम युग आहे.''

# सोनी सबवरील वीर हनुमान मालिकेत सूर्य देवाने हनुमानाला असूर्य लोकात पाठवले

***मुंबई, ३ ऑगस्ट :*** *सोनी सबवरील वीर हनुमान मालिकेचे दमदार कथानक आणि त्यातील दिव्य साहस प्रेक्षकांना आकर्षित करत आहे. या मालिकेत आन तिवारीने बाल हनुमानाची भूमिका केली आहे, तर सायली साळुंखे आणि आरव चौधरी अनुक्रमे माता अंजनी आणि केसरीच्या भूमिकेत दिसत आहेत. माहिर पांधीने वाली आणि सुग्रीव यांची दुहेरी भूमिका साकारली आहे. मालिकेत आता हनुमानाच्या जीवनातील परिवर्तनाचा अध्याय सुरू झाला आहे. आत्तापर्यंत प्रेक्षकांनी हनुमानाची जिज्ञासू वृत्ती आणि त्याचा दृढ निर्धार पाहिला आहे, आणि आता सुजाणता आणि सामर्थ्य मिळवण्याच्या दिशेने त्याने पहिले पाऊल उचलले आहे. नवीन आव्हानांना तोंड देत देत तो काही छुपी रहस्यं उघडकीस आणतो आणि त्याचा मार्ग त्याला एका महान उद्देशाकडे घेऊन जातो. त्याची नियती कशी उलगडते याकडे प्रेक्षकांचे लक्ष लागून राहिले आहे. आगामी भागांमध्ये, प्रेक्षक पाहतील की हनुमान मार्गदर्शन मिळवण्यासाठी तसेच काही दिव्य कौशल्ये शिकण्यासाठी सूर्य देवाकडे (मल्हार पंड्या) जातो. पण, असे करताना त्याच्या दृढतेची परीक्षा होते, कारण सूर्यदेव तसेच अग्नी देव, यम देव आणि अश्विनी कुमार या देवता त्याची विनवणी नाकारतात. या दरम्यान हनुमानाला सूर्य देव आणि शनि देव यांच्यातील वितुष्टाबाबत समजते. एक निर्धार करून हनुमान असूर्य लोकात जतो, जो एक गूढ प्रांत आहे आणि तिकडे अनेक आभास आणि परीक्षा आहेत. या गूढ विश्वात हनुमानाला ताकद, सुजाणता आणि निष्ठा यांच्या कठीण परीक्षा द्यावा लागतात. हनुमानाला अपेक्षित असलेल्या सुजाणतेचा शोध तो घेत असताना एक मोठा प्रश्न तर राहतोच की त्याला मिळालेल्या या नव्या ज्ञानामुळे त्याच्या प्रवासाची जडणघडण कशी होणार आहे? बाल हनुमानाची भूमिका करणारा कलाकार आन तिवारी म्हणतो, मी जेव्हा पाहिल्यांदा ऐकले की, हनुमान काही दिव्य कौशल्य शिकण्यासाठी सूर्य देव आणि शनि देव यांच्याकडे जाणार आहे, तेव्हा मी खूप रोमांचित झालो, कारण हनुमानाप्रमाणेच मलाही ॲक्शन दृश्ये करायला आणि नव्या गोष्टी शिकायला आवडतात. पण, मग मला समजले की सूर्य देव आणि अग्नी, यम वगैरे इतर देवता त्याला नकार देणार आहेत. मी माझ्या दिग्दर्शकाला विचारले की, पण ते हनुमानाला शिकवत का नाहीत? हनुमानजीची फक्त शिकण्याचीच मागणी आहे ना! त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, हेच हनुमानाचे वैशिष्ट्य आहे. तो कधीच हार मानत नाही, अगदी समस्त जगाने नकार दिला तरी! ही गोष्ट माझ्या मनात घर करून राहिली आहे.*

## आज का अंदाज

सोमवार ४ ऑगस्ट २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ८ | ९ | २ | ३ | ६ | ७ |
| १४७ | २५८ | ३५० | २३९ | १२९ | १२० | १७८ | २६९ |
| ३९० | ७८० | ४४० | ३७९ | २४६ | ३०० | २४० | ४५८ |
| २०० | ६९० | २६० | ४७८ | ३९० | २२९ | ३५८ | ३७७ |
| २१ | ५१ | ८० | ९० | २४ | ४३ | ६१ | ७१ |
| २४ | ५४ | ८६ | ९६ | २० | ४० | ६५ | ७५ |
| २७ | ५७ | ८३ | ९३ | २८ | ४८ | ६९ | ७९ |

**४ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | ५१ | ४८ | ७८ |
| ३९ | ५९ | ४६ | ७६ |
| ३० | ५० | ४२ | ७२ |
| १२० | ५०० | ४५५ | ३७७ |
| ३०० | ६९० | ५९० | ४६७ |
| २२९ | ७८० | ६८० | ५५७ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# टोयोटा किर्लोस्कर मोटरने ३२,५७५ वाहनांची विक्री

**बेंगळुरू, ३ ऑगस्ट :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज त्यांच्या विक्री कामगिरीची घोषणा केली. कंपनीची कामगिरी खालीलप्रमाणे आहे:

महिना-दर-महिना वाढ: जुलै २०२५ विरुद्ध जुलै २०२४, कालावधी जुलै २०२५ जुलै २०२४ वाढ, वार्षिक ३२,५७५ युनिट्स ३१,६५६ युनिट्स ३%

यामध्ये देशांतर्गत बाजारात विकल्या गेलेल्या २९,१५९ युनिट्स आणि निर्यात केलेल्या ३४१६ युनिट्सचा समावेश आहे.

आर्थिक वर्षातील वाढ: एप्रिल ते जुलै २०२५ विरुद्ध एप्रिल ते जुलै २०२४

कालावधी एप्रिल – जुलै २०२५ एप्रिल – जुलै २०२४ वाढ

आर्थिक वर्षातील पहिले ४ महिने १,१९,६३२ युनिट्स १०४,८६१ युनिट्स १४%

कॅलेंडर वर्षातील वाढ: जानेवारी ते जुलै २०२५ विरुद्ध जानेवारी ते जुलै २०२४

कालावधी जानेवारी – जुलै २०२५ जानेवारी – जुलै २०२४ वाढ

कॅलेंडर पहिले ७ महिने २,०७,४६० युनिट्स १८१,९०६ युनिट्स १४%

विक्री, सेवा आणि वापरलेल्या कार व्यवसायाचे उपाध्यक्ष वरिंदर वाधवा म्हणाले, जुलैमध्ये ३२,५७५ वाहने विकून आम्हाला ३% वाढ झाल्याचा आनंद होत आहे. ग्राहकांच्या सातत्यपूर्ण अभिप्रायावरून आम्ही त्यांच्या गरजा किती गांभीर्याने घेतो हे दिसून येते. सर्वोत्तम उत्पादने आणि सेवांद्वारे आम्ही बाजारात आमचे स्थान आणखी मजबूत करू. आम्ही आमच्या क्षमता मजबूत करत राहू आणि आम्हाला विश्वास आहे की हाच आधार बनेल आमच्या भविष्यातील प्रगतीचे.

जुलै महिन्यातील प्रमुख कामगिरी:

टोयोटा ग्लांझा आणि अर्बन क्रूझर हायराइडरसाठी सादर केलेल्या मर्यादित आवृत्ती प्रेस्टीज पॅकेजला ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

इनोव्हा हायक्रॉसने भारत-एनसीएपी कडून प्रौढ आणि मुलांसाठी प्रतिष्ठित ५-स्टार सुरक्षा रेटिंग प्राप्त केले आहे. टोयोटाच्या सुरक्षा मानकांमधील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आज दिवसाची सुरुवात निरुपयोगी धावपळीने होईल. कामाच्या ठिकाणी वरिष्ठ अधिकाजयांशी अनावश्यक वाद होऊ शकतात. तुमचे बोलणे आणि राग नियंत्रित करा. आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका.

**वृषभ :** कामगारांना काम करण्याची संधी मिळेल. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजयांना महत्त्वाच्या कामाची जबाबदारी मिळेल. त्यामुळे कामाच्या ठिकाणी त्यांचा प्रभाव वाढेल.

**मिथुन :** विरोधकांच्या कारनाम्यांपासून सावध रहा, व्यवसायात चढ-उतार येतील. अचानक कोणतेही मोठे निर्णय घेऊ नका. कोणाच्याही प्रभावाखाली येऊ नका. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:वर विश्वास ठेवा.

**कर्क :** आज व्यवसायिक कामानिमित्त झालेला प्रवास विशेषत: फायदेशीर ठरेल. व्यवसाय वाढवण्याच्या योजनांना चालना मिळेल. संघर्षानंतर महत्त्वाच्या कामांमध्ये यश मिळण्याची शक्यता आहे.

**सिंह :** कामाच्या आणि व्यवसायाच्या क्षेत्रात अधिक लक्ष देण्याची गरज भासेल.राजकारणात पद आणि प्रतिष्ठा वाढेल. सरकारच्या लोककल्याणकारी कामांची जबाबदारी तुम्हाला मिळेल.

**कन्या :** नातेवाईक आणि जवळच्या मित्रांकडून आनंद आणि पाठिंबा वाढेल. लांबच्या प्रवासाची शक्यता आहे. प्रामाणिकपणे काम करत रहा. वरिष्ठ अधिकाजयांशी जवळीक वाढेल. निरुपयोगी वाद टाळा.

**तुळ :** आजचा दिवस प्रगतीचा असेल. कामाच्या ठिकाणी नवीन कामाची योजना बनवली जाईल. आणि भविष्यात त्यातून चांगले फायदे मिळण्याची शक्यता आहे. प्रतिकूल परिस्थितीला अनुकूल बनवा.

**वृश्चिक :** आज व्यवसाय क्षेत्रात अशी घटना घडू शकते ज्यामुळे तुमचा नफा होईल. तुमची कार्यक्षमता वाढवा. दीर्घ काळापासून प्रलंबित असलेली कामे करत राहा. नोकरीत सहकाजयांकडून सहकार्य मिळेल.


**धनु :** आज कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होऊ शकतात. यामुळे तुमचे मनोबल वाढेल. व्यवसाय क्षेत्रात गुंतलेल्या लोकांना त्यांच्या समस्यांवर शांततापूर्ण उपाय शोधावा लागेल.

**मकर :** कोणाच्याही प्रभावात येऊ नका. तुमच्या बुद्धिमत्तेने आणि विवेकबुद्धीने काम करा.कोणाशीही अनावश्यक वाद घालू नका. भावनांना सकारात्मक दिशा द्या. सामाजिक कार्यात रस कमी होईल.

**कुंभ :** आज कामाच्या ठिकाणी कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर आंधळेपणाने विश्वास ठेवू नका. अन्यथा, तुमची फसवणूक होऊ शकते. तुमचे महत्त्वाचे काम बिघडू शकते. राग टाळा.

**मीन :** आज दिवसाची सुरुवात काही चांगल्या बातमीने होईल. यामुळे तुमचा उत्साह आणि उत्साह वाढेल. कामाच्या ठिकाणी अपूर्ण राहिलेले काम मित्राच्या मदतीने पूर्ण होईल.

# शब्दकोडे क्रमांक २१८२



**आडवे शब्द :-**

१) सौंदर्य लाभलेली स्त्री
४) हव्यास
६) शुभ्र, पांढरा
८) विश्रांती
१०) पुन्हा
१२) वस्त्र, कापड
१४) पूर्वी कधीही घडले नाही आणि पुढे कधीही घडणार नाही असे
१७) माणूसकी
१९) मोठी नदी
२१) चीर, भेग
२२) पोते
२४) वाळूवर रेघोट्या मारून भविष्य सांगण्यावी विद्या
२६) अडथळा
२८) ध्वनी
३०) विचार, धैर्य, आकलन
३१) नातेवाईक
३३) गरज
३४) मौज
३६) जवाहीरखाना, खजिना
३९) हृदय
४०) परिचय
४२) श्रीकृष्णासारखा श्रेष्ठ पुरुष
४३) च्या करीता
४४) कंटाळवाणे (भाषण )
४६) रस्ता
४७) अमृत
४८) आत(इं )
४९) धागे, तंतू
५०) बढाई, बडबड
५१) मदन, कामदेव
५२) दया, कीव
५४) रंग बदलणारा प्राणी
५६) कंप पावणे
५९) मीठाची चव
६१) कोळशाचा चुरा
६२) कळलाव्या मुनी
६४) ब्राह्मण
६५) अरण्य
६६) लाकडी पातळ खांब
६७) स्थितप्रज्ञ, सुखदु:खाच्या भावनांपासून दूर
६९) घराणे
७१) एकूणएक, सर्व
७२) प्रारब्ध देवता, दुष्ट स्त्री

**उभे शब्द :-**

१) सौंदर्य लाभलेला पुरुष
२) पंख
३) देश, जमीन
५) उत्कर्ष, चलती
६) तीर कमान
७) श्रीरामाच्या एका मुलाचे नाव
८) चेहरा, मुख
९) माया, प्रेम
११) घण
१३) सारखा, तुल्य
१५) पृथ्वी
१६) नदीचा काठ
१८) दावानल
२०) द्वार
२३) मोठा भाऊ
२५) एक धान्य
२६) बोभाटा
२७) सत्वयुक्त
२८) अडथळा, प्रतिबंध
२९) लालबहादूर शास्त्रीजींनी दिलेली घोषणा
३०) विधानसभेचा सदस्य
३२) माल
साठाविण्याची जागा
३५) दरी
३७) दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा
३८) कोकणातील एक दैवत
४०) रांग
४१) अफूचे बी
४३) सरळमार्गी, प्रामाणिक
४५) एक क्षार
४७) सुमार्ग, चांगला मार्ग
४८) पोटदुखी थांबविणारे व फसफसणारे एक पेय
५१) सापाची एक जात
५३) आशीर्वादाचा, पाठिंब्याचा हात
५५) काढलेली सुट्टी
५७) रमापती
५८) अतिशय रूक्षता
६०) पादत्राण
६२) अनुतीर्ण
६३) तिरंगा ध्वजावरील चक्र
६४) पुढे येणारा काळ
६६) आश्वासन(हिं )
६८) भाग, वाटा,
७०) नूतन

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# कर्जमाफीची तारीख विचारली तर अटक? ही सरकारची दडपशाही नाही का?

## मोर्शी ठिकठिकाणी लागले बॅनर

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी / वरूड,** ( दि. 3 )– शेतकरी कर्जमुक्तीसाठी आवाज उठवणं हा गुन्हा आहे का? फक्त ‘कर्जमाफीची तारीख कधी?’ असा साधा प्रश्न विचारला म्हणून शेतकऱ्यांना व प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली, हे पाहून संपूर्ण राज्यात संताप व्यक्त होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मोर्शी दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर वरूड तालुक्यातील शेतकरी व शेतमजुरांसोबत प्रहारचे तालुका संपर्कप्रमुख




अजय चौधरी, प्रमुख प्रवण कडू, विलास पांडगडे यांच्यासह अनेक कार्यकर्ते बॅनर लावत होते.

बॅनरवर सरकारच्या निवडणूकपूर्व घोषणांची आठवण करून देत कर्जमुक्तीची मागणी करण्यात आली होती.



### सरकारच्या घोषणांचा विसर ?

निवडणुकीआधी ‘सातबारा कोरा’ च्या घोषणा दिल्या; परंतु निवडणुकीनंतर जेव्हा तारीख विचारली गेली तेव्हा कार्यकर्त्यांवर कारवाई करण्यात आली. सरकार इतकं खंगलंय की प्रश्न विचारणंही यांना सहन होत नाही, अशी टीका शेतकरी संघटनांनी केली आहे. मोर्शी व वरूड परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला. कोणतेही आंदोलन होऊ नये म्हणून कार्यकर्त्यांना आधीच ताब्यात घेण्यात आले. शेतकऱ्यांचा आरोप आहे की, शासन लोकशाहीतील प्रश्न विचारण्याचं स्वातंत्र्य हिरावून घेत आहे.

### प्रहार पक्षाचा इशारा

प्रहार पक्षाने या घटनेचा तीव्र निषेध केला आहे. ‘ही केवळ लढाई नाही, आमच्या भविष्यासाठीचा उठाव आहे! सरकार कितीही बंदोबस्त लावो, आमचा प्रश्न महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचेल,’ असा इशारा बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनातून देण्यात आला. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, मेंढपाळ, मच्छीमार, दिव्यांग, ग्रामपंचायत कर्मचारी अशा सर्व घटकांवर सरकारने दडपशाही केली आहे, असा आरोपही करण्यात आला. जेव्हा शासन आपल्या घोषणांचा विसर पाडतं, तेव्हा जनतेला आंदोलन हेच शस्त्र उरतं,’ असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

# पृथ्वीराज चव्हाण यांच्या विरोधात युवा सेनेचा जोरदार निषेध

## विरोधी वक्तव्यप्रकरणी बॅनरला चपलांचा मारा; घोषणाबाजीने राजकमल चौकात परिसर दणाणला

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. ३ ) –** हिंदू धर्माविरोधात केलेल्या कथित वक्तव्याच्या निषेधार्थ शनिवारी अमरावतीतील राजकमल चौकात युवा सेनेच्या कार्यकर्त्यांनी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडले. यावेळी त्यांच्या बॅनरवर चपला मारून निषेध व्यक्त करण्यात आला तसेच जोरदार घोषणाबाजी करत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली.




या आंदोलनाचे नेतृत्व युवा सेना लोकसभा अध्यक्ष प्रविण दिधाते यांनी केले. या वेळी युवा सेनेचे राहुल माटोडे, विधानसभा अध्यक्ष पवन सोळंके, तालुका प्रमुख आयुष देशमुख, शहर समन्वयक प्रथमेश बोबडे, शहर सचिव चेतन गोगे, चिटणीस शुभम ढेंगे, उपशहर प्रमुख सुनील चक्रे, हरीश पवार, सत्यम खंदाडे, निखिल सखे, अक्षय बुटे, सूरज आठवले, अथर्व गायकवाड, अंशू सोळंके, अथर्व श्रीरामवर आणि शुभम जाधव हे उपस्थित होते. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी ‘हिंदू धर्माचा अवमान खपवून घेतला जाणार नाही’, ‘पृथ्वीराज चव्हाण माफी मागा’ अशा घोषणा देत संताप व्यक्त केला. युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला की, हिंदू धर्माच्या विरुद्ध वक्तव्य करणाऱ्यांना माफ केले जाणार नाही आणि अशा वक्तव्यांवर आक्रमक भूमिका घेतली जाईल.


# बसमधून 4.95 लाखांचे दागिने लंपास

## राजापेठ पोलिस ठाण्यात अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 3 ) :** यवतमाळहून वरुडला जाणाऱ्या एस.टी. बसमध्ये एका महिला प्रवाशाजवळ बसलेल्या अज्ञात महिलेने तब्बल 4 लाख 95 हजार रुपये किमतीचे 117 ग्रॅम सोन्याचे दागिने चोरल्याची घटना 2 ऑगस्ट रोजी घडली. या प्रकरणी तक्रारदार महिलेच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिस ठाण्यात अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, तक्रारदार महिला अमरावती येथील असून, काही दिवसांपूर्वी ती तिच्या माहेरी यवतमाळ येथे गेली होती.

यावेळी तिने 40 ग्रॅमचे मंगळसूत्र, 35 ग्रॅम ब्रेसलेट, 28 ग्रॅम बकुळीचा हार, 4 ग्रॅम अंगठी, 2 ग्रॅम मोत्याची अंगठी, 3 ग्रॅम हिऱ्याची अंगठी आणि कानातले असे एकूण 117 ग्रॅम वजनाचे, 4.95 लाख रुपये किमतीचे दागिने तिच्या पर्समध्ये ठेवले होते.



2 ऑगस्ट रोजी ती यवतमाळहून वरुडकडे जाणाऱ्या बसमध्ये चढली. या प्रवासात तिच्या शेजारी एक अनोळखी महिला बसली होती. प्रवासादरम्यान या अज्ञात महिलेने संधी साधून पर्समधून दागिने लंपास केले. तक्रारदार महिला वरुड बस डेपोत उतरून जयस्तंभ चौकात पोहोचल्यावर तिने पतीला फोन करण्यासाठी पर्स उघडली असता, पर्सची चेन उघडी असल्याचे आणि दागिने गायब असल्याचे लक्षात आले. घटनेची माहिती तिने तत्काळ राजापेठ पोलिसांना दिली. पोलिसांनी अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. बसमधील सीसीटीव्ही फुटेज, प्रवाशांची माहिती आणि बसस्थानक परिसरातील तपासणी सुरू आहे.

# एकवीरा देवी प्रवेशद्वाराला न्यायालयाची मंजुरी!

## महापालिकेच्या बाजूने निर्णय, याचिकाकर्त्यांचा दावा फेटाळला

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 3 ) –** शहराच्या राजापेठ परिसरातील दीपार्चन रस्त्यावर एकवीरा देवी मंदिराचे प्रवेशद्वार उभारण्यासाठी महत्त्वाचा अडथळा दूर झाला असून सहाव्या वरिष्ठ दिवाणी न्यायालयाने या कामास हिरवा कंदील दिला आहे. सुरेंद्र देशमुख यांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावत न्यायालयाने महापालिकेच्या बाजूने निर्णय दिला.

महानगरपालिकेच्या वतीने ॲड. त्र्यंबी छाबरा यांनी प्रभावी युक्तिवाद करत प्रवेशद्वाराचे बांधकाम कायदेशीर असल्याचे ठासून सांगितले. त्यांनी युक्तिवादात नमूद केले की, नगरविकास विभागाने या प्रकल्पास मंजुरी दिली असून एकूण 45 लाख रुपये खर्चाच्या मंजूर योजनेअंतर्गत हे प्रवेशद्वार उभारले जात आहे. यासाठी प्रारंभी 2 ते 3 लाख रुपये खर्च करून पाया देखील घालण्यात आला होता.

परंतु, सुरेंद्र देशमुख यांनी बांधकाम थांबवण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र ॲड. छाबरा यांनी स्पष्ट केले की प्रवेशद्वार देशमुख यांच्या घरापासून सुमारे 5 फूट अंतरावर असून, त्यांच्या मालमत्तेच्या कोणत्याही प्रवेशास



अडथळा निर्माण होत नाही. देशमुख यांच्या घराचा समोरचा भाग तब्बल 100 फूट असून गेटचे खांब केवळ 3 फूट रूंद असतील, असेही त्यांनी नमूद केले.

या मुद्द्यांची दखल घेत न्यायालयाने महापालिकेचा युक्तिवाद ग्राह्य धरला व याचिकाकर्ता देशमुख यांचा दावा फेटाळला. त्यामुळे एकवीरा देवी मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या कामाला आता न्यायालयीन मंजुरी मिळाल्याने शहराच्या सौंदर्यीकरणाच्या दृष्टीने मोठा मार्ग मोकळा झाला आहे.

या खटल्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने सरकारी वकील ॲड. मंगेश भागवत यांनी देखील भूमिका मांडली. न्यायालयाच्या या निर्णयामुळे महापालिकेच्या कामांना चालना मिळणार असून धार्मिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही ही बांधकाम योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# दरोडा टाकण्याच्या तयारीत फिरणारे तिघे जेरबंद; दोघे पसार

## घटना नागपुरीगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 3 ) –** दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांपैकी तीन संशयितांना अटक करण्यात आली. तर दोघे आरोपी अंधाराचा फायदा घेत पसार झाले. नांदगावपेठ पोलीस ठाण्याचे पथक पेट्रोलिंग करत असताना गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.



आरोपींमध्ये असलम खान अहमद खान (25, रहमत नगर), शेख फैजान शेख रहीम (यास्मिन नगर) आणि शेख जावेद उर्फ दद्दू शेख साबीर (33, लालखडी) यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून पोलिसांनी 20 फूट दोरी, दोन तलवारी, हातोडा, मिरची पावडर, दुपट्टे आणि 12 चाव्यांचा गठ्ठा असा एकूण 1,300 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दरम्यान, मोहम्मद सादिक मोहम्मद ईसा (अलीम नगर) आणि सादिक खान शेर खान (गुलिस्ता नगर) असे पसार झालेल्या आरोपींची नावे असून त्यांचा शोध सुरू आहे. ही कारवाई 31 जुलैच्या रात्री नागपुरीगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली. काही युवकांनी चेहऱ्यावर दुपट्टे बांधलेले असून ते संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तातडीने कारवाई केली. पाच आरोपी डकैतीच्या तयारीत असल्याचे निदर्शनास आले. त्यापैकी तिघांना पकडण्यात यश आले, तर दोन जण फरार झाले. पोलिस उपनिरीक्षक प्रशांत पारधी यांच्या तक्रारीवरून पाचही आरोपींविरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला आहे.

# ई-चालान : आतापर्यंत 4.47 कोटींचा दंड जमा

## अमरावती ग्रामीण पोलिसांची मोठी कामगिरी | 31 ऑगस्टपर्यंत विशेष मोहीम सुरुच

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 3 ) –** अमरावती ग्रामीण जिल्ह्यात वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या वाहनचालकांसाठी पोलिसांकडून जोरदार कारवाई सुरू आहे. ई-चालानच्या माध्यमातून प्रलंबित दंड वसुलीसाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत आतापर्यंत तब्बल 4 कोटी 47 लाख रुपयांचा दंड शासन खात्यात जमा करण्यात आला आहे. या मोहिमेला नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत



असून, ती येत्या 31 ऑगस्ट 2025 पर्यंत सुरू राहणार आहे.

1 जानेवारी ते 31 जुलै या कालावधीत विशेष मोहिमेअंतर्गत, वाहनचालकांच्या राहत्या पत्त्यावर नोटिसा पाठवून प्रलंबित ई-चालानची माहिती देण्यात आली. वाहतूक पोलिसांच्या विशेष पथकांनी घरोघरी जाऊन जागृती केली, तसेच थकबाकीदारांकडून थेट वसुलीही सुरू ठेवली. त्यातून अनपेड ई-चालान केसेसमधून 3,10,72,400, नियमित केसेसमधून 1,36,93,250 अशी एकूण 4,47,65,650 रक्कम वसूल करून शासन तिजोरीत जमा करण्यात आली.

### 154 प्रकरणे थेट न्यायालयात

ई-चालान असूनही दंड न भरलेल्या वाहनचालकांविरोधात 154 प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आली आहेत. तसेच, न्यायालयाची परवानगी घेऊन वाहने जप्त करण्याची मोहिमही सुरू करण्यात आली आहे. अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी स्पष्ट इशारा दिला आहे. प्रलंबित ई-चालान दंड तातडीने भरा, अन्यथा न्यायालयीन कारवाई व वाहन जप्तीला सामोरे जावे लागू शकते. त्यांनी नागरिकांना वाहतूक पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करत, 31 ऑगस्टपूर्वी दंड भरण्याचे आवाहन केले आहे.

### तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**अमरावती :** शहरातील नवसारी परिसरात एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. नितीन नामदेवराव सुसाळकर (वय 45) असे मृत तरुणाचे नाव असून ते छत्रपती शिवाजी चौक परिसरात राहत होते. मिळालेल्या माहितीनुसार, नितीन सुसाळकर यांनी स्वत:च्या राहत्या घरात गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली. ही घटना उघडकीस येताच परिसरात खळबळ उडाली असून घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

# दत्त मंदिर संस्थानच्या जमिनीवरील तहसीलदारांचा आदेश रद्द करा

## महाराष्ट्र मंदिर महासंघाची मागणी

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर ( दि. ३ ) :** अचलपूर तहसीलदारांनी दत्त मंदिर संस्थानच्या मालकीची नायगाव येथील शेतजमीन ताब्यातील व्यक्तीच्या नावावर खरेदी करून देण्याचा जो आदेश 13 एप्रिल 2023 रोजी दिला, तो पूर्णत: बेकायदेशीर असून रद्द करण्यात यावा, अशी जोरदार मागणी महाराष्ट्र मंदिर महासंघाने केली आहे. याबाबत महासंघाने उपविभागीय अधिकारी (एस.डी.ओ.), अचलपूर यांच्याकडे औपचारिक निवेदन सादर केले.



सदर मालमत्तेचा खरेदी हक्क यापूर्वीच 8 सप्टेंबर 1965 रोजी तत्कालीन तहसीलदारांनी रद्द केला होता. त्यामुळे कब्जेदारांच्या वारसांना खरेदी करण्याचा अधिकारच नाही, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, विद्यमान विश्वस्तांना प्रकरणात पक्षकार न करता, मृत विश्वस्ता विरुद्ध आदेश देण्यात आला, जो कायदेशीर प्रक्रियेला आणि नैसर्गिक न्यायतत्त्वांना धरून नाही.

भुजवाडा दर्यापूर येथील काळेश्वर महादेव संस्थानच्या प्रकरणातून माहिती मिळाल्यानंतर, दत्त मंदिर संस्थानचे विश्वस्त महासंघाच्या संपर्कात आले. त्यानंतर महासंघाने त्वरीत हालचाल करत सदर प्रकरणाचा पाठपुरावा केला आणि एस.डी.ओ. अचलपूर यांच्याकडे निवेदन सादर केले. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार, मंदिर संस्थांची मालमत्ता ही सार्वजनिक हितासाठी असते आणि ती खाजगी व्यक्तीच्या नावावर वर्ग करता येत नाही. त्यामुळे तहसीलदार अचलपूर यांनी दिलेला आदेश हा देवस्थान मालमत्तेवर आक्रमण करणारा असून, तो कायद्या विरोधी आहे, असे महासंघाने स्पष्ट केले आहे. निवेदन सादर करताना महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राज्य कोअर कमिटी पदाधिकारी अनुप जयस्वाल, सदस्य विनीत पाखोडे, दत्त मंदिर संस्थानचे विश्वस्त अविनाश जुनघरे, श्रीकृष्ण सावरकर, दीपक जावरकर, सुरेश पवार तसेच अचलपूर येथील मंदिर सेवक मयूर दीक्षित आणि अजय तिवारी उपस्थित होते. तहसीलदारांचा आदेश त्वरित रद्द करावा, संस्थेच्या मालकीचा हक्क पुन:स्थापित करावा व देवस्थान मालमत्तेच्या सुरक्षेसाठी प्रशासनाने तत्काळ पावले उचलावीत, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

# तिवसा शहर, तालुका अंधारात

## वीजबिघाडावर तांत्रिक टीमचा यशस्वी प्रयत्न

**महासागर प्रतिनिधी**
तिवसा, (दि. 3) – येथील महावितरणच्या 33 केव्ही उपकेंद्रातील सिटी यंत्रणेत अचानक बिघाड झाल्यामुळे शुक्रवार, 2 ऑगस्ट रोजी सायंकाळपासून संपूर्ण तिवसा शहर आणि तालुक्याच्या काही भागातील वीजपुरवठा ठप्प झाला. बिघाड इतका गंभीर होता की, व्हीसीबी ब्रेकरमधील कॉईल जळाल्याचेही आढळून आले. त्यामुळे वीजपुरवठा सुरळीत करण्यात अधिक वेळ लागला. तब्बल रात्री 1.50 वाजेपर्यंत तिवसावासीयांना अंधारात राहावे लागले.



संध्याकाळी 5 वाजल्यापासून मध्यरात्रीपर्यंत वीजपुरवठा खंडित राहिल्यामुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले. स्थानिक यंत्रणेच्या प्रयत्नांनंतरही वीजपुरवठा सुरू न झाल्याने अमरावती येथील महापारेषणच्या चाचणी विभागाची तज्ज्ञांची विशेष टीम तिवसाला पाचारण करण्यात आली.

या टीममध्ये सुधीर गिरी (अति. कार्यकारी अभियंता), मंगला ठाकूर (सहाय्यक अभियंता), निघोट साहेब (उपकार्यकारी अभियंता), श्रीकांत चुटके यांच्यासह इतर अभियंत्यांचा समावेश होता. महावितरण, पारेषण आणि चाचणी विभागाच्या संयुक्त प्रयत्नांमुळे अखेर रात्री उशिरा वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला.

या दुरुस्तीच्या कामात तिवसा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता निलेश उईके, सहाय्यक अभियंता रमेशकुमार मिश्रा, बमनोटे साहेब आणि त्यांच्या तांत्रिक टीमने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. यंत्रचालक नितीन वाटणे, महेश साबळे, बोराळे, अभिजीत केचे, चेतन भगत, रामदास चव्हाण, रोशन गवळी, सचिन रुंद्रे, दशरथ सोळंके, सलीम शहा, प्रविण टवकर, वैभव चिंचखेडे, गौरव खाकसे, निखिल चांदुरकर, रविंद्र डहाके, अभिनय काळे, प्रशांत बाखळे, सागर बोके, धीरज कुरणासे, सूरज अळणे यांनी रात्रभर परिश्रम घेतले.

# कॅलिडोस्कोप

## कराचीत रामायण हिट!

पाकिस्तानसारख्या मुस्लिमबहुल देशात हिंदू धर्माची सर्वात पवित्र आणि प्रसिद्ध कथा 'रामायण' रंगमंचावर दाखवली जाते, याची तुम्ही कल्पना करू शकता का? तेही इतक्या प्रेमाने आणि आदराने की लोक टाळ्या वाजवत राहतात? पण कराचीमध्ये असेच घडले. पाकिस्तानातील कराची शहरातील एका 'थिएटर ग्रुप'ने हे मोठे आणि मार्मिक पाऊल उचलले आहे. 'मौज' असे या ग्रुपचे नाव असून या नाटकाचे दिग्दर्शन योगेश्वर करेरा यांनी केले होते.



ही कथा रंगमंचावर आणल्यास कुणाचा अपमान होईल, अशी भीती कधीच वाटली नाही, असे करेरा यांनी सांगितले. 'रामायणाने मला नेहमीच प्रेरणा दिली आहे. ही केवळ एका धर्माची कथा नाही, तर चांगुलपणाच्या विजयाची आणि प्रेमाच्या सामर्थ्याची कथा आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये कराचीतील दुसऱ्या मजल्यावर (टीटूएफ) हे नाटक पहिल्यांदा सादर करण्यात आले होते आणि आता जुलैमध्ये पुन्हा 'आर्ट कौन्सिल ऑफ पाकिस्तान'मध्ये हे नाटक मोठ्या प्रमाणावर सादर करण्यात आले. नाटकात जड असे काहीच नव्हते. तरीही प्रत्येक दृश्यात हृदयस्पर्शी खोली होती. साधेपणात त्याचे सौंदर्य दडलेले होते.


रंगमंचावर प्रकाशयोजना, लाईव्ह म्युझिक, रंगीबेरंगी वेशभूषा आणि अगदी 'एआय'चा वापर यामुळे प्रेक्षक रामायणाच्या युगात पोहोचल्यासारखे वातावरण निर्माण झाले. या नाटकातील सर्व पात्रांची निवड अत्यंत काळजीपूर्वक करण्यात आली होती. राणा काझमी यांनी सीतेची भूमिका साकारली. ती इतकी शांत, कणखर आणि भावूक दिसत होती, की सर्वजण तिच्याकडे पाहत होते. रामाची व्यक्तिरेखा अश्मल लालवानी यांनी साकारली. त्यांच्या गांभीर्याने या व्यक्तिरेखेत चैतन्य आणले. त्याचवेळी रावण संहन गाझी बनला. त्याचा राग, आवाज आणि शैली हीच रावणाकडून अपेक्षित होती. इतर कलाकारांमध्ये आमिर अली (राजा दशरथ), वकास अख्तर (लक्ष्मण), जिब्रान खान (हनुमान) आणि सना तोहा (राणी कैकेयी) यांचा समावेश आहे.

हल्ली तंत्रज्ञान सगळीकडे आहे. पण या नाटकात 'एआय'चा (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) वापर बहुधा पहिल्यांदाच पाकिस्तानात पाहायला मिळाला. झाडांची पाने वाऱ्यात थरथरायला लागली तेव्हा राजाचा राजवाडा एकदम खरा दिसू लागला आणि दृश्याबरोबर सेटही बदलू लागला. सारे वातावरण जादुई झाले. ते सर्व 'एआय'चा वापर करून तयार केले होते वास्तवात झाडे नाहीत, किल्ले नाहीत, पण ते अगदी खरे दिसते. राणा काझमी म्हणाले, 'तंत्रज्ञान असताना त्याचा योग्य वापर का केला जात नाही. प्रत्येक दृश्य जिवंत व्हावे अशी आमची इच्छा होती आणि 'एआय'ने आम्हाला मदत केली. नाटक संपताच संपूर्ण सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. काही लोकांच्या डोळ्यात अश्रूही होते. पाकिस्तानातील रंगमंचावर त्यांनी रामायण इतक्या प्रेमाने पाहिले, यावर कुणाचाच विश्वास बसत नव्हता. कलेला कधी धर्म दिसत नाही, माणुसकी दिसत नाही, हे या क्षणातून सिद्ध होते.

## नातं पक्षी आणि माणसांचं

कर्नाटकमधल्या मांड्या जिल्ह्यातल्या कोक्करेबेल्लूर गावात अनोखे पाहुणे येतात आणि गावातले लोक या पाहुण्यांची सरबराई करण्यात मग्न होतात. थंडीच्या दिवसात या गावात स्थलांतरित पक्षी येतात आणि इथले लोक या पक्ष्यांची आपल्या मुलींप्रमाणे देखभाल करतात. या पक्ष्यांना मुली तर त्यांच्या पिलांना नातवंड मानून सेवा केली जाते. पेलिकन आणि पेंटेड स्टॉर्कसारखे स्थलांतरित पक्षी या ठिकाणी येतात. हे पक्षी माहेरपणासाठी आले आहेत असंच इथले लोक मानतात. पेलिकन प्रजातीचे पक्षी ऑक्टोबर महिन्यात या गावात दाखल होतात. इथेच हे पक्षी अंडी घालतात. अंड्यांमधून पिल्लं बाहेर येतात. ही पिल्लं एप्रिलपर्यंत उडायला शिकतात. मगच हे पक्षी इथून जातात. बाळंतपणासाठी आलेल्या या मुलींना इथले लोक खूप जपतात. पेंटेड स्टॉर्क जातीचे पक्षी जुलै महिन्यापर्यंत इथे राहतात. पक्षी आणि गावकऱ्यांचं हे नातं पिढ्यानपिढ्यांचं आहे. जवळपास २०० वर्षांपूर्वीपासून गावात ही परंपरा सुरू झाली. आजही इथे परंपरेचं पालन केलं जातं. गावकरी या पक्ष्यांच्या अस्तित्वाला शुभ मानतात. या पक्ष्यांच्या तसंच त्यांच्या पिल्लांच्या सुरक्षेची पूर्ण काळजी घेतली जाते. झाडांवर बांधलेल्या घरट्यांमधून पक्ष्यांची पिल्लं जमिनीवर पडू नयेत यासाठी झाडांखाली जाळ्या बांधल्या जातात. गावकऱ्यांसोबत प्रशासनही हे काम करतं. हे पक्षी मासे खातात.. जवळच्या नदीवर जाऊन ते आपलं अन्न मिळवतात. गावकरी आणि या पक्ष्यांचं हे नातं अनोखंच म्हटलं पाहिजे.





## चिमुकला महापौर

या जगात कुठे काय घडेल याचा नेम नाही. आपल्या देशात ठराविक वयानंतर निवडणूक लढवता येते. अठरा वर्षं पूर्ण झाल्यानंतर मतदानाचा अधिकार मिळतो. पण एकदा अमेरिकेत अवघ्या सात महिन्यांचा मुलगा महापौरपदी विराजमान झाला होता. इथल्या व्हाईटहॉल शहरात चिमुकल्या विलियम चार्ली मॅकमिलनला मानद महापौरपद देण्यात आलं होतं. एवढ्या लहान मुलाला मानद महापौर पद देण्याची ही पहिलीच वेळ असावी. गंमत म्हणजे या मुलाने महापौरपदाची शपथही घेतली. ही शपथ त्याच्या आईवडिलांनी वाचली. चार्लीच्या शपथविधी सोहळ्याला १५० लोक उपस्थित होते. व्हाईटहॉल वॉलंटियर अग्निशमन विभागाच्या वार्षिक बीबीक्यू फंडरेझर कार्यक्रमाअंतर्गत महापौरपदासाठी बोली लावली जाते. त्या वर्षी चार्लीच्या नावे सर्वाधिक बोली लावण्यात आली होती. यानंतर त्याची महापौरपदी नियुक्ती करण्यात आली. आईवडील शपथ वाचत असताना चार्ली त्यांच्या मांडीवर बसला होता. या कार्यक्रमाचं आयोजन चार्लीच्या आईवडिलांनीच केलं होतं. या कार्यक्रमात देशभक्तीपर गाणीही म्हटली गेली. यावेळी चार्ली खूप आनंदी दिसत होता. या चिमुकल्या महापौराचं सर्वांनी अभिनंदनही केलं.

## लग्नातच घेतला सूड



मंडप सजवलेला आहे. वधू-वर स्टेजवर बसलेले आहेत आणि लग्नातील सर्वात महत्वाचा क्षण आला आहे, कुंकू लावण्याचा. पण कुंकू उचलताच वधूचा विचार बदलतो. ती त्याच्याकडे पाहते आणि म्हणते, कृपया कुंकू लावताना काळजी घे. ते माझ्या चेहऱ्यावर पडले तर काय होईल याचा विचार कर. वर थोडा वेळ घाबरतो. नंतर हसत हसत म्हणतो हो बाळा आणि अगदी हळूवारपणे कुंकू लावण्याचा प्रयत्न करतो. तो एक छोटीशी चूक करतो आणि वधूच्या गालावर थोडे कुंकू पडते. आतापर्यंत शांत बसलेली वधू पुढच्याच क्षणी रुद्रावतार धारण करते. एकही क्षण वाया न घालवता, ती वराच्या हातातून कुंकवाची पेटी हिसकावून घेते आणि जणू सूड घेत असल्याप्रमाणे त्याच्या चेहऱ्यावर घासते. आतापर्यंत सात फेरे घेऊन सात जन्मांचे स्वप्न पाहणारा गरीब वर आता कुंकवाने माखलेल्या चेहऱ्याने शांत, असहाय्य आणि आश्चर्यचकित होऊन उभा असतो.



## नदीच्या पाण्यावर चालते महिला!

आजकाल 'सोशल मीडिया'वर काय दावा करण्यात येईल. काय दिसेल याचा काही नेम नाही. 'सोशल मीडिया'वर फॉलोअर्स वाढवण्यासाठी असे काही एडिटिंग करण्यात येते, की भले भले तोंडात बोट घालतात. अचानक बागेतील झोपाळे जोरजोरात हलतात. पांढरी साडी घातलेली स्त्री मध्यरात्री एकटीच फिरताना दिसते. स्मशानभूमीत लिंबू हवेत तरंगते, तर काही ठिकाणी हवेत स्त्री तरंगताना दिसते. 'सोशल मीडिया'वर कारनामे करणारे कमी नाहीत. असाच एक कारनामा एका पोस्टमध्ये दिसला. त्यात एक महिला नदीच्या पाण्यावर चालत असल्याचे दिसले. लोकांनी हा चमत्कार असल्याची आवई उठवली. लोकांनी त्या स्त्रीची पूजा सुरू केली. अनेकांनी तिला पाहताच हात जोडले. काहींनी पायावर लोटांगण घेतले. काहींना साष्टांग दंडवत घातला. पण जेव्हा खरा प्रकार समोर आला. तेव्हा त्यांचे चेहरे पाहण्यासारखे झाले होते.

मध्य प्रदेशातील जबलपूरमध्ये ही घटना घडली. येथील नर्मदा नदीच्या पाण्यावर एक वृद्ध महिला पाण्यावरून चालत जात असल्याचे दिसत होते. महिला नदीच्या पाण्यावर चालत जात असल्याच्या चमत्काराचा दावा करण्यात आला. व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर अनेक लोकांनी नदीच्या काठावर महिलेला पाहण्यासाठी एकच गर्दी केली. ही चर्चा आसपासच्या गावातही पोहचली. तेव्हा अनेक लोक वाहने करून नदीकाठी धावली. त्यांच्या डोळ्यावर विश्वासच बसेना. याठिकाणी महिलांची संख्या अधिक होती. काही महिलांनी तर पूजेचे साहित्य मागवले आणि दुरूनच पूजा करायला सुरुवात केली. काहींनी त्या महिलेचा जयजयकार सुरू केला. हा काय चमत्कार आहे हे लोकांच्या लक्षात येईना. अनेकांनी त्याचे फोटो काढले. व्हिडीओ शूट केला.

ती महिलाच थोड्या वेळाने इतकी गर्दी का जमली ते पाहण्यासाठी समोर आली. ती नदीच्या काठाकडे आली. नर्मदेचे पात्र विस्तीर्ण आहे. एका दूरच्या काठावरून लोक ती पाण्यावर चालत असल्याचे पाहत होते. ती थोड्यावेळाने त्या गर्दीकडे पाण्यातून मिळेल तशी वाट काढत पोहचली. ती जवळ येताच लोकांनी देवी माँ म्हणून एकच जयजयकार केला. मग महिलेने हा काही चमत्कार नसल्याचे सांगितले. पात्र विस्तर्ण असल्याने अनेकांना ती पाण्यावर चालत जात असल्याचे वाटले; पण त्या ठिकाणी पाणी अत्यंत कमी असल्याचे त्या महिलेने सांगितले. ऊन-सावलीच्या खेळामुळे ती पाण्यावर चालत असल्याचा भ्रम अनेकांना झाल्याचे ती महिला म्हणाली.

ही महिला नर्मदा परिक्रमा करत आहे. ती अखेरच्या टप्प्यात या परिसरात होती. ती कमी पाण्यातून जात असताना अनेकांना ती पाण्यावरून चालत जात असल्याचा भास झाला. या महिलेला काही औषधींची माहिती आहे, जी आजारावर आणि हाड मोडल्यावर प्रभावी ठरतात. तिला आयुर्वेदामधील काही चिकित्सा पद्धतीची माहिती असल्याची माहिती तिने दिली. तिने नर्मदा परिक्रमेत कोणत्या झाडाचा पाला कसा उपयोगात आणायचा याची माहिती दिली.

## हनिमूनच्या रात्रीच संशय

लग्न हे नातं विश्वासावर अधिक खुलतं. नववधू लग्न होऊन सासरी जाते तेव्हा ती फक्त एका व्यक्तीवर विश्वास ठेवते. पण तीच व्यक्ती विश्वासाला तडा देते तेव्हा... असाच काहीसा प्रकार एका जिल्ह्यात घडला आहे. हनिमूनच्या रात्री नवरीला चक्कर आली तर नवऱ्याने थेट तिला प्रेग्नेंसी टेस्ट किट दिली. हे बघून नववधू चांगलीच भडकली. एवढंच नाही तर तिने थेट माहेरी फोन करुन हा प्रकार सांगितला. यानंतर नववधूच्या माहेरच्यांनी थेट सासर गाठलं.

एका तरुणाचं पारंपरिक पद्धतीने लग्न झालं. वरात घरी पोहोचायला संध्याकाळी झाली. दिवसभराचा शीण आणि लग्नाचा ताण यामुळे नववधूला चक्कर आली. हा सगळा प्रकार बघताच वर घाबरला. त्याने हा सगळा प्रकार आपल्या मित्रांना सांगितला. तेव्हा मित्रांनी मस्करीत म्हटलं की, ही तर सगळी गरोदर असण्याची लक्षणे आहेत. या गोंधळात वर रात्रीच गावाबाहेरच्या मेडिकलमध्ये गेला आणि प्रेग्नेन्सी टेस्टचं किट विकत घेऊन आला.

हनिमूनच्या दिवशी नवऱ्याने नववधूला किट दिलं आणि टेस्ट करायला सांगितलं. हा सगळा प्रकार बघून नववधू हैराण झाली आणि तिने थेट आपल्या वहिनीला फोन केला. आपला नवरा आपल्यावर संशय घेत असल्याचं सांगितलं. एवढंच नव्हे, तर या आधी तुझा कुणासोबत संबंध होता का? असंदेखील विचारलं. वहिणीने हा सगळा प्रकार खूप गांभीर्याने घेतला आणि कुटुंबाला याची माहिती दिली. काही वेळातच नववधूच्या माहेरच्या मंडळींनी भेट घेतली आणि सासरच्या लोकांना हा सगळा प्रकार सांगितला. मुलगी लग्न होऊन घरी येताच हा सगळा प्रकार घडल्यामुळे माहेरच्यांनी कुटुंबाला जाब विचारायला सुरुवात केली. हे सगळं प्रकरण इतकं वाढलं, की गावातील लोकांना यामध्ये हस्तक्षेप करावा लागला. पंचायत बोलावण्यात आली. सुरुवातीला खूप गोंधळ झाला. नववधू आपल्या मतावर ठाम राहिली. वराने स्पष्टीकरण देताना सांगितले, की असे वागण्यामागे कोणतीही चुकीची भावना नव्हती.

दोन्ही बाजूंनी पंचायतीसमोर आपली आपली बाजू मांडली. अखेर नवऱ्याने आपली चूक मान्य करून नववधु आणि जवळच्या मंडळींकडे माफी मागितली. पंचायतीत सांगितलं की, यापुढे अशा पद्धतीचा कोणताही गैरव्यवहार होणार नाही. तेव्हा त्याने सांगितलं की, त्याला मित्रांनी चुकीचा सल्ला दिला आणि त्यानेही तो विचार न करता मान्य केला.





## हॉटेल बर्फाचं

स्वीडनमध्ये एक अनोखं हॉटेल आहे. हे हॉटेल बर्फापासून तयार केलं जातं. लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे हे हॉटेल कायमस्वरुपी नाही. ते हिवाळ्यात तयार केलं जातं आणि पाच महिन्यांनी वितळून जातं. बर्फाचं हे पाणी नदीत सामावून जातं. १९८९ मध्ये पहिल्यांदा ही संकल्पना लढवण्यात आली. यंगवे बर्गक्विस्ट यांच्या संकल्पनेतून हे जगावेगळं आईस हॉटेल तयार करण्यात आलं होतं. यंदा या हॉटेलला ३६ वर्षं पूर्ण होत आहेत. म्हणूनच यंगवे बर्गक्विस्ट यांनी पर्यटकांच्या, पाहुण्यांच्या स्वागताची जय्यत तयारी केली आहे. त्यांनी आगळ्यावेगळ्या खोल्या तयार करून घेतल्या आहेत. सोळा देशांमधल्या ३३ कलाकारांनी अवघ्या एक आठवड्यात या खोल्या तयार केल्या आहेत. हे हॉटेल आर्क्टिक वर्तुळापासून २०० किलोमीटर अंतरावरच्या टॉर्न नदीत तयार केलं जातं. हिवाळ्यात इथलं तापमान उणे १८ ते ४० अंश सेल्सियस इतकं खाली जातं. हॉटेल बर्फाच्या १००० खांबांवर उभं आहे. प्रत्येक खांबाचं वजन जवळपास दोन टन इतकं आहे. या हॉटेलमध्ये दरवर्षी जवळपास ७० हजार पर्यटक येतात. हॉटेलमध्ये बारा खोल्या आहेत. तसंच आईस बारही आहे. बर्फाच्या या हॉटेलमध्ये रहाणं हा भन्नाट अनुभव ठरू शकतो.

## सरख्या भावा-बहिणीचे लग्न?

थायलंड, समृद्ध संस्कृती, सुंदर मंदिरे आणि अद्वितीय परंपरांसाठी ओळखला जाणारा देश आहे. येथील एका परंपरेने संपूर्ण जगाचं लक्ष वेधले आहे. इथे जुळ्या भावा-बहिणींचे लग्न लावले जाते. हे ऐकायला कितीही विचित्र वाटत असले तरी, स्थानिक समुदायांसाठी ते तितकेच पवित्र आणि महत्त्वाचे आहे. या परंपरेमागे बौद्ध श्रद्धा आणि भूतकाळातील जीवनाच्या कथा आहेत, ज्यामुळे ती आणखी रंजक बनते.



थायलंडमधील काही समुदायांमध्ये विशेषतः समुत प्राकानसारख्या भागात असा विश्वास आहे, की जुळी मुले एकाच आईपासून जन्मलेले भाऊ आणि बहीण असतील तर ते मागील जन्मात प्रेमी होते. बौद्ध धर्माच्या सिद्धांतानुसार मागच्या जन्मात काही कार्य राहिलं असेल तर जुळ्या भावा - बहिणीचा जन्म होतो. या मुलांचं लग्न प्रतीकात्मक समारंभात केलं नाही तर त्यांचे जीवन अपयश, आजार किंवा अशांततेने भरलेलं असू शकते, असे मानले जात. म्हणूनच, जुळी मुले ६ ते ८ वर्षांची होताच आई - वडील एका भव्य समारंभात त्यांचे लग्न लावून देतात.

या अनोख्या लग्नात सामान्य थाई लग्नात होणाऱ्या सर्व पारंपारिक विधींचा समावेश आहे. या सोहळ्यात मुलाला नव्या नवऱ्याप्रमाणे सजवण्यात येतं. नवऱ्या मुलाला जवळपास पाच लाख रुपयांचे दागिने देण्याची रित आहे. तर मुलीला वधूचा पोशाख घातला जातो आणि समारंभात पारंपारिक नृत्य, संगीत आणि मेजवानी यांचा समावेश असतो. मुलांचे आई - वडीलच त्यांचे सासू - सासरे देखील होतात. मोठ्या थाटात भावा - बहिणीचं लग्न केलं जातं. याला सांस्कृतिकदृष्ट्या मोठं महत्त्व आहे. परंतु असं लग्न कायदेशीरदृष्ट्या वैध नाही. थायलंडच्या कौटुंबिक कायद्यानुसार, भावंडांमध्ये किंवा जवळच्या रक्ताच्या नात्यातील विवाह प्रतिबंधित आहे. हे लग्न केवळ एक प्रतिकात्मक विधी असतो. त्याचा उद्देश मुलांचं भविष्य आनंदी आणि समृद्ध करणं हे आहे. लग्न सोहळा पार पडल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून मुलं त्यांचं आयुष्य सामान्य मुलांप्रमाणे जगण्यास सुरुवात करतात. त्यानंतर लग्नाचं वय झाल्यानंतर आपल्या आवडत्या व्यक्तीसोबत नव्या आयुष्याची सुरुवात करतात. या परंपरेत हुंड्याला थाई भाषेत 'सिन सॉड' असं म्हणतात.



## अपघात रोखणारं स्मार्ट हेल्मेट

थंडीच्या दिवसात वातावरणात धुकं असतं. या धुक्यामुळे वाहनचालकांना समोरचं स्पष्ट दिसत नाही आणि अपघात होण्याचा धोका अनेक पटींनी वाढतो. म्हणूनच एक स्मार्ट हेल्मेट तयार करण्यात आलं आहे. हे हेल्मेट दुचाकी चालकांसाठी तयार करण्यात आलं असून ते घातल्यानंतर चालकांना सतत सूचना दिली जाईल. या हेल्मेटमध्ये अल्ट्रा सोनिक सेंसर्स बसवण्यात आले आहेत. या सेंसर्समुळे समोर एखादं वाहन किंवा वस्तू असल्यास चालकाला सूचना मिळेल. १४ मीटर अंतरावरूनच चालकाला सूचना दिली जाईल. हेल्मेटवरच्या एलसीडीवर अंतरही फ्लॅश होईल. आर्मी पब्लिक स्कूलच्या संकल्पसिंह भादौरियाने हे हेल्मेट तयार केलं असून याची किंमत फक्त एक हजार रूपये आहे. या हेल्मेटची प्रतिकृती एमईटी विद्यापीठातल्या स्काय आर्ट प्रदर्शनात सादर करण्यात आली होती. या हेल्मेटला ब्रिद ॲनलायझर सिस्टिमही जोडण्यात आली आहे. यामुळे मद्यपान करणाऱ्यांच्या शरीरातल्या अल्कोहोलचं प्रमाण मोजणंही शक्य होणार आहे. चालकाच्या शरीरात अल्कोहोलचं अधिक प्रमाण असल्यास हे हेल्मेट गाडीचं इंजिन बंद करून टाकेल. म्हणजे चालकाला गाडी चालवता येणार नाही आणि अपघात टळू शकेल.

## डॉ. आंबेडकर महाविद्यालयाने समाज परिवर्तनाचे माध्यम म्हणून कार्य करावे

# हिरक महोत्सवी सोहळ्यात मुख्यमंत्री फडणवीस यांचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

नागपूर येथे डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या हिरक महोत्सवी सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाविद्यालयाने समाज परिवर्तनाचे माध्यम म्हणून कार्य करावे असे आवाहन केले. त्यांनी महाविद्यालयाच्या ६० वर्षांच्या गौरवशाली परंपरेचा उल्लेख करून गुणवत्तेचा प्रवास विस्तारून नवीन शिखरे गाठण्याचा विश्वास व्यक्त केला. सोहळ्यात भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते.




दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई अध्यक्षस्थानी होते. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, मुंबई उच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि दीक्षाभूमी स्मारक समितीचे अनेक सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात सांगितले की डॉ. आंबेडकर महाविद्यालयाने वंचित समाजाला शिक्षणाची दारे उघडी करून त्यांच्या जीवनात परिवर्तन घडवले आहे. त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या समतेचे राज्य, संधीची समानता आणि प्रत्येकाला स्वप्न पाहण्याच्या अधिकाराचा उल्लेख केला.

सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी विद्यार्थ्यांना स्वतःचा विकास साधताना समाजातील मागास घटकांना पुढे घेऊन जाण्याचा डॉ. आंबेडकरांचा महान विचार अंगीकारण्याचे आवाहन केले. महाविद्यालयाची सुरुवात केवळ ५ वर्ग खोल्या, ५ शिक्षक आणि ३०० विद्यार्थ्यांपासून झाली होती. आज हिरक महोत्सवी वर्षात ते ६ हजार विद्यार्थी, ५० वर्ग खोल्या आणि ४० प्राध्यापकांसह गौरवपूर्ण स्थितीत पोहोचले आहे. महाविद्यालयाने विविध शैक्षणिक मानकांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली असून, विविध विद्याशाखांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठी स्पर्धा असते.

# विदर्भातील उद्योगवाढीचा अभ्यास करावा : नितीन गडकरी

## विदर्भ विभागीय कार्यालयाचे गडकरींच्या हस्ते उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

कुठल्याही उद्योगाच्या विकासासाठी पाणी, ऊर्जा, वाहतूक आणि संचार या गोष्टी महत्त्वाच्या असून विदर्भातील खनिज, कोळसा, वनउत्पादन पर्यटन कापूस उद्योग या सर्व उद्योगवाढीच्या संभावनांचा कॉन्फिडरेशन ऑफ इंडिया इंडस्ट्रीच्या विदर्भात होत असलेल्या विभागीय कार्यालयाने अभ्यास करून या क्षेत्रातील कमकुवत दुवे ओळखावे आणि त्यांना बलस्थानामध्ये रूपांतरित करावे, यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य केंद्र आणि राज्य सरकार करेल अशी ग्वाही केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूर मध्ये दिली. नागपुरात भारतीय उद्योग महासंघाच्या (सीआयआय) नवीन विदर्भ विभागीय कार्यालयाचे उद्घाटन आज त्यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते.

विभागीय कार्यालयाचा उद्घाटन कार्यक्रम आणि त्यासोबतच्या इंडिया@१००: चार्टिंग विदर्भाज जरनी टू डेवलप्ड इंडिया या शीर्षकाखाली आयोजित परिषदेत बोलताना गडकरी यांनी सांगितले की, विदर्भात पायाभूत सुविधांच्या विकासामध्ये कुठलीही उणीव नसून




उद्योगांनी यशस्वी तंत्रज्ञान वापरून या क्षेत्राच्या अनुरूप उद्योगांचा विकास केला पाहिजे. गडकरींनी सांगितलं की, विदर्भाच्या जवळ असणाऱ्या आंध्र प्रदेशमधील बंदरे ही मालवाहतूक खर्चामध्ये कपात करू शकतात. विजयवाडा ते नागपूर हे अंतर ५४५ किलोमीटर असून ते मुंबईच्या तुलनेत कमी असून मुंबईतील मालवाहतुकीची हाताळणी खर्च तसेच वाहतूक कोंडी पाहता आंध्र प्रदेश मधील हे बंदर विदर्भातील मालवाहतुकीचा खर्च कमी करू शकतात. रायपुर ते विशाखापटनम हा ४७ हजार कोटीचा महामार्ग पूर्णत्वास जात असून त्याला गडचिरोलीला जोडून हे आंध्र प्रदेश मधील बंदरे जर विदर्भाच्या जवळ आले तर येथील पोलाद उद्योग तसेच इतर उद्योगांना त्याचा फायदा होईल. भारतात मालवाहतुकीचा खर्च जो पूर्वी १६ टक्के होता तो आता चांगल्या रस्त्यांमुळे १६ टक्क्याहून केवळ १० टक्के वर आला आहे हाच वाहतूक खर्च पुढच्या काळात ९ टक्के अशा एकेरी आकड्यात आणण्याचा आपला प्रयत्न असल्याचे गडकरी यांनी सांगितलं

नवीन सीआयआय विदर्भ क्षेत्रीय कार्यालय हे विकेंद्रित सहभाग आणि प्रदेश-विशिष्ट विकासासाठी उद्योग संस्थेच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

नागपूर हे महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडच्या संगमावर धोरणात्मकदृष्ट्या स्थित असल्याने, हे कार्यालय धोरणात्मक समर्थन, उद्योग-शैक्षणिक सहकार्य आणि एमएसएमई स्पर्धात्मकतेसाठी एक प्रमुख मंच म्हणून काम करेल.असे सीआयआय पश्चिम विभागाचे अध्यक्ष ऋषी कुमार बागला यांनी यावेळी स्पष्ट केले.

## भाजपमध्ये आयात विरुद्ध निष्ठावंत संघर्ष

# नागपूर जिल्ह्यात नाराजीचे वारे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

एखाद्या गोष्टींचा अतिरेक झाला तर त्याचे काय परिणाम होतात. याचे उत्तम उदाहरण सध्या नागपूर जिल्ह्या भारतीय जनता पक्षात पाहायला मिळते. विरोधी पक्ष कमकुवत व्हावा म्हणून त्या पक्षातील नेत्यांना भाजपमध्ये प्रवेश देताना पक्षातील जुन्या नेत्यांना काय वाटेल याची तमाच न बाळगल्याने पक्षातील निष्ठावंताचा असंतोष आता उफाळून बाहेर येऊ लागला आहे. याची सुरुवात माजी आमदार सुधीर पारवे यांनी केली.

पार्टी विथ डिफरंनस, निष्ठा, संस्कृती या शब्दांना गुंडाळून ठेवत आता नवा भारतीय जनता पक्ष उदयास आला असून या पक्षात सध्या स्वपक्षातील कतृत्ववान नेत्यांपेक्षा इतर पक्षातून आयात केलेल्या नेत्यांवर अधिक विश्वास दाखवला जात आहे.

**वादाचे कारण काय?**

वादाची सुरूवात झाली ती जिल्हा भाजपच्या कार्यकारिणीवरून. यात बाहेरून आलेल्यांच्या समर्थकांना अधिक प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे जुने नेते संतापले. त्याची पहिली ठिणगी उमरेड विधानसभा मतदारसंघात तेथील माजी आमदार सुधीर पारवे यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पाठवलेल्या नाराजीच्या पत्राच्या रुपात पडली. उमरेड चे सलग दोन वेळा आमदार राहिलेले सुधीर पारवे पक्षात गडकरी समर्थक म्हणून ओळखले जातात. २०१९ व २०२४ अशा दोन विधानसभा निवडणुकीत ते पराभूत झाले. पक्षाने त्यांचा पर्याय कॉंग्रेस- शिवसेना आणि विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्ये आलेल्या राजू पारवे यांच्या रूपात शोधला. सुधीर पारवे ऐवजी पक्ष राजू पारवे यांना अधिक महत्त्व देऊ लागले. त्यामुळे संतापून सुधीर पारवे यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र लिहून पक्षात आयात नेत्यांना अधिक महत्त्व द्यायचे असेल तर निष्ठावंतासाठी वेगळा सेल उघडा. जिल्हा कार्यकारिणीत राजू पारवे यांच्या समर्थकांचा भरणा अधिक असल्याने ही नाराजी होती.

# दोन अपघातात तीन ठार

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ३ :

वाशीम जिह्यात दोन अपघातात तीन ठार झाल्याच्या घटना रविवारी घडल्या आहेत. भरधाव मोटारीने दोन दुचाकींना धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला. तर दुसऱ्या अपघातात समृद्धी महामार्गावर ट्रकने अज्ञात वाहनाला जोरदार धडक दिली. या अपघातात ट्रक चालकाचा मृत्यू झाला. समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच आहे.



वाशीम जिल्ह्यातील कारंजा-दारव्हा मार्गावर भरधाव मालवाहू मोटारीने (क्र. एमएच २९ बी ७६८) दोन दुचाकींना जोरदार धडक दिल्याची घटना रविवारी घडली. या अपघातात सुभाष किसन चव्हाण (५५ वर्ष रा.शिक्षक कॉलनी, कारंजा) आणि नाना जयसिंगपूरे (५६ वर्ष, रा.खरडगाव ता. नेर, ह.मु. यशवंत कॉलनी, कारंजा यांचा मृत्यू झाला, तर जया नाना जयसिंगपूरे (वय ५०) आणि प्रभू माणिक राठोड (वय ४८ रा. कामठवाडा ता. कारंजा) हे गंभीर जखमी झाले आहेत. नाना जयसिंगपूरे हे पत्नी जया यांच्यासह तेरवीच्या कार्यक्रमासाठी नेर तालुक्यातील लोही येथे दुचाकीने (क्र. एमएच ३७ डी ६८१७) जात होते. सुभाष चव्हाण हे प्रभू राठोड यांच्यासह शेतीचे काम आटोपून दुचाकीने (क्र. एमएच ३७ एबी ५२१२) कारंजाकडे येत होते. यावेळी भरधाव मालवाहू मोटारीने दोन्ही दुचाकींना जबर धडक दिली.

अपघातग्रस्तांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी करून दोघांना मृत घोषित केले. गंभीर जखमी प्रभू राठोड यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथे हलविण्यात आले, तर जया जयसिंगपुरे यांच्यावर स्थानिक खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या अपघातानंतर मालवाहू मोटारीचा चालक वाहन घटनास्थळावर सोडून पसार झाला. या प्रकरणी कारंजा शहर पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला असून आरोपीचा शोध घेतला जात आहे. सुभाष चव्हाण हे मूळचे रामगाव रामेश्वर (ता. दारव्हा) येथील असून ते जिल्हा परिषद शाळेत शिक्षक होते. त्यांच्या पत्नी विजया चव्हाण ग्रामसेविका आहेत. नाना जयसिंगपूरे हे मुरंबी (ता. कारंजा) येथील पशुसंवर्धन विभागात कार्यरत होते. या दुर्दैवी घटनेमुळे दोन्ही कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# शिवसेनेचा बाप मीच

## भाजप आमदार परिणय फुकेंचे वादग्रस्त विधान

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. ३ :

भाजप पक्षाच्या कार्यकर्ता मेळाव्यात भाजप आमदार परिणय फुके यांनी शिवसेना पक्षाबाबत वादग्रस्त विधान केले आहे. शिवसेनेचा बाप मी असल्याचे विधान फुके यांनी केले होते. यावरून शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी नाराज झाल्याचे पाहायला मिळाले आहे. हे शिवसेना कार्यकर्त्यांसाठी खूप दुःखद आहे. फुके यांनी १२ तासांच्या आत त्यांच्या विधानाबद्दल माफी मागावी अन्यथा आम्ही शिवसेना शैलीत त्यांना योग्य उत्तर देऊ, असा इशारा शिवसेना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी रविवारी विश्राम भवनात आयोजित पत्रकार परिषदेत दिला.

यावेळी शिवसेना लोकसभा प्रमुख संजय कुंभलकर म्हणाले, शिवसेना पक्षप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे हेच शिवसेनेचे बाप आहेत. अशा परिस्थितीत कोणीही जबरदस्तीने शिवसेनेचे अवैध बाप बनण्याचा प्रयत्न करू नये. नुकत्याच झालेल्या जिल्हा बँकेच्या निवडणुकीत फुके यांनी शिवसेनेचे उमेदवार डॉ. प्रकाश मालगावे यांना पराभूत करण्यासाठी कॉंग्रेस उमेदवाराला सहा मते देण्याचे षड्यंत्र रचले. त्यामुळे मालगावे यांना पराभवाला सामोरे जावे लागले. फुके यांनी शिवसेनेबद्दल अपमानास्पद भाषा वापरून कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा नेत्याला आवरावे, अन्यथा शिवसेनेचा बाप कोण आहे हे आम्ही सांगू, असा इशारा त्यांनी दिला.

## वीज वाहिनीच्या धक्क्याने बांधकाम मजुराचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ३ :

फुरसुंगी भागात एका गृह प्रकल्पाच्या परिसरात उच्चक्षमतेच्या वीज वाहिनीचा धक्का लागून बांधकाम मजुराचा मृत्यू झाला आहे. या घटनेत मध्य प्रदेशचा ३३ वर्षीय पवन दित्या नायक हा मजूर मृत्युमुखी पडला. २६ जुलै रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास हरपळे वस्तीतील गृह प्रकल्पाच्या कामावर असताना नायक याच्या हातातील बांबूचा स्पर्श वीज वाहिनीला झाला. विजेच्या धक्क्याने तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. सुरुवातीला फुरसुंगी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली होती.

## लोकार्थ

## आकाश एज्युकेशनलची अँथे २०२५ ची घोषणा

मागील १६ वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना यशात रूपांतरित करत आलेल्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड या देशातील अग्रगण्य टेस्ट प्रिपरेटरी संस्थेने आपल्या प्रतिष्ठित उपक्रमाची अँथे 2025 (आकाश नॅशनल टॅलेंट हंट एक्झाम) घोषणा केली आहे.

भारतीय शैक्षणिक क्षेत्रातील एक अत्यंत प्रतीक्षित वार्षिक परीक्षा असलेल्या अँथे 2025 चा उद्देश इयत्ता ५वी ते १२वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने आव्हानांना सामोरे जाण्यास आणि खऱ्या अर्थाने प्रॉब्लेम सॉल्व्हर्स होण्यासाठी सक्षम करणे हा आहे.




गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने अँथे 2025 द्वारे विद्यार्थ्यांना २५० कोटींपर्यंतचे १००% स्कॉलरशिप्स आणि २.५ कोटींच्या रोख पारितोषिकांची संधी दिली जात आहे. ही संधी क्लासरूम, आकाश डिजिटल आणि इन्विक्टस कोर्सेससाठी उपलब्ध आहे. या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांना NEET, JEE, CET, NTSE आणि ऑलिंपियाड्ससारख्या स्पर्धा परीक्षांसाठी आकाशच्या अनुभवी मार्गदर्शकांकडून दर्जेदार मार्गदर्शन घेण्याचा मार्ग खुला होतो.

या वचनबद्धतेला पुढे नेत, आकाश आता इन्व्हिक्टस एस टेस्ट नावाची एक शिष्यवृत्ती परीक्षा देखील सुरू करत आहे. ही परीक्षा 8वी ते 12वीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आकाश इन्व्हिक्टस JEE Advanced तयारी कार्यक्रमात प्रवेश देण्यासाठी आयोजित केली आहे. ही राष्ट्रीय स्तरावरील पात्रता व शिष्यवृत्ती परीक्षा 24 ऑगस्ट, 31 ऑगस्ट आणि 7 सप्टेंबर 2025 रोजी घेतली जाणार आहे. तीन तासांची ही परीक्षा (सकाळी 10 ते दुपारी 1) ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतींमध्ये उपलब्ध असेल.

■ ■ ■

## नॉलेज रिअ‍ॅल्टी ट्रस्टचा ४,८०० कोटी रुपयांचा आयपीओ मंगळवारी उघडणार




नॉलेज रिअ‍ॅल्टी ट्रस्ट भारतात कार्यालय असलेले रीट यांनी इश्यूसाठी किंमतपट्टा ९५ रु. ते १०० रु. प्रति युनिट निश्चित केला आहे. बोली/इश्यू मंगळवार, ५ ऑगस्ट २०२५ रोजी उघडेल आणि गुरुवार, ७ ऑगस्ट रोजी बंद होईल.

किमान बोलीचा आकार रु. १५,००० आहे, जो किमान गुंतवणूक रक्कम आहे. अँकर इन्व्हेस्टर्स आणि स्ट्रॅटेजिक इन्व्हेस्टर्स व्यतिरिक्त इतर बोलीदारांकडून किमान १५० युनिट्ससाठी आणि त्यानंतर १५० युनिट्सच्या पटीत बोली लावता येतात.यामध्ये नॉलेज रिअ‍ॅल्टी ट्रस्ट (इश्यू) द्वारे रु. ४,८०० कोटीपर्यंतच्या युनिट्सचे नवीन जारी करणे समाविष्ट आहे.

हा इश्यू बुक बिल्डिंग प्रक्रियेद्वारे आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (रिअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट) रेग्युलेशन्स, २०१४ आणि ११ जुलै २०२५ च्या रीट मास्टर सर्क्युलरच्या नियमांचे पालन करुन केला जात आहे, ज्यामध्ये इश्यूचा ७५ टक्क्यांपेक्षा जास्त भाग (स्ट्रॅटेजिक इन्व्हेस्टर भाग वगळून) रीट रेग्युलेशन्सनुसार, संस्थात्मक गुंतवणूकदारांना प्रमाणानुसार वाटपासाठी उपलब्ध असेल आणि इश्यूचा किमान २५ टक्के (स्ट्रॅटेजिक इन्व्हेस्टर भाग वगळून) बिगर-संस्थात्मक गुंतवणूकदारांना वाटपासाठी उपलब्ध असेल.

■ ■

## डीएचएल एक्सप्रेसची राखी एक्सप्रेस ऑफर

आंतरराष्ट्रीय एक्सप्रेस लॉजिस्टिक्समध्ये जागतिक आघाडीवर असलेल्या डीएचएल एक्सप्रेसने त्यांची वार्षिक ऑफर राखी एक्सप्रेस सुरु केली आहे. या उपक्रमात आकर्षक सवलती देण्यात आल्या आहेत, आंतरराष्ट्रीय राखी आणि भेटवस्तूंच्या शिपमेंटवर ३,०९९ पासून सुरू होणाऱ्या फ्लॅट फीसह.




ही ऑफर देशभरातील ७००+ रिटेल आउटलेट्सच्या DHL च्या मजबूत नेटवर्कवर आणि त्यांच्या अधिकृत वेबसाइटवर ९ ऑगस्ट २०२५ पर्यंत वैध आहे. स्टोअरमध्ये ही ऑफर मिळवू इच्छिणाऱ्या ग्राहकांना स्टोअरमध्ये त्यांची शिपमेंट बुक करताना फक्त RAKHIGIFTS हा प्रोमो कोड वापरावा लागेल.

रक्षाबंधन भावंडांमधील बंधनाचे, विशेषतः प्रत्येक भावंड एकमेकांना देत असलेल्या प्रेमाचे आणि संरक्षणाचे, उत्सव साजरे करते. आजच्या परस्पर जोडलेल्या जगात, शैक्षणिक उपक्रमामुळे, व्यावसायिक वचनबद्धतेमुळे किंवा जीवनशैलीच्या निवडींमुळे कुटुंबे अनेकदा सीमांद्वारे विभक्त होतात, ज्यामुळे रक्षाबंधनासारखे सण एकत्र साजरे करणे आव्हानात्मक बनते. DHL एक्सप्रेसचे उद्दिष्ट राखी एक्सप्रेस द्वारे सण साजरा करणाऱ्या कुटुंबांना एकत्र जोडणे आहे.

■ ■

## २०२५ ग्रोहे हुरुन इंडिया रिअल इस्टेट अहवाल सादर

ग्रोहे आणि हुरुन इंडियाने भारतातील टॉप १५० रिअल इस्टेट कंपन्यांची २०२५ ची यादी जाहीर केली. भारतातील टॉप रिअल इस्टेट कंपन्यांच्या यादीत प्रवेश करण्यासाठी आता केलेली कपात १,००० कोटी रुपये आहे, जी पाच वर्षांपूर्वीच्या तिमाहीच्या दुप्पट आहे. २०२५ मध्ये भारतातील सर्वात मौल्यवान रिअल इस्टेट कंपन्यांचे एकत्रित मूल्य १६ लाख कोटी रुपये (१८८ अब्ज अमेरिकन डॉलर्स) झाले आहे, जे गेल्या वर्षीच्या तुलनेत १.९ लाख कोटी रुपयांनी वाढले आहे कुवैतच्या जीडीपी आणि जॉर्डन आणि बल्गेरियाच्या एकत्रित जीडीपीपेक्षा जास्त आहे.२०२५ मध्ये ग्रोहे हुरुन इंडिया रिअल इस्टेट १५० कंपन्यांचे एकत्रित मूल्य गेल्या वर्षीच्या ७०% वाढीच्या तुलनेत फक्त १४% वाढले आहे यादीतील इतिहासातील सर्वात कमी ही मंदी बीएसई रिअल्टी निर्देशांकात १२% घट झाली आहे.२ लाख कोटी रुपयांच्या मूल्यासह, डीएलएफ भारतातील सर्वात मौल्यवान हॉस्पिटॅलिटी कंपनी म्हणून आपले स्थान कायम ठेवते२०२५ च्या ग्रोहे हुरुण इंडिया रिअल इस्टेट १५०.लोढा डेव्हलपर्स, ज्याचे मूल्य १.४ लाख कोटी रुपये आहे. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## मोटारचालकाला रस्त्यात बेदम मारहाण

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ३ :

पुढे जाण्यास जागा न दिल्याने मोटारचालक तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आल्याची धक्कादायक घटना सेनापती बापट रस्त्यावरील वेताळबाबा चौकात घडली. तरुणावर वार करुन आरोपी मोटारीतून पसार झाले. या प्रकरणी चतुःश्रृंगी पोलिसंनी तिघांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली. पृथ्वीराज कुमार नरवडे (वय १९, रा. भोसलेनगर, गणेशखिंड रस्ता) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी महेश प्रमोद पवार (वय २९), रोहित अशोक धोत्रे (वय २४), आकाश विलास कुसाळकर (वय ३४, रा. वडारवाडी) यांना अटक करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पृथ्वीराज आणि आरोपी हे ओळखीचे नाहीत. शनिवारी (२ ऑगस्ट) दुपारी पृथ्वीराज सेनापती बापट रस्त्याने मोटारीतून निघाला होता. त्यावेळी आरोपी पवार, धोत्रे, कुसाळकर हे पाठीमागून त्यांच्या मोटारीतून आले. पुढे जाण्यास जागा न दिल्याने आरोपींनी मोटारीतून त्याचा पाठलाग केला.

# ओबीसींच्या जागरासाठी मंडल यात्रा

## ९ ऑगस्टपासून शरद पवार करणार प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :

नागपूर राज्याचे मुख्यमंत्री असतांना शरद पवार यांनी मंडल आयोग राज्यात लागु केला होता. मंडल आयोग लागु करणारे महाराष्ट हे देशातील पहिले राज्य ठरले. ओबीसींसाठी शरद पवार यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले आहे.

शरद पवार यांनी ओबीसींसाठी केलेल्या कायार्ची माहिती राज्यातील जनतेला व्हावी यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या ओबीसी सेलच्या माध्यमातून ९ ऑगस्टपासून मंडल यात्रा काढण्यात येणार आहे. प्रदेश अध्यक्ष राज राजापूरकर यांच्या नेतृत्वात निघणाऱ्या यात्रेला हिरवी झेंडी दाखविण्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार हे स्वतः उपस्थित राहणार असल्याची माहिती पक्षाचे युवा नेते सलील देशमुख यांनी दिली. पहिल्या टप्यात विदर्भातील ११ जिल्ह्यात ही यात्रा जाणार असून तालुक्याच्या ठिकाणी सभा सुध्दा घेण्यात येणार असल्याची माहिती सलील देशमुख यांनी दिली. भाजपचे ओबीसी विरोधी धोरण आणि शरद पवार यांनी ओबीसी समाजासाठी केले कार्य हे जनतेपर्यंत पोहचण्यासाठी ही मंडल यात्रा काढण्यात येत आहे.

मंडल आयोगाची अंमलबजावणी ही ओबीसीच्या जीवनातील सर्वात मोठी सामाजिक परिवर्तन घडवणारी गोष्ट होती. स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली १९५३ मध्ये काका कालेलकर आयोगाची स्थापना ते १९९३ मध्ये तत्कालीन पंतप्रधान व्ही. पी. सिंग सरकारच्या काळात राज्याचे मुख्यमंत्री शरद पवार यांच्या कारकीर्दीत मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी म्हणजे जवळजवळ ४० वर्ष ओबीसींना हक्काचे आरक्षण मिळवण्यास लागली. भाजपा नेहमीच ओबीसी समाजाच्या विरोधात राहली असल्याचा आरोपही सलील देशमुख यांनी यावेळी केला.ओबीसीचे राजकीय आरक्षण रद्द करण्यासाठी भाजपने नेहमीच प्रयत्न केला आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याआधी कर्जमाफीच्या मागणीचे फलक लावणाऱ्या

# प्रहारच्या कार्यकर्त्यांना घेतले ताब्यात

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. ३ :

शेतकरी कर्जमुक्तीसाठी आवाज उठवणे हा गुन्हा झाला आहे का? आपल्या मागण्यांचे फलक लावणे म्हणजे देशद्रोह आहे का?, असा प्रश्न प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सरकाला केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मोर्शी दौऱ्याचे औचित्य साधून केवळ कर्जमाफीची तारीख कधी? असा सवाल करणाऱ्या शेतकऱ्यांना व प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.




वरुड तालुक्यातील शेतकरी व शेतमजुरांच्या सोबत प्रहार तालुका संपर्कप्रमुख अजय चौधरी, प्रवीण कडू, विलास पांडगडे आणि इतर कार्यकर्ते शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी फलक लावत होते. पण सरकारने लोकशाहीत प्रश्न विचारणाऱ्यांनाच गुन्हेगार ठरवण्याचा उद्योग सुरू केल्याचे प्रहारचे म्हणणे आहे. आज सायंकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शासकीय मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचा भूमिपूजन सोहळा, शासकीय मत्स्य विज्ञान महाविद्यालयाच्या प्रक्षेत्र इमारतीचे लोकार्पण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मुख्यमंत्र्यांच्या या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर वरूड आणि मोर्शीत पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला, पण शेतकऱ्यांचे कोणतेही आंदोलन उभे राहू नये म्हणून आधीच कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले. शेतकरी कर्जमुक्तीची तारीख विचारतोय, आंदोलन शेतकऱ्यांचा आवाज दाबणे म्हणजे उत्तर आहे का?, असा सवाल प्रहारने केला आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले कर्जमाफीचे हे आंदोलन म्हणजे पोरखेळ नाही, तर भविष्यातील शेतकरी क्रांतीचा पहिला अध्याय आहे. पोलीस बळाने प्रश्न मिटत नाहीत, प्रश्न मिटतात ते उत्तराने. कर्जमाफीची तारीख जाहीर करा, नाहीतर ही अन्यायग्रस्त शेतकरी शेतमजूर सरकारला प्रश्न विचारतच राहणार, सरकारच्या विरोधात आंदोलने करतच राहणार. शासनाच्या डोळ्यात डोळा घालून प्रश्न विचारणाऱ्या शेतकऱ्यांना अटक करणे ही लोकशाहीची हत्या आहे. शासन जर उत्तर टाळत असेल, तर प्रश्न अधिक तीव्र होईल कारण आज शेतकरी आपल्या अन्यायाविरुद्ध पेटून उठलेला आहे, असा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाने दिला आहे.